रयत शिक्षण संस्था, सातारा 1919-2019

शताब्दी महोत्सव



# स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर















शैक्षणिक वर्ष
२०१८-१९

# सहजानंद

आदर्शांच्या शोधात...

सहजानंद- २०१९




१३१ व्या कर्मवीर जयंती प्रसंगी प्रतिमापूजन करतांना मा. मीनाताई जगधने,
प्रकाश पाटील निकम, ॲड.विजयराव बनकर, प्राचार्य डॉ.एम.एस.पोंधे व इतर




१३१ व्या कर्मवीर जयंती प्रसंगी प्रमुख पाहुणे मा.इंद्रजित देशमुख,
प्राचार्य डॉ.के.एच. शिंदे, मा. मीनाताई जगधने, प्राचार्य डॉ.एम.एस.पोंधे व इतर

“स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद” कर्मवीर

रयत शिक्षण संस्थेचे,

# स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर

(स्थापना - जून १९७०)

सहजानंद- २०१९

## संपादक मंडळ

अध्यक्ष

**प्राचार्य डॉ. पोंधे एम. एस.**

संपादक

**प्रा.डॉ. भागवत शिंदे**

सह संपादक मंडळ

प्रा. डॉ. नान्नर आर. के.

प्रा.डॉ.जडल एम.एम.

प्रा.भोये सी.एम

प्रा. मेंगाळ एन. एम.

विद्यार्थी संपादक

कु.संपदा गायके

कु. सिमा वडितके


- मुद्रक -

श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, श्रीरामपूर

रयत शिक्षण संस्थेचे,

# स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर


**महाविद्यालय विकास समिती**

चेअरमन

**श्रीमती मिनाताई माणिकराव जगधने**

सदस्या मॅनेजिंग कौन्सिल,रयत शिक्षण संस्था,सातारा

सभासद

मा. सचिव,रयत शिक्षण संस्था,सातारा

मा. प्रकाश निकम पाटील साहेब

मा. बापुसाहेब बाळाजी पटारे

मा.प्रा.डॉ. रामदास नान्नर

मा.प्रा.अनिल करवर

मा.प्रा.डॉ.मधुकर जडल

मा.प्रा.नारायण मेंगाळ

मा.एन.बी.चव्हाण

मा.शंकर अनारसे

मा.सौ.मंजिरी सोमाणी

मा.अध्यक्ष, महाविद्यालय विद्यार्थी परिषद

मा.सचिव, महाविद्यालय विद्यार्थी परिषद

सेक्रेटरी

मा. प्राचार्य

स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर



दि प्रेस ॲण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक ॲक्ट ;
नियम ०८ फॉर्म ०४ प्रमाणपत्र निवेदन

| | | |
|---|---|---|
| प्रकाशनस्थळ | : | स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन श्रीरामपूर – ४१३ ७०९ ((०२४२२) २२२४८७ |
| प्रकाशकाचे नांव | : | प्राचार्य डॉ. एम.एस.पोंधे |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | प्राचार्य निवास स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन श्रीरामपूर – ४१३ ७०९ |
| संपादकाचे नांव | : | प्रा.डॉ.भागवत शिंदे |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन श्रीरामपूर – ४१३ ७०९ भ्रमणध्वनी : ९७६५१९६५५७ |
| मुद्रकाचे नाव | : | अभय पवार |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स वत्सला कॉप्लेक्स एस.टी. स्टॅण्ड जवळ, श्रीरामपूर, जि. अ.नगर भ्रमणध्वनी : ९८२२२४१६११ |

मी, प्राचार्य, डॉ. मुकुंद पोंधे असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजूतीप्रमाणे खरा आहे.

डॉ. मुकुंद पोंधे
प्राचार्य

(खाजगी वितरणाकरिता)


---


(सहजानंद या नियतकालिकामधील साहित्यात व्यक्त केलेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही)

सहजानंद- २०१९

*जे कां रंजले गांजले। त्यांसि म्हणे जो आपुले*
*तोचि साधु ओळखावा। देव तेथेंचि जाणावा।।*
*संत तुकाराम*



पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील (डि.लिट.)
संस्थापक
रयत शिक्षण संस्था,सातारा

# सहजानंद- २०१९

## दूरदर्शी गतिशील नेतृत्व



**मा. ना. शरदचंद्रजी पवार**

(मा.केंद्रीय कृषी मंत्री)

अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा



**मा. डॉ.अनिल पाटील**

चेअरमन

रयत शिक्षण संस्था, सातारा



**मा. मीनाताई जगधने**

सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा

चेअरमन, रयत शैक्षणिक संकुल, श्रीरामपूर

चेअरमन,महाविद्यालय विकास समिती

रयत शिक्षण संस्था, सातारा 1919-2019

शताब्दी महोत्सव

# सहजानंद- २०१९

## संस्थेचे सन्माननीय पदाधिकारी



मा.अरूण कडू पाटील
उपाध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा



मा.ॲड. भगीरथ शिंदे
व्हाईस चेअरमन
रयत शिक्षण संस्था, सातारा



मा.दादाभाऊ कळमकर
अध्यक्ष, उत्तर विभाग



मा.प्राचार्य, डॉ.भाऊसाहेब कराळे
सचिव



मा.प्राचार्य, डॉ. विजयसिंह सावंत
सहसचिव (उच्च शिक्षण)



मा.विलासराव महाडिक
सहसचिव (माध्यमिक शिक्षण)



मा.डॉ.अरूण आंधळे
ऑडिटर



मा.शहाजी डोंगरे
स्पेशल ड्युटी ऑफिसर

## महाविद्यालयाचे गतिशील नेतृत्व



मा. प्राचार्य, डॉ.एम.एस.पोंधे

# सहजानंद- २०१९

## आम्ही सहकारी

### संपादक मंडळ

सहजानंद: २०१९



प्राचार्य, डॉ.मुकुंद पोंधे
अध्यक्ष



प्रा.डॉ.भागवत शिंदे
संपादक



प्रा.डॉ.रामदास नान्नर
सहसंपादक



प्रा.डॉ.मधुकर जडल
सहसंपादक



प्रा.अनिल करवर
सहसंपादक



प्रा.चंद्रकांत भोये
सहसंपादक



ग्रंथपाल, नारायण मेंगाळ
सहसंपादक

### प्रशासकीय सेवक वृंद



नामदेव चव्हाण
कनिष्ठ लिपिक



बाबा काळे
ग्रंथालय परिचर



दादाभाई पठाण
शिपाई



प्रभाकर जगधने
शिपाई



सुर्यकांत मंचरे
शिपाई



बाळू पालवे
शिपाई



रविंद्र वाजे
शिपाई

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बी.एड्.२०१७-२०१९ परीक्षेतील महाविद्यालयातील गुणवंत



करीश्मा खलिलखान पठाण
प्रथम क्रमांक ८०.५५%



योगिता संजय पाचपिंड
प्रथम क्रमांक ८०.५५%



तेजस्विनी राजेंद्र शेळके
व्दितीय क्रमांक ८०.३५%



मेघना पुंजाराम गांडोळे
तृतीय क्रमांक ७८.२५%

# प्रकाशकीय मनोगत...

**सहजानंद : २०१९** आपणा सर्व सुज्ञ वाचक, रसिकांच्या हाती देतांना विशेष आनंद होतोय. २०१८–१९ हे रयत शिक्षण संस्थेचे शताब्दी वर्ष असल्याने आम्हा सर्वांसाठी ही अभिमानास्पद गौरवशाली वाटचाल कायमच प्रेरणादायी ठरली आहे. १९७० साली पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रात स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची स्थापना झाली. स्थापनेपासून ते आजतागायत या महाविद्यालयाने महाराष्ट्राला कित्येक नामवंत शिक्षक, प्राध्यापक, प्रशासक व लेखक पुरविण्याचे काम निरंतरपणे केले आहे.या गुणवत्तापूर्ण परंपरेच्या बळावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत नॅक मूल्यांकन व पुनर्मुल्यांकनात **अ** श्रेणी मिळविणारे हे एकमेव शिक्षक शिक्षण महाविद्यालय ठरले आहे.

नॅक कडून दोन वेळा मिळालेल्या **अ** श्रेणी सोबतच या महाविद्यालयाने विविध क्षेत्रातील आपली गुणवत्तेची उज्वल परंपरा आजपर्यंत कायम राखली आहे. याचा आम्हा सर्वांना कायमच विशेष अभिमान वाटत आलेला आहे. या गौरवशाली उज्वल वारशाच्या बळावरच आजही आमच्या महाविद्यालयातील छात्राध्यापकांना जिल्ह्यातील विविध शिक्षण संस्था, शाळा महाविद्यालयांकडून नोकरीच्या संधी मिळताहेत, ही आम्हा सर्वांसाठी विशेष आनंदाची बाब आहे. या दृष्टिने महाविद्यालयातील प्लेसमेंट सेल विभागाचे कार्य कौतुकास्पद ठरले आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षक घडविण्याच्या दृष्टिने महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना, कमवा व शिका योजना, संशोधन कक्ष, अंतर्गत गुणवत्ता नियमन समिती, परीक्षा विभाग, ग्रंथालय, सांस्कृतिक विभाग हे सर्वच विभाग उत्तमरित्या कार्यरत आहेत. या विविध विभागांतर्गत समाविष्ट कार्यांच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये आमचे प्राध्यापक, विभाग प्रमुख, ग्रंथपाल, प्रशासकीय सेवक वर्ग, छात्राध्यापक या सर्वांचा मोलाचा वाटा राहिलेला आहे.

आपल्या आगळ्यावेगळ्या निर्मितीक्षम, प्रेरणादायी लेखनाच्या बळावर आमच्या महाविद्यालयाच्या **सहजानंद : २०१७** या वार्षिक अंकास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळाकडून अहमदनगर जिल्ह्यातील व्यावसायिक गटातील तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. ही आम्हा सर्वांसाठी विशेष गौरवास्पद बाब आहे.

या महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासामध्ये रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ.अनिल पाटील, मा.सचिव प्रि.भाऊसाहेब कराळे, मा. सहसचिव प्रि. विजयसिंह सावंत, रयत शिक्षण संकुल, श्रीरामपूर चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन समिती सदस्या मा.मीनाताई जगधने या सर्वांचा नेहमीच मोलाचा वाटा राहिला आहे. या सर्वांविषयी मन:पूर्वक ऋण व्यक्त करतो.

प्राचार्य डॉ. एम.एस पोंधे

# संपादकीय मनोगत...

रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी महोत्सवी वर्षातील **सहजानंद : २०१९** संपादकीयच्या निमित्ताने आपणा सर्व रसिकांशी संवाद साधताना मनस्वी आनंद होतोय. या वार्षिक अंकातून आपणास आमच्या महाविद्यालयातील छात्राध्यापकांच्या सन २०१८ – १९ या शैक्षणिक वर्षातील साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक,शैक्षणिक, क्रीडा, विज्ञान या क्षेत्रांतील प्रगतीच्या विविधांगी पाऊलखुणा प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरीत्या पाहवयास मिळतील.

वर्तमानकालीन शिक्षक शिक्षणाची वाटचाल अनेक आव्हानांना सामोरे जात सुरू आहे. त्यामुळे शिक्षक शिक्षण महाविद्यालयांचा भूतकाळ, वर्तमानकाळ, या विषयी काही ना काही भाष्य करता येते; परंतु भविष्यकाळा विषयी मात्र ठामपणे भाष्य करणे अवघड झाले आहे. अशा या गोंधळलेल्या अवस्थेत बी.एड्. अभ्यासक्रम पारंपारिक पद्धतीनुसार दोन वर्षांचा राहणार की नव्या रूपात प्रचलित वरिष्ठ महाविद्यालयातील पारंपारिक पदवी अभ्यासक्रमांशी जोडून एकात्मिक रूपात चार वर्षाचा होणार? चार वर्षांचा झालाच तर त्याचे स्वरूप कसे असणार? शिक्षक वर्ग कसा,व किती असणार? हा अभ्यासक्रम नक्की कधी पासून लागू होणार? हा अभ्यासक्रम अनुदानित असणार की विनाअनुदानित? या खूप साऱ्या प्रश्नांची उत्तरे अजूनही गुलदस्त्यात आहेत. अशा संक्रमणकाळात बी.एड्. महाविद्यालयांची अवस्था अत्यंत नाजूक झाली आहे. मात्र अशा या खडतर काळातही आमच्या महाविद्यालयाने गुणवत्तेच्या बाबतीत कसलीही तडजोड न करता आपली यशस्वी वाटचाल सुरू ठेवली आहे. याचा आम्हाला विशेष आनंद वाटतो.

यावर्षी **सहजानंद : २०१९** साठी आम्ही **आदर्शांच्या शोधात...** ही मुख्य संकल्पना घेतली. हे आदर्श शोधायचे कुठून ? हा विद्यार्थ्यांचा प्रश्न असणार याची संपादक मंडळाला खात्री होती. त्यामुळे या प्रश्नावर आमचे उत्तर तयारच होते:वाचनातून ! यामागे आमचे दोन हेतू होते. एक विद्यार्थ्यांच्या अंगी वाचनसंस्कार रूजवणे. दोन वाचनातून विद्यार्थ्यांना आदर्शवत, मार्गदर्शक, प्रेरणादायी ठरतील अशी व्यक्तिमत्वे अभ्यासण्याची संधी देणे, त्यांच्या जीवन व कार्यावर लेख लिहिण्यास प्रवृत्त करणे. अंक पूर्णत्वास नेत असतांना हे दोन्ही हेतू समाधानकारक रित्या साध्य झाल्याचा आनंद वाटतो. या आनंदाची प्रचिती अंक वाचनातून आपणालाही मिळेल याची खात्री वाटते.

अंकाची मुख्य संकल्पना व त्यावर आधारीत लेख यांचे संदर्भ घेऊन मुखपृष्ठ व मलपृष्ठाची योजना केली आहे. त्यादृष्टीने मुखपृष्ठावर महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणांचे जनक महात्मा फुले, शिक्षण महर्षि पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील, लक्ष्मी वहिनी, भूतपूर्व राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दूल कलाम, बाबा आमटे, डॉ. नरेंद्र दाभोळकर, जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ स्टीफुन हॉकींग यांची निवड केली आहे. तर २०१८–१९ हे रयत शिक्षण संस्थेचे शताब्दी वर्ष असल्याने मलपृष्ठावर रयत गीताची योजना केली आहे. आपणा सर्वांना ती निश्चितच आवडेल असा आशावाद वाटतो.

याशिवाय या अंकातील आमच्या विद्यार्थी शिक्षकांच्या विविध लेख, कविता, निबंध, चारोळ्या, सुविचार इत्यादीतून आपणास त्यांच्यातील प्रगल्भ जाणिवा, जीवनानुभूतीचे दर्शन अनुभवायास मिळेल. त्यातून त्यांच्यातील साहित्यिक कलाविष्कार, भावनाभिव्यक्ती, वैचारिक आंदोलने, मानसिक अस्वस्थता इत्यादींचा प्रत्यय येईल. या सर्वांचा आपण जाणकार वाचक निश्चितच आस्वाद घ्याल नि आपली शाबासकीची थापही द्याल याची आम्हा सर्वांना खात्री वाटते.

'सहजानंद' या वार्षिक अंकाला अधिक गुणवत्तापूर्ण, समृद्ध व संपन्न करण्यात मा. प्राचार्य डॉ.एम. एस. पोंधे यांचे अत्यंत मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्याबद्दल त्यांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे. या ऋणासह सहसंपादक मंडळ, कार्यालयीन सेवक व श्री स्वामी समर्थ प्रिंटर्सचे संचालक अभय पवार या सर्वांविषयी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो.

प्रा.डॉ. भागवत शिंदे

# ।। अनुक्रमणिका ।।


| अ.क्र. | लेख शीर्षक | लेखक / लेखिका | पृष्ठ.क्र |
|---|---|---|---|
| १. | डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम: एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व | योगिता पाचपिंड | ०१ |
| २. | महात्मा फुले: एक दृष्टा समाजसुधारक | पुंडलिक गावित | ०३ |
| ३. | कर्मवीर आण्णा व लक्ष्मी वहिणी:आदर्श सहजीवन | रूपाली वाघ | ०६ |
| ४. | मा. शरदचंद्रजी पवार : एक दृष्टा नेता | अमोल रणदिवे | ०९ |
| ५ | स्टीफन हॉकिंग : एक प्रेरक जीवनप्रवास | तेजस्विनी शेळके | १२ |
| ६. | टर्निंग पॉईंटस् | उज्वला गाडेकर | १४ |
| ७. | एक प्रेरणादायी जीवनप्रवास : हेलर केलर | दिपाली साळुंके | १६ |
| ८. | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे | प्राजक्ता लंके | १७ |
| ९. | आनंदयात्री बाबा आमटे | कविता लांडे | १९ |
| १०. | वाचाल, तर वाचाल ! | तेजस्विनी शेळके | २१ |
| ११. | ग्रंथ माझे गुरू... | भरत पवार | २३ |
| १२. | गुलामगिरीचे रहस्य ... | सूर्यप्रभा बोधक | २५ |
| १३. | विचारांची जादू | मेघना गांडुळे | २७ |
| १४. | ऐसे कैसे झाले भोंदू? | उर्मिला वाबळे | २९ |
| १५. | आमचा बाप आन् आम्ही | करिष्मा पठाण | ३२ |
| १६. | ॲन्टोनी आणि क्लोपात्रा... | रेणुका खंडागळे | ३३ |
| १७. | पाडा : शेतकरी संघर्षाचा जाहीरनामा | भरत पवार | ३५ |

## ।। अनुक्रमणिका ।।


| अ.क्र. | लेख शीर्षक | लेखक / लेखिका | पृष्ठ.क्र |
|---|---|---|---|
| १८. | जागरूक मतदार, लोकशाहीचा आधार | योगिता पाचपिंड | ३५ |
| १९. | शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे, परिणाम व उपाय | सीमा वडितके | ३७ |
| २०. | व्यथा शेतकऱ्यांच्या... | जयश्री साळुंके | ३९ |
| २१. | एक होता कार्व्हर | सोनाली जाधव | ४३ |
| २२. | वाचते व्हा... | संपदा गायके | ४६ |
| २३. | शिक्षणावर बोलू काही! | संपदा गायके | ४७ |
| २४. | लोकनेते शरदचंद्रजी पवार | दिपाली शिंदे | ५१ |
| २५. | Democracy, Election and Good Governance | JUNED SHAIKH | ५५ |
| २६. | ME TOO : RENDING REALITY | JUNED SHAIKH | ५८ |
| २७. | वार्षिक अहवाल : शैक्षणिक वर्ष २०१८ – २०१९ | प्रा.डॉ.बी.ए.शिंदे | ६२ |
| २८. | सन २०१८ – १९ प्रथम वर्ष बी.एड.छात्रअध्यापक | प्रा.डॉ.बी.ए.शिंदे | ६६ |
| २९. | सन २०१८ – १९ व्दितीय वर्ष बी.एड.छात्रअध्यापक | प्रा.डॉ.बी.ए.शिंदे | ६८ |

# डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व

– योगिता पाचपिंड

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे पूर्ण नाव अबुल पाकीर जैनुलाब्दीन अब्दुल कलाम होते. त्यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ रोजी रामेश्वर या ठिकाणी झाला. डॉ. कलाम हे भारताचे अकरावे राष्ट्रपती होते. आपल्या आगळ्या कार्यपद्धतीमुळे ते 'लोकांचे राष्ट्रपती' म्हणून लोकप्रिय झाले. त्यांचे वडील रामेश्वरला येणाऱ्या यात्रेकरूंना होडीतून धनुष्कोडीला नेण्या–आणण्याचा व्यवसाय करीत. डॉ. कलाम यांनी आपले शालेय शिक्षण रामनाथपुरम्ला पूर्ण केले. लहान वयातच वडिलांचे छत्र गमावल्याने डॉ. कलाम गावात वर्तमानपत्रे विकून तसेच अन्य लहान मोठी कामे करून पैसे कमवीत व घरी मदत करीत. त्यांचे बालपण खूप कष्टात गेले.

शाळेत असताना गणिताची त्यांना विशेष आवड लागली. नंतर ते तिरुचिरापल्ली येथे सेंट जोसेफ कॉलेजमध्ये दाखल झाले. बी. एस्सी. झाल्यानंतर त्यांनी मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत प्रवेश घेतला. प्रवेशासाठी लागणारे पैसेही त्यांच्याकडे नव्हते. बहिणीने स्वतःचे दागिने गहाण ठेवून त्यांना पैसे दिले. या संस्थेतून एरॉनॉटिक्सचा डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर त्यांनी अमेरिकेतील 'नासा' या प्रसिद्ध संशोधन संस्थेत चार महिने एरोस्पेस टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण घेतले. त्यानंतर अब्दुल कलाम यांचा १९५८ ते ६३ या काळात संरक्षण संशोधन व विकास संस्थेशी (DRDO) संबंध आला.

१९६३ मध्ये ते भारतीय अवकाश संशोधन संस्थेत (इस्त्रो) क्षेपणास्त्र विकासातील एसएलव्ही (सेटलाईट लॉचिंग व्हेईकल) च्या संशोधनात भाग घेऊ लागले. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना भारताने क्षेपणास्त्र विकासाचा एकात्मिक कार्यक्रम हाती घेतला. त्यावेळी डॉ. कलाम पुन्हा डीआरडीओमध्ये आले.

स्वदेशी बनावटीची क्षेपणास्त्रे तयार करण्याची त्यांची जिद्द तेव्हापासूनचीच आहे. भारतीय अवकाश संशोधन संस्थेत असताना सॅटेलाईट लॉचिंग व्हेईकल–३ या प्रकल्पाचे प्रमुख झाले. साराभाईंनी भारतात विज्ञान तंत्रज्ञानाची आघाडी डॉ. कलाम यांनी सांभाळावी, असे वक्तव्य केले होते. ते पुढे कलामांनी सार्थ करून दाखविले. साराभाईंचे नाव दिलेल्या 'विक्रम साराभाइ अवकाश केंद्रा'चे ते प्रमुख झाले.

वैयक्तिक कामापेक्षा सांघिक कामगिरीवर त्यांचा भर असतो व सहकाऱ्यांमधील उत्तम गुणांचा देशाच्या वैज्ञानिक प्रगतीसाठी उपयोग करून घेण्याची कला त्यांच्यामध्ये आहे. क्षेपणास्त्र विकास कार्यामधील 'अग्नी' क्षेपणास्त्राच्या यशस्वी चाचणीमुळे डॉ. कलाम यांचे जगभरातून कौतुक झाले. पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार म्हणून काम करताना देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांनी अनेक प्रभावी धोरणांची आखणी केली. त्यांनी संरक्षण मंत्र्यांचे वैज्ञानिक सल्लागार व डीआरडीओचे प्रमुख एअरक्रॉफ्ट यांच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका पार पाडली.

विज्ञानाचा परमभोक्ता असणारे डॉ. कलाम मनाने खूप संवेदनशील व साधे आहेत. त्यांना रूद्रवीणा वाजण्याचा, मुलांशी गप्पा मारण्याचा छंद आहे. भारत सरकारने 'पद्मभूषण', 'पद्मविभूषण' व १९९८ मध्ये 'भारतरत्न' हा सर्वोच्च किताब देवून त्यांचा सन्मान केला. डॉ. कलाम हे अविवाहित व पूर्ण शाकाहारी आहेत. पुढील २० वर्षात होणाऱ्या विकसित भारताचे स्वप्न ते पाहतात. बालपण अथक परिश्रमात व्यतीत करून विद्येची अखंड साधना करीत खडतर आयुष्य जगलेले, आणि जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राच्या राष्ट्रपतीपदी निवड झालेले डॉ. कलाम हे युवकांना सदैव प्रेरणा देणारे व्यक्तिमत्व आहे.

भारत सरकारने 'पद्मभूषण', 'पद्मविभूषण' व १९९७ मध्ये 'भारतरत्न' हा सर्वोच्च किताब देऊन त्यांचा सन्मान केला. खरच डॉ. कलाम हे आपल्यासाठी एक प्रेरणादायी स्थान आहे.

डॉ. कलामांनी अनेक प्रेरणादायी पुस्तके लिहिली. त्यातच अदम्य जिद्द, इग्नाइटेड माइंड्स, अनलीशिंग द पॉवर विदिन इंडिया, इंडिया–२०२०– ए व्हिजन फॉर द न्यू मिलेनियम, इंडिया – माय ड्रीम, एनव्हिजनिंग ॲन एम्पॉवर्ड नेशन : टेक्नॉलॉजी फॉर सोसायटल ट्रान्सफॉरमेशन, विंग्ज ऑफ फायर, सायंटिस्ट ऑफ

फायर, दीपस्तंभ अशी अनेक प्रेरणादायी पुस्तके कलामांनी लिहिली.

भारताचे ११ वे राष्ट्रपती हे कोणीतरी तर बनणारच होते, म्हणून 'झालेले' किंवा कोणीतरी नामधारी म्हणून बनवलेले 'असे परंपरागत नव्हे, तर आयुष्याच्या अंतिम क्षणापर्यंत लोकांसाठी जगून लोकांचेच बनून राहिलेले असे एक व्यक्तिमत्व होते. कारण ते डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम होते. एका बाजूला शांततेसाठी तरीही शत्रूच्या मनात धडकी भरवणारी पोखरण अणुचाचणी होती तर दुसरीकडे 'When there is order in the nation then, there is peace in the world' म्हणून युरोपियन देशांच्या संसदेत केलेल्या सर्वकालीन सर्वश्रेष्ठ भाषणांपैकी एक असे जागतिक शांततेचे आवाहन करणारे भाषण होते. E.U. ची संपूर्ण संसद जेव्हा आनंदाने भारावलेल्या अवस्थेत, बराच वेळ टाळ्या पिटत असतानाच उभी राहून मानवंदना देत होती. तेव्हा ''भारताकडून शांततेचा जगाला दिला जाणारा संदेश व न्युक्लीअर टेस्ट या दोन्ही परस्पर विरोधाभास असणाऱ्या गोष्टी आहेत.'' असे ओरडणाऱ्या पाकिस्तानला आपोआप उत्तर मिळाले. ह्या प्रसंगातून एका शांततावाद्याची विविध देशांच्या प्रतिनिधी मनावर जादू करणाऱ्या वक्तृत्वाची झलकही दिसली व strength respects strength only ह्या वाक्याचा अर्थही कळाला.

पेपर वाटण्यापासून खडतर आयुष्याची सुरुवात करणाऱ्या एका व्यक्तीवर जेव्हा जगातील लहानमोठ्या सर्व पेपर्समध्ये स्तुती करणारे रकानेच्या रकाने लिहून येतात तेव्हा 'अतिसामान्य ते असामान्य' ह्या प्रवासाचे ते एक उदाहरण ठरते.अनेक मार्गदर्शक पुस्तकातून आशावादी लिखाण करून जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत विद्यार्थी व युवकांना सत्य, विकास, नीतिमत्ता व राष्ट्रनिर्माणाचा मार्ग दाखवणाऱ्या ह्या महापुरुषाचा जन्मदिन १५ ऑक्टोबर हा विश्व विद्यार्थी दिवस म्हणून साजरा केला जातो.

डॉ. कलामांनी अनेक प्रेरणादायी विचार मांडले.

''जोपर्यंत, चांगले शिक्षण घेणे म्हणजे
चांगली नोकरी लागणे, ही संकल्पना
पालक आणि विद्यार्थ्यांच्या डोक्यातून
निघत नाही,तोपर्यंत समाजात
नोकरच जन्माला येतील, मालक नाही''

एकीकडे 'स्वप्न म्हणजे ते नाही जे तुम्हाला झोपेत पडते. स्वप्न म्हणजे ते जे तुम्हाला झोपूच देत नाही' म्हणणारे राष्ट्र समर्पित व्यक्तिमत्त्व तर दुसरीकडे, 'low aim is a crime, स्वप्ने मोठीच बघा आणि त्यांना पूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करा म्हणणारे मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व.'निःसंशय देशाने सर्वाधिक प्रेम केलेला राष्ट्रपती' अशी ओळख असणाऱ्या ह्या मिसाईल मॅनच्या आठवणी जनतेच्या मनात कायम राहतील ह्यावर कोणाचेही दुमत असू शकत नाही. डॉ. कलामांनी अजून एक प्रेरणादायी विचार मांडला. 'मी मरेन त्या दिवसाला सुट्टी जाहीर करू नका तर एक दिवस जास्त काम करा' always nation first म्हणत हा त्यांचा संदेश अंगीकारून आधुनिक स्वप्नातील भारताचे निर्माण करू शकतो.

"If you salute your duty, you need not
salute anybody, But if you pollute
your duty, you have to salute everybody,"

डॉ. कलाम यांनी अनेक प्रेरणादायी विचार मांडले. कलाम यांचे निधन २७ जुलै, २०१५ मध्ये शिलाँगमध्ये झाले. 'राहण्यायोग्य पृथ्वी निर्माण करणे' या विषयावर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट शिलाँग येथे व्याख्यान देत असताना ते अचानक कोसळले. बेथनी येथील हॉस्पिटलमध्ये त्यांना मृत घोषित करण्यात आले. त्यांच्या निधनाने भारतातच नव्हे तर सर्व जगातील विज्ञान प्रेमींवर शोककळा पसरली. कलाम यांनी आपल्या भरीव कामगिरीने, उत्तम बुद्धिमत्तेने आणि विनम्र स्वभावाने देशातील आजच्या व भावी पिढीसाठी उत्तम आदर्श ठेवला आहे. त्यांची कमतरता भारताला सदैव जाणवत राहील.

आयुष्यात येणाऱ्या कठीण परिस्थिती ह्या काही
तुम्हाला उद्ध्वस्त करायला येत नसतात
ते तर तुम्हाला तुमच्यामधील सुप्त क्षमता आणि
ताकदीची ओळख करून देण्यासाठी येत असतात.
म्हणून कठीण परिस्थितींना देखील कळू द्या
तुम्ही देखील खूप कठीण आहात.

# महात्मा फुले : एक दृष्टा समाजसुधारक

– पुंडलिक गावित

भारतमाता ही नररत्नांची खाण आहे. महापुरुषांची उणीव तिला कधी भासलीच नाही. लोकमान्य टिळकांचा अस्त झाला व महात्मा गांधींच्या रूपाने एका महापुरुषाचा पुन्हा उदय झाला. जन्म आणि मृत्यू यामधील काही मोजक्या कालावधीवरच मानवाचा हक्क असतो. चिरंजीव असतो तो महापुरुषांचा विचार व त्याच्या विचारांची परंपरा जोपासण्याचे ऐतिहासिक कार्य राष्ट्राला करावे लागते.

महात्मा जोतीराव फुले हे भारतीय समाजक्रांतीचे जनक म्हणून संबोधले जातात. त्यांच्या विचारसरणीचा व कार्याचा प्रभाव दलित, पीडित, शोषीत जनसामान्यांच्या जीवनावर व भारतीय समाजजीवनावर मोठ्या प्रमाणात पडलेला दिसतो. त्यांचे जीवन व कार्य हे प्रस्थापित विरूद्ध विस्थापित, प्रतिष्ठित विरूद्ध अप्रतिष्ठित, शोषक विरूद्ध शोषित यांच्या न्याय्य हक्काच्या जपणुकीस्तव सामाजिक संघर्षाचे होते.

समाजक्रांती म्हणजे सामाजिकदृष्ट्या वैचारिक आमुलाग्र मूल्यपरिवर्तन होय. सामाजिक विचारधारा या स्वयंभू व स्वतंत्र असल्या तरी समाजातील राजकीय व शैक्षणिक विचारांशी त्यांचा अत्यंत जवळचा संबंध असतो. अनेक पैलूंनी समाजजीवन घडत असते व विकसित होत असते. एका मोठ्या विचार प्रवाहाला ते पैलू गतिशील करीत असतात. मानवी जीवन हे या बहुविध पैलूंनी समृद्ध होत असते.

महात्मा जोतीराव फुले यांनी घडवून आणलेल्या समाजक्रांतीचे स्वरुप समजावून घेण्याकरिता महात्मा फुले यांच्या समकालीन असलेली राजकीय, सामाजिक व शैक्षणिक परिस्थिती आणि विचारधारा लक्षात घेणे आवश्यक आहे. यादृष्टीने राजकारण, समाजकारण, शिक्षण व धर्म या क्षेत्रातील समकालीन मान्यवर व्यक्तींमध्ये राजा राममोहन रॉय, दयानंद सरस्वती, लोकमान्य टिळक व गोपाळ गणेश आगरकर यांच्या विचारांचा व कार्याचा परामर्श घेणे उद्‌बोधक ठरेल.

महात्मा जोतीराव फुले यांच्या समकालीन प्रबोधनाचे स्वरूप महाराष्ट्रात कसे होते हे तपासून पाहणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात व विशेषत: महात्मा फुले यांच्या काळात स्वातंत्र्य संपादनाकरिता कराव्या लागणाऱ्या राजकारणाला विशेष महत्वाचे स्थापन प्राप्त झाले होते. ब्रिटिश राजसत्तेचा पारा अधिकाधिक घट्ट होऊ लागल्यामुळे भारतीय जनतेत आता जागृती होऊ लागली होती. ब्रिटिशांची सत्ता म्हणजे लोककल्याणास पारखी झालेली जुलमी राजसत्ता होय. याची व्यापक प्रमाणात जनतेत जागृती निर्माण होत होती. १८५७ सालचे स्वातंत्र्ययुद्ध व त्यानंतर पेटून उठलेला सारा भारत स्वातंत्र्याच्या दिशेने यशस्वी वाटचाल करू लागला होत. पण त्याच वेळेस ब्रिटिशांनी केलेल्या काही वैज्ञानिक सुधारणा सतीची चाल बंद करणे, रेल्वे, तारायंत्र व दळणवळणाच्या सोयी, शिक्षणसंस्था स्थापन करणे, आरोग्याच्या सोयी उपलब्ध करून देणे यामुळे ब्रिटिश शासन आपल्या हिताकरिताच सर्वकाही करत आहे व हे शासन आपल्या धार्मिक बाबतीत हस्तक्षेपही करीत नाही. त्यामुळे ब्रिटिश शासन ही परमेश्वराचीच योजना होय, अशी काही भारतीय बुद्धिवादी विचारवंतांचीही मनोभूमिका बनत चालली होती.

महात्मा फुले यांची सत्यशोधक समाजाची तीन तत्वे होती.

१. ईश्वर एक असून तो सर्वव्यापी, निराकार, निर्गुण व सत्यरूप आहे व मनुष्यप्राणी त्याची प्रिय लेकरे आहेत.

२. ईश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार आहे.

३. मनुष्य जातीने श्रेष्ठ ठरत नसून तो गुणाने श्रेष्ठ ठरतो.

**महात्मा फुले प्रणित सार्वजनिक सत्यधर्माची विचारसरणी**

१. ईश्वर एक आहे. तो सर्वव्यापी, निर्गुण व सत्यमय आहे.

२. ईश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येक मानवाला पूर्ण

अधिकार आहे. सर्वशक्तीमान ईश्वराची भक्ती करण्यास मध्यस्थाची जरूरी नसते. पुरोहित सर्व लोकांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेऊन त्यांना लुबाडत असतो. म्हणून सत्यस्वरुप ईश्वराची भक्ती आपल्या कुवतीप्रमाणे करावी.

३. कोणत्याही मनुष्याची श्रेष्ठता तो ज्या जातीत जन्माला आला त्या जातीवर ठरत नसून त्याची खरीखुरी श्रेष्ठता त्याच्या गुणांवर अवलंबून असते. म्हणून सत्यशोधक समाजाने हिंदू धर्मातील वर्णव्यवस्था निंद्य व त्याज्य आहे, असे आवर्जुन सांगितले पाहिजे.

४. आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याच्या व्यवस्थेवरून एकंदर जे सर्वकाही स्त्री–पुरुष दुसऱ्याच्या धर्मासंबंधी मतावरून त्यास कोणत्याही प्रकारे नीच मानून त्यांचा छळ करीत नाहीत त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

५. स्त्री अथवा पुरुष, जे आपल्या हितासाठी दुसऱ्याचे नुकसान करण्याकरिता लबाड बोलत नाहीत अथवा लबाड बोलणारांस मदत करीत नाहीत, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

जोतीबा फुले यांचे कृषीविषयक ज्ञान ऐकीव स्वरुपाचे नव्हते. प्रत्यक्ष अनुभवातून त्यांनी गोऱ्या सरकारला व शुद्र शेतकऱ्यांना अनेक उपयुक्त सूचना केल्या आहेत. शेतकऱ्यांच्या सर्व दुःखाचे मूळ म्हणजे त्यांचे प्रचंड प्रमाणावरील अज्ञान होय. या अज्ञानतिमिराचा नाश करून ज्ञानाचा प्रकाश शेतकऱ्यांपर्यंत जाऊन पोहचविल्याशिवाय त्यांचा उद्धार होणार नाही, असे त्यांचे प्रामाणिक मत होते. म्हणून जोतीबा या ग्रंथात म्हणतात, शुद्र शेतकऱ्यांच्या मुलास शेतकीसंबंधी ग्रंथ अथवा नेटिव्ह वर्तमानपत्रातील शेतकीसंबंधी सूचनाबद्ध वाचनापुरते ज्ञान आमच्या धर्मातील सरकारच्याने देखवत नाही व शेतकऱ्यांपैकी लक्षाधीश कुटुंबास वेळच्यावेळी पोटभर भाकर व अंगभर वस्त्र मिळण्याची मारामार पडली असून यांच्या सुख संरक्षणाच्या निमित्ताने मात्र आमचे न्यायशील सरकार लष्करी, पोलीस, न्याय, जमाबंदी वगैरे खात्यांनी चाकरीस ठेवलेल्या कामगारांस मोठमोठाले जाडे पगार व पेन्शनी देऊन आतोनात द्रव्य उधळते, याला म्हणावे तरी काय!

जोतीराव फुले यांच्या सत्यधर्मात जातीयता नव्हती, विशुद्ध मानवतावाद होता. ब्राम्हणांवर घणाघाती आघात त्यांनी केलेला दिसतो; पण तोही ब्राम्हण या जातीविषयी आकसाच्या भावनेतून त्यांनी कधी केला नाही. सुष्ट आणि दुष्ट, स्वार्थी आणि निःस्वार्थी यावर भर देता जातीविरहित मानवी हिताचा त्यांचा व्यापक दृष्टिकोन व विचारांची उत्तुंगता हीच आपल्याला सदैव आकर्षित करते आणि हेच त्यांचे वैशिष्ट्य म्हटले पाहिजे.

जोतीबा फुले यांच्या विचारांचा खरा प्रसार त्यांच्या ग्रंथ निर्मितीतूनच झालेला दिसून येतो. जोतीबांची ही ग्रंथसंपदा उपलब्ध होऊ शकली नसती तर जोतीबांचे मौलिक विचार वाऱ्यावर उडून गेले असते व भारतातील सामाजिक क्रांतीच्या इतिहासाचे मोठे नुकसान झाले असते. आपले विचार ग्रांथिक स्वरुपात जनतेपर्यंत पोहचविण्याकरिता जोतीबांना परिश्रम घ्यावे लागले. कारण हे क्रांतीकारक विचार त्या काळात प्रकाशित करण्याचे धाडस करणे हे सुद्धा मोठे कठीण कामच होते. जोतीबांचे मौलिक विचारधन बरीच वर्षे अंधारातच राहिले ही वस्तुस्थिती आहे.

शिक्षणाच्या प्रसार कार्यामुळे जसे जोतीराव फुले यांचे नाव सर्वतोमुखी झाले आहे. तसेच ते त्यांनी केलेल्या सामाजिक व धार्मिक सुधारणांमुळेही झाले आहे. त्यांच्या सामाजिक सुधारणेचा केंद्रबिंदू स्त्रिया व उपेक्षित समाज होता. त्यांच्या विविध सामाजिक व धार्मिक सुधारणांमुळे तत्कालीन समाजात परिवर्तन घडवून येण्यास सुरुवात झाली होती.

जोतीबा फुले यांनी घडवून आणलेल्या सामाजिक सुधारणांत विवाह पद्धतीतील बदल ही एक महत्त्वाची सामाजिक सुधारणा म्हणता येईल. जोतीबा फुले यांच्या काळात समाजात बालविवाह रूढ होता. अपरिपक्व अवस्थेत वैवाहिक जीवनाची जबाबदारी बालविवाह पेलू शकत नाही. जोतीराव फुले तेरा वर्षांचे असताना त्यांचा विवाह १८४० साली सावित्रीबाईंशी झाला; पण त्या काळात वयाच्या ५–६ वर्षांपासूनच विवाह होत होते. अल्पवयात पतीचे निधन झाल्यास त्या विधवेचे फार हाल होत असत. तिला पुन्हा विवाहाची परवानगी समाजाकडून नव्हती. तिची निराधार अवस्था, वैधव्याचा डोंगर ती पापी म्हणूनच हे घडले, अशी समाजाची धारणा होती.

स्त्री जातीला समाजातून मिळणाऱ्या वागणुकीबरोबरच

अस्पृश्याला समाजात मिळणाऱ्या वागणुकीकडेही जोतीबांनी आपले लक्ष केंद्रभूत केले. ज्याला आपण खालच्या वर्णातील लोक समजतो व ज्यांना स्पर्शही करणे मोठे पाप आहे, असे समजले जाते, त्यांना माणुसकीने वागविणे हाच कसा श्रेष्ठ धर्म आहे, हे त्यांनी पटवून दिले. मनुष्य त्यांच्या जातीने नाही तर कर्माने श्रेष्ठ होतो. मनुष्याला श्रेष्ठ धर्माचे कर्म करता यावे यासाठी त्याला अविद्येच्या आवरणातून बाहेर काढून शिक्षण देण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादीत केली.

सामाजिक परिवर्तन ही अव्याहत व सतत चालणारी प्रक्रिया आहे. या भूतलावर मानवप्राण्यांना समाजाने सुरक्षितता प्रदान केली आहे. जोपर्यंत समाजाचे अस्तित्व आहे, तोपर्यंत समाजात परिवर्तनशीलता ही राहणारच. भारतीय समाजाचा इतिहास अतिप्राचीन आहे. भारतीय समाज म्हणजे काय, हे समजावून घेणे जेवढे महत्त्वाचे आहे, तेवढेच भारतीय समाजातील परिवर्तन समजावून घेणेही महत्त्वाचे आहे.

महात्मा फुले हे केवळ समाज सुधारकच होते असे नसून भारतातील सामाजिक सुधारणेच्या क्रांतीकारक तत्त्वज्ञानाचे जनक होते.



विद्येविना मती गेली
मतिविना निती गेली
नितीविना गती गेली
गतीविना वित्त गेले
वित्ताविना क्षुद्र खचले
इतुके सारे अनर्थ
एका अविद्येने केले

## खरा तो एकची धर्म

खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे ।
जगी जे हीन अति पतित,
जगी जे दीन पददलित
तया जाऊन उठवावे, जगाला प्रेम अर्पावे ।१।
सदा जे आर्त अती विकल,
जयांना गांजती सकल
तया जाऊन हसवावे, जगाला प्रेम अर्पावे ।२।
कुणा ना व्यर्थ शिणवावे,
कुणा ना व्यर्थ हिणवावे
समस्ता बंधू मानावे, जगाला प्रेम अर्पावे ।३।
प्रभुची लेकरे सारी,
तयांला सर्वही प्यारी
कुणा ना तुच्छ लेखावे, जगाला प्रेम अर्पावे ।४।
असे हे सार धर्माचे,
असे हे सार सत्याचे
परार्था प्राणही द्यावे, जगाला प्रेम अर्पावे ।५।

साने गुरुजी

# कर्मवीर अण्णा व लक्ष्मी वहिणी : एक आदर्श सहजीवन

– रूपाली वाघ



कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या सामाजिक कार्यात त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांचेही योगदान अत्यंत मोलाचे आहे. म. जोतीराव फुले यांना सावित्रीबाई फुले यांनी जशी साथ दिली, त्यांच्या कार्यात हातभार लावला त्याचप्रमाणे लक्ष्मीबाई यांनी केलेले कार्य त्याच तोलामोलाचे आहे.

लक्ष्मीबाई यांचा जन्म ७ जून १८५४ रोजी कुंभोज, जि. कोल्हापूर येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव आण्णा पाटील होते. कर्मवीर भाऊरावांचा जन्मही याच गावी त्यांच्या आजोळी झाला. कुंभोज हे समृद्ध गाव होते. गावातील जैन समाज मात्र पारंपारिक कर्मठ होता. त्यामुळे लक्ष्मीबाईंच्या मनावर कर्मठपणाचे संस्कार बालपणापासून दृढ झालेले होते. लक्ष्मीबाई व भाऊरावांचे लग्न सन १९०९ मध्ये कुंभोज येथे झाले.

किर्लोस्करवाडीला भाऊरावांमुळे दहा बारा माणसांचे एकत्र कुटुंब होते. या सर्व कुटुंबाचे काम लक्ष्मीबाई स्वतः करीत. याशिवाय घरी येणारे – जाणारे पाहुणे यांचेही आदरतिथ्य त्याच करीत. त्यामुळेच किर्लोस्कर कारखान्याचे मालक लक्ष्मणराव किर्लोस्कर नेहमी म्हणत असत, ''गृहलक्ष्मी असावी तर लक्ष्मीबाई पाटील यांच्यासारखी'' भाऊरावांच्या आई गंगाबाई यांच्या मुशीतून लक्ष्मीबाईंची जडणघडण झाली होती.

किर्लोस्करवाडीला राहत असताना लक्ष्मीबाईंचा कर्मठपणा नैसर्गिकरित्या अठरा पगडा जातीच्या बायकांमुळे कमी झाला. याच काळात भाऊराव सत्यशोधक समाजाचे कार्य करीत असल्यामुळे सर्व जाती–धर्माचे लोक त्यांच्याकडे येत असत. त्यामुळे लक्ष्मीबाईला सोवळे ओवळे कठीण जाऊ लागले व हळूहळू त्यांची कर्मठपणाची मानसिकता कमी होऊ लागली. या काळातच त्यांना १९१७ मध्ये आप्पासाहेब व १९१९ मध्ये शकुंतला अशी दोन अपत्ये झाली.

करवीर नगरीत सत्यशोधक समाजाचे आधारस्तंभ राजश्री शाहू महाराज होते. त्यांनी आपल्या संस्थानात प्रजेचा कायापालट घडवून आणण्यासाठी सत्यशोधक चळवळीच्या विचाराचे लोक खेडोपाडी पसरवले होते. कर्मवीर अण्णा तर राजश्री शाहू महाराजांच्या तालमीतच तयार झाले होते. त्यांनी सातारा या क्रांतीकारकांच्या जिल्ह्यात सत्यशोधक चळवळीचा प्रसार आणि प्रचार केला. सत्यशोधक समाजाच्या विचाराने भारावलेली एक पिढी त्यांनी घडविली. जेव्हा सातारा जिल्ह्यात सत्यशोधक समाजाने लोक जागृतीसाठी जलसे काढले तेव्हा भाऊरावांनी डफ वाजविण्यासाठी मागेपुढेही पाहिले नाही. सन १९१९ साली सातारा जिल्ह्यातील काले नावाच्या एका खेड्यात सत्यशोधक समाजाने अधिवेशन घेतले होते. या अधिवेशनाच्या विचारपीठावर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ग्रामीण जनतेच्या शिक्षणासाठी एक खास संस्था काढण्याची कल्पना मांडली आणि ठराव रूपाने त्या अधिवेशनात त्यास मान्यता मिळाली.

अशा रितीने रयत शिक्षण संस्थेचे बीज सत्यशोधक समाजाच्या विचारपीठावर रोवले गेले. वटवृक्षाखाली गौतम बुद्धांना ज्ञान प्राप्त झाले. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हा गौतम बुद्धांचा संदेश आहे. म्हणून संस्थेचे बोधचिन्ह वटवृक्ष आहे.

१९१९ मध्ये रयत शिक्षण संस्थेची स्थापना काले, जिल्हा सातारा येथे करून भाऊरावांनी तळागाळातील बहुजन समाजाला शिक्षणाची संधी करून दिली. सर्वप्रथम एक वसतिगृह काढून त्यात सर्व जातीधर्माच्या मुलांना प्रवेश दिला. सन १९२४ मध्ये सातारा येथे जिल्ह्याच्या ठिकाणी संस्थेचे स्थलांतर करण्यात आले. सोमवार पेठेत

स्वतःच्या राहत्या घरीच मोहिते नावाच्या दलित विद्यार्थ्याला ठेवून वसतिगृह सुरू केले; परंतु हा मुलगा जास्त दिवस राहिला नाही. त्यानंतर पहिल्या वर्षी चार मुले वसतिगृहात दाखल झाली. वसतिगृह घरातच असल्यामुळे सर्व मुलांचा स्वयंपाक लक्ष्मीबाईंना करावा लागे.

सन १९२६ मध्ये लक्ष्मीबाईंना बेबी हे तिसरे अपत्य झाले. बेबी ही वसतिगृहात जात येत असे. वसतिगृहातील मुले स्वयंपाक हाताने करत असत. मुलांनी भाकरी केली की बेबी खाण्यासाठी जात असे. भाकरी खात खात घरी गेली की भाकरी लक्ष्मीबाईंच्या भाकरीच्या टोपलीत टाकी. 'त्यावेळी' त्या तिला रागवत असत; पण बेबीवर त्याचा काही परिणाम होत नसे. तेव्हा त्यांना सोवळे पाळणे कठीण जाऊ लागले. हळूहळू त्यांच्या स्वभावामध्ये बदल होऊ लागला व त्या वसतिगृहातील मुलांशी एकरूप झाल्या.

२५ फेब्रुवारी १९२७ रोजी वसतिगृहाला म. गांधीजींच्या हस्ते 'श्री छत्रपती शाहू बोर्डींग हाऊस' नाव देण्यात आले. त्याच वर्षी धनीणीची बाग बोर्डींगसाठी खंडाने घेण्यात आली. भाऊराव महिन्यातील पंधरा-वीस दिवस बोर्डींगच्या व इतर सार्वजनिक कामासाठी फिरतीवर जायचे. अशावेळी बोर्डींगची सर्व जबाबदारी लक्ष्मीबाईंवर येऊन पडत असे, तेव्हा त्या वसतिगृहातील प्रौढ मुलांच्या सहकार्याने संपूर्ण वसतिगृहाची देखरेख करीत असत. बोर्डींगमधील भोजन व शेतीसंबंधी सर्व कामावर लक्ष ठेवीत. मुलांचा स्वयंपाक वेळेवर व्हावा, विद्यार्थ्यांनी जेवण करून आपापल्या शाळेत वेळेवर जावे याची त्या दक्षता घेत. त्याखेरीज बाजारहाट, शेतीला पाणी देणे, माल विक्री यावरही लक्ष ठेवीत असत. मुलांचे जेवण झाल्यावरच त्या स्वतःचे जेवण घेत.

एकदा लक्ष्मीबाईची दाढ खूप दुखत होती. सातारा येथील औषधोपचाराने बरे न वाटल्यामुळे भाऊरावांनी त्यांना ओळखीच्या डॉक्टरांकडे पुण्याला पाठविले. त्यांच्याबरोबर आप्पालाल शेख या वसतिगृहातील विद्यार्थ्याबरोबर थोडा शिधा दिली, ते दोघे 'बादल' नावाच्या वसतिगृहातील माजी विद्यार्थ्याच्या घरी थांबले. लक्ष्मीबाईंनी दाढ दुखीचा त्रास जास्त होत असल्यामुळे त्यांना स्वतः स्वयंपाक करता येत नव्हता व सोवळे पाळत असल्यामुळे खाणावळीत किंवा हॉटेलमध्ये जेवण घेणे त्यांना अशक्य होते. तेव्हा शेख या विद्यार्थ्याने त्यांना पिठलं भात करून खाऊ घातला. तो त्यांनी आनंदाने खाल्ला. कुणाच्या हाताने अन्न न खाणाऱ्या लक्ष्मीबाईंनी एका मुस्लिम विद्यार्थ्याच्या हातचे जेवण खाल्ले. त्यामुळे त्यांचे सोवळे पार गळून पडले. त्या वसतिगृहाकडे जातीने लक्ष देऊ लागल्या. जर पाहुण्यांना त्यांनी विचारले, तुम्हाला मुले किती? मला पन्नास मुले आहेत, अशा त्या सांगू लागल्या वसतिगृहातील मुले व स्वतःची मुले यांच्यात त्या फरक मानत नसत. वसतिगृहातील मुलांच्या त्या माता बनल्या होत्या. वसतिगृह हेच एक त्यांचे कुटुंब झाल्यामुळे व्यक्तिगत कौटुंबिक जीवन त्यांना राहिले नव्हते.

सन १९३० च्या मकर संक्रांतीच्या सणाच्या वेळी वसतिगृहात फारच बिकट परिस्थिती निर्माण झाली. वसतिगृहातील सर्व धान्य संपले होते. पैसाही शिल्लक नव्हता. पूर्वीची उधारी राहिल्यामुळे व्यापारी उधार धान्य देण्यास तयार नव्हता. भाऊराव देणग्या जमा करण्यासाठी बाहेरगावी गेले होते. आतापर्यंत वसतिगृहाच्या अडीअडचणीला लक्ष्मीबाईंच्या अंगावरील जवळपास ६० तोळ्याचे सोन्याचे दागिने विकले गेले होते. आता विकण्यासाठी काहीही शिल्लक नव्हते. त्याचवेळी त्यांचे लक्ष गळ्यातील मंगळसूत्राकडे गेले. क्षणभर मनाची घालमेल झाली. लगेच आपल्या सौभाग्याचे लेणे असलेले मंगळसूत्र काढून त्याला ते गहाण ठेवून पैसे आणण्यास सांगितले. अशाप्रकारे वसतिगृहातील मुलांची खाण्या-पिण्याची अडचण त्यांनी दूर केली. ते गहाण ठेवलेले मंगळसूत्र नंतर सोडविता न आल्यामुळे विकून टाकावे लागले.

लक्ष्मीबाईंनी रयत शिक्षण संस्थेच्या जडणघडणीत तनमनधन अर्पण केले. म्हणून त्यांच्या परिसपर्शाने रयत शिक्षण संस्थेचे सोने झाले. इ.स. १९३० साली लक्ष्मीबाईंचे निधन झाले; पण त्यांनी मरणोत्तर आपली व्यक्त केलेली इच्छा म्हणजे बोर्डींगमध्ये सर्व जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश असावा व दुसऱ्या दिवशी पाडव्याचे जेवण सर्वांनी घ्यावे. या त्यांच्या विचारावरून त्यांच्यातील दूरदृष्टी व समाजहिताची सदोदित घेतलेली काळजी याची ग्वाही पटते. लक्ष्मीबाईंचा आदर्श व कृती ही भारतीय स्त्रियांना आजही प्रेरणा देणारी घटना आहे. त्याची आठवण म्हणून पुढे सौ. लक्ष्मीबाई पाटील मेमोरिअल एज्युकेशन फंड हा उपक्रम सुरू करण्यात आला. आज या फंडातून गरीब होतकरू आणि गरजू विद्यार्थ्यांना कर्जरूपाने शिक्षणासाठी अर्थसहाय्य

करण्यात येते. याचा फायदा हजारो विद्यार्थी आज घेत आहेत.

अण्णा आणि त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांनी विद्यार्थ्यांवर स्वतःच्या मुलाप्रमाणे प्रेम केले. श्रीमंत जैन घराण्यातून आलेल्या लक्ष्मीबाईंनी आपले ६० तोळ्याचे दागिने गरीब, अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या पालन पोषणासाठी खर्च केले. मी चालले या मुलांना सोडून कुठेही जाऊ नका, उद्या पाडव्याचा सण आहे, मी गेले तरी सर्वांना जेऊ घाला आणि बोर्डींगचे हे रोपटे मरू देऊ नका हे त्यांनी सन १९३० मध्ये मरण्यापूर्वी काढलेले अखेरचे शब्द होते.

सन १९४८ मध्ये एका समारंभात भाऊराव म्हणाले होते, मी सर्वांचे ऋण फेडीत आलो; परंतु माझ्या पत्नीचे ऋण मला आजतागायत फेडता आलेले नाही. खरोखरच लक्ष्मीबाईंनी जो त्याग केला, जे समर्पण केले त्याचे ऋण कर्मवीर डॉ. भाऊरावांप्रमाणेच कोणत्याही भारतीय व्यक्तीला फेडता येणार नाही.

डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म २२ सप्टेंबर १८८७ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज येथे झाला. त्यांचे मूळ स्थान संतावडे बुद्रुक आहे, जि. सांगली. ते दृढ जैन कुटुंबातून आले; परंतु त्यांनी कठोर धार्मिक संस्कार नाकारले आणि समाजातील धर्मनिरपेक्ष वाढीस अडथळा आणणाऱ्या सामाजिक समस्यांविरोधात संपूर्ण आयुष्य उभे केले. त्यांच्या शालेय दिवसात तो कोल्हापूरच्या तत्कालीन राजा, राजश्री छत्रपती यांच्या थेट प्रभावाखाली आला. शाहू महाराज, सामाजिक समानतेचे कडक वकील आणि महाराष्ट्राच्या मागासवर्गीय समुदायांसाठी शिक्षणाचे महान प्रवर्तक होते. महात्मा ज्योतीराव फुले यांच्यापासून प्रेरणा घेऊन आणखी एक महान सामाजिक सुधारक ओगले, किर्लोस्कर आणि कुपर्स येथे काम करत असताना भाऊराव आपला वेळ सत्यशोधक समाजाच्या कार्यात स्वतःला समर्पित करण्यासाठी वाचवू शकतील. महाराष्ट्राच्या गावांमध्ये सत्यशोधक जलसा करत आणि लोकांच्या सामाजिक दुष्ट परिणामांचे भयंकर परिणाम घडवून आणण्यासाठी वेळ आहे. १९१९ साली काळे (ता. कराड, जि. सातारा) येथील बोर्डींग हाऊस उघडताना रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक म्हणून सामाजिक आजारांवर उपाय होऊ शकले. हे लक्षात आले. लवकरच १९२४ मध्ये त्यांनी शैक्षणिक संस्थांचे मुख्यालय सातारा येथे हलविले. १९२० मध्ये महात्मा गांधींचे स्वातंत्र चळवळ आणि भाऊराव पाटील यांच्या मास शिक्षण चळवळीची सुरुवात झाली. भाऊरावांनी १९२१ मध्ये मुंबई येथे झालेल्या सार्वजनिक बैठकीत गांधीजींना पाहिले. ते केवळ गांधीजींना भेटण्यासाठी आश्चर्यचकित झाले. प्रचंड रॅलीमध्ये एक कपड्यांचे इतके खोलवर होते की त्यांनी आपल्या उर्वरित आयुष्यासाठी खडी घालण्याचा निर्धार केला.महात्मा गांधी देशासाठी राजकीय स्वातंत्र्य मिळविण्यासाठी कठोर परिश्रम करीत होते. कर्मवीर भाऊराव हे स्वभावाने बंडखोर होते होते.

१९३० च्या कामरे सत्याग्रहपर्यंत राजकीय स्वातंत्र्य किंवा सामाजिक सुधारणांना मुख्य चिंता मिळावी म्हणून भाऊराव हे अनिश्चित होते; परंतु त्यानंतर त्यांनी स्वतःला जनतेच्या शिक्षणासाठी समर्पित केले. त्यांच्या मते, जनतेस स्वातंत्र्यांच्या फळांचा आनंद घेण्यासाठी आणि त्यांना सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी सशक्त करण्याचे साधन म्हणजे शिक्षण.

आधुनिक महाराष्ट्राचा साधार, सविस्तर, सामाजिक, आर्थिक व राजकीय इतिहास अद्याप कोणीही लिहिलेला नाही. मराठी भाषिकांना इतिहासाचे वेड आहे हे खरे; मात्र त्यांच्याप्रमाणे महाराष्ट्रातील इतिहासकारी शरीराने विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात वावरत असले तरी मनाने मध्ययुगीन महाराष्ट्रातच वावरत आहेत. शिवछत्रपतींच्या उदयापासून ते पेशवाईच्या अस्तापर्यंतच्या काळातील कागदपत्रात खुपसलेले डोके वर काढण्यास आपल्या इतिहासकारांची अजूनही तयारी दिसत नाही. त्यामुळे आजही सत्यशोधक व ब्राम्हणेतर चळवळीसारख्या तसेच दलित मुक्ती आंदोलनासारख्या सामजिक चळवळीचा चिकित्सक इतिहास उपलब्ध नाही. या चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या महात्मा फुले, राजर्षी शाहू छत्रपती, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वगैरेंची चरित्रे, आठवणी वगैरे उपलब्ध आहेत; पण गुण व गौरवपर ग्रंथ, भक्तीभावाने लिहिलेली चरित्रे, उतारवयात सांगितलेल्या आठवणी किंवा आत्मवृत्ते म्हणजे काही इतिहास नव्हे. अशी पुस्तके ही इतिहासाची साधने असतात आणि इतिहास लिहिताना ती पारखून घ्यावी लागतात.

यादृष्टीने कर्मवीर भाऊराव पाटील यांची आजवर लिहिलेली गेलेली चरित्रे किंवा त्यांच्याबद्दल त्यांच्या निकटवर्तीयांनी सांगितलेल्या ठिकाणी या काळजीपूर्वक वाचल्यानंतर काही उणीवा जाणवतात. त्यांची प्रथम नोंद करावयास हवी. कर्मवीर भाऊरावांच्या शिक्षण क्षेत्रातील सामान्य कामगिरीबद्दल आजवर जितके लिहिले गेले आहे त्या मानाने त्यांच्या ब्राम्हणेत्तर पक्षातील व नंतर काँग्रेसच्या नेतृत्वाखाली चाललेल्या राष्ट्रीय चळवळीतील सहभागाविषयी लिहिले गेलेले नाही. सातारा जिल्हा ही त्यांची जन्मभूमी तशीच कर्मभूमी.

या जिल्ह्यात राजकारणात भाऊरावांनी बजावलेल्या कामगिरीबद्दल अधिक विस्ताराने व तपशिलवार लिहिण्यासारखे आहे.

# मा. शरदचंद्रजी पवार : एक दृष्टा नेता

– अमोल रणदिवे

आधुनिक महाराष्ट्राचा जलद गतीने, आणखी सर्वांगिण विकास साधणारे राजकीय नेते! आजच्या घडीला कोकणापासून विदर्भापर्यंत आणि उत्तर महाराष्ट्रापासून पश्चिम महाराष्ट्रापर्यंत खेड्यातील पारापासून मुंबईतील मंत्रालयापर्यंत आणि दिल्लीतील राजकीय वर्तुळापर्यंत सर्वाधिक चर्चेत असलेले राजकीय नेतृत्व म्हणजे शरद पवार होत.

आपला जनाधार व राजकारण यांच्या माध्यमातून केंद्रीय स्तरावर एक महाराष्ट्रीयन नेता म्हणून स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करणारे, दबदबा निर्माण करणारे नेते म्हणून यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर शरद पवार यांचे नाव निश्चितपणे घ्यावे लागेल. बारामती तालुक्यातील काटेवाडी या गावी शेतकरी कुटुंबातील जन्म ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व विविध खात्याचे केंद्रीयमंत्री हा त्यांचा प्रवास आश्चर्यकारक आणि राजकीय कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे.

राजकारण व समाजकारणाचे बाळकडू शरदरावांना त्यांच्या आईकडून मिळाले, असे म्हणता येईल. त्यांच्या आई शारदाबाई पवार या स्वातंत्र्यापूर्वी पुणे जिल्ह्यात स्थानिक राजकारणात कार्यरत होत्या. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या दरम्यान त्यांच्याकडे मान्यवरांचा राबता असे. हा शरदरावांच्या जडणघडणीचा काळ होता. बारामती येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या विद्यालयात शालेय शिक्षण; त्यावेळी वाद-वक्तृत्व स्पर्धांतील यश, क्रीडा स्पर्धा, सहली, स्नेहसंमेलने यांच्या आयोजनामधील त्यांचा पुढाकार; त्या काळातच गोवा मुक्ती आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी त्यांनी काढलेला मोर्चा... या गोष्टीतून त्यांच्यातील नेतृत्वाची चुणूक दिसत होती. त्यांच्यातील नेता विकसित होत होता. पुढे पुण्यातील नेता निर्माण होण्याकडे वाटचाल करीत होता. पुण्यातील बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय शिक्षण. घेतानाही जनरल सेक्रेटरी (जी. एस.) म्हणून एक विद्यार्थी नेता म्हणून ते महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावर कार्यरत होते.

येथूनच त्यांचा युवक काँग्रेसशी संबंध आला व ते पक्षीय राजकारणात प्रवेश करते झाले. आधुकि महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांना ते आपले राजकीय गुरू मानत. आजही मानतात. यशवंतरावांनीही पवार यांच्यामधील नेतृत्वगुण ओळखले होतेच. शरद पवार यांचा युवक काँग्रेस अध्यक्ष प्रदेश काँग्रेस कार्यकारिणी प्रतिनिधी... असा राजकीय प्रवास होत गेला. याच काळात त्यांनी महाराष्ट्रभर न थकता, डोळसपणे प्रवास केला. या काळात राज्यातील विविध भागातील सर्वसामान्य माणसांना तर ते भेटलेच; शिवाय साहित्य, अन्य कला, क्रीडा, समाजसेवा, उद्योग-पत्रकारिता आदी क्षेत्रातील दिग्गजांशी, मान्यवरांशी, अभ्यासकांशी पाच दिवस राज्यभर प्रवास करत आणि दोन दिवस मुंबईत राहत असत.

दरम्यान, वयाच्या अवघ्या २६-२७ व्या वर्षी ते आमदार झाले. पुढे ते प्रदेश काँग्रेस सरचिटणीस झाले. १९७४ मध्ये ते मंत्री झाले. आणि १९७८ मध्ये वयाच्या केवळ ३८ व्या वर्षी ते महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. १९७८, १९८८, १९९०, १९९३ असे चार वेळा त्यांनी विविध कालावधीसाठी मुख्यमंत्रीपद सांभाळले. दरम्यान, केंद्रीय संरक्षण खात्याची जबाबदारीही त्यांनी सांभाळली. सध्या ते त्यांनीच स्थापन केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत आणि केंद्रीय कृषी मंत्रीपदाची धुरा देखील सांभाळली आहे.

वरील एका परिच्छेदात आपण शरद पवार यांची सुमारे ४०-४५ वर्षाची यशस्वी कारकीर्द काही शब्दातच वाचली; पण या यशामागे प्रचंड कष्ट आहे. कामातील व्यग्रता, सखोल नियोजन, शिस्तबद्ध दैनंदिनी, त्यातील कमालीचे सातत्य, शांतपणा, विरोधकांनी कितीही आरोप-प्रत्यारोप केले तरी ते पेलण्याची धीरोदात्त वृत्ती, मुत्सद्दीपणा अन् दूरदृष्टी... असे असंख्य गुण त्यांच्यात आढळतात. प्रशासकीय कौशल्ये, कार्यकर्ते, नेते शोधण्याची नेमकी दृष्टी, प्रचंड जनसंपर्क, कार्यकर्त्यांशी थेट संपर्क... ही गुण कौशल्येही जोडीला आहेत. स्थानिक कार्यकर्ते, नेते, यांच्यामधील क्षमता ओळखून त्यांना राजकीय पटलावर

मोठी संधी देण्याचे काम शरद पवार यांनी वेळोवेळी केले. त्यातून दिलीप वळसे पाटील, आर. आर. पाटील, जयंत पाटील, अजित पवार, सुप्रिया सुळे आदी नेते महाराष्ट्रात पुढे आले.

आजही राज्य किंवा केंद्रीय स्तरावरील कोणतीही निवडणूक असल्यास प्रचार सभांची सर्वात जास्त संख्या शरद पवार यांची असते. त्यांचा एकूणच वेग व झपाटा अविश्वसनीय आहे. शरदराव राज्यात एवढे फिरले आहेत व फिरतात की त्यांना कोणत्याही एखाद्या वाहनचालकापेक्षाही अधिक नेमके रस्ते माहिती आहेत, असे म्हटले जाते. ही तर अगदी तांत्रिक (पण विशेष) बाब झाली. पण त्याचबरोबर ते रस्ते जिथे पोहोचतात, त्या गल्लीबोळातील, वाडी–वस्तीवरील माणसांच्या मनापर्यंत जाणारे 'रस्ते' शरदरावांना अगदी नेमके माहिती आहेत हे निश्चितच!

माजी सैनिकांच्या निवृत्तीवेतनात वाढ, फळबाग विकास योजना, पोलिसांची हाफ पँट जाऊन फूल पँट करण्याचा निर्णय, महाराष्ट्रात सहकार क्षेत्राचा साधलेला विकास, साखर कारखाने क्षेत्रातील योगदान, मुंबईतील दंगली, किल्लारी भूकंप या संकटांनंतर हाताळलेली परिस्थिती, महिला आरक्षण विषयातील भूमिका व निर्णय, महिला बचत गटांना बळ देण्याचे धोरण, राज्यातील वंचित घटकांसाठीचे त्यांचे धोरण व त्यांचे निर्णय... त्यांच्या राजकीय कारकिर्दीची अशी अनेक ठळक वैशिष्ट्ये सांगता येतील.

युनेस्कोच्या फुड फॉर हंगर ऐवजी कामाच्या मोबदल्यात राशन देण्याचे श्रेय साहेबांना जाते. त्यातून रोजगार हमी योजना उभी राहिली. आपले ज्येष्ठ बंधू आप्पासाहेब पवार यांच्या नेतृत्वाखाली १९७१ साली बारामती कृषी प्रतिष्ठानची स्थापना केली. पथदर्शी प्रयोग राबविले, 'घर तेथे संकरित गाय' गाव तेथे सहकारी दूध सोसायटी या सुत्राने बारामती तालुक्यात व नंतर हे मॉडेल राज्यभर नेऊन दुग्ध व्यवसाय वृद्धीगंत केला, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या माध्यमातून अनेक शेती, सहकार, शिक्षण, पर्यावरण अशा अनेक क्षेत्रात उपयुक्त कार्य रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष झाल्यानंतर संस्थेच्या शाळा, महाविद्यालय, आश्रमशाळांमध्ये मोठी भर, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टी रूजावी, संशोधक तयार व्हावेत, यासाठी रयत विज्ञान परिषदेची स्थापना केली.

आणीबाणीच्या काळात ५० ते ५५ वयाच्या सक्तीने निवृत्त केलेल्या कर्मचाऱ्यांना पवारांनीच पुन्हा कामावर घेतलं. मराठवाडा विद्यापीठाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं नाव देण्यात मोठे योगदान पवार साहेबांचे आहे. हिंगोलीसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नावे विद्यापीठ, लातूरच्या किल्लारी भूकंपावेळी तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी केलेल्या कामाला तोड नाही, ३ महिने तळ ठोकून होते. त्यामुळेच भूज भूकंपात तत्कालीन गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मागणीवरून शरद पवार हे केंद्राच्या आपत्कालीन मदत व्यवस्थेचे प्रमुख होते. दुसऱ्या हरित क्रांतीचे शिल्पकार म्हणून देश आज शरद पवार यांच्याकडे गौरवाने पाहतो.

कारकिर्दीच्या सुरुवातीपासून ते पुणे जिल्ह्यातील बारामती विधानसभा व लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत. बारामती एम.आय. डी. सी. विद्या प्रतिष्ठान (शैक्षणिक संस्था), कृषी विकास प्रतिष्ठान, शारदाबाई पवार शिक्षण संस्था आदी संस्थांच्या माध्यमातून त्यांनी बारामती परिसराचा सर्वांगिण विकास साधला आहे. रयत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदाची कारकीर्द हा त्यांचा आणखी एक वेगळा पैलू. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांच्यातील एक क्रीडाप्रेमी, आधुनिक नेता आपण अनुभवला.

शरद पवारांची स्मरणशक्ती हा अफलातून गुण आहे. आयुष्यात त्यांना एकदा भेटलेली माणसे पुढे दहा वर्षांनी भेटली तरी त्यांच्या लक्षात राहतात. आणि असं घडलेलही आहे. खेड्यापाड्यात सभेला गेल्यानंतर ते तेथील नेत्यांना, जुन्या जाणत्यांना अगदी नावानिशी हाक मारून त्यांच्याशी आदराने बोलतात. त्यांना मान देतात. समोरच्या व्यक्ती आपल्याला पवार ओळखतात एवढ्या आनंदातच त्यांची – कधी होते, ते कळतही नाही. अगदी तालुका स्तरावरच्या नेत्यांची नावेही पवारांच्या डोक्यात असतात.

पवारांना वाचनाची आवड आहे. त्यांच्या वैयक्तिक संग्रहात अनेकदा नवीन आलेली पुस्तके आढळतात. मुंबईत पु. ल. देशपांडे भवन उभारण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. यशवंतराव चव्हाण यांचा मोठा वाटा आहे. यशवंतराव

चव्हाण यांच्या स्मृत्यर्थ उभारलेल्या चव्हाण सेंटरतर्फे म्हणूनच अनेक सांस्कृतिक व साहित्यिक कार्यक्रम होतात. कारण त्याची प्रेरणा शरद पवार आहेत. परवा साहेबांची सभा फार गाजली. त्यांच्या राजकारणाच्या चालीही त्यांच्या शांत व्यक्तिमत्वाला गूढ बनवतात. म्हणूनच अनेकदा ते काय करतील याचा थांग जवळच्यालाही लागत नाही. १९७७ मध्ये वसंतदादांचे सरकार पाडण्याच्या प्रसंगातही त्यांनी या कानाचे त्या कानालाही कळू दिले नव्हते. त्यांच्या कारकिर्दीतील आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे १९९१ मध्ये छगन भुजबळांसह बारा आमदारांना त्यांनी काँग्रेसच्या झेंड्याखाली आणले. शिवसेनेला फार मोठा धक्का देण्याचे काम पवारांनी या कृतीने केले. अर्थातच शिवसेना या कृत्याने चवताळली; पण काही करू शकली नाही. आजही भुजबळ पवारांसोबतच आहे. त्यांचा एखाद्या चालीत झालेला पराभव ते लक्षात ठेवून दुसऱ्यावेळी त्यात यश कसे मिळेल ते पाहतात. त्यासाठी योग्य अभ्यासही करतात. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे अध्यक्षपद हे त्याचे उदाहरण आहे.

पवारांना माणसं चांगली ओळखता येतात. नेतृत्वगुणांची त्यांना चांगली पारख आहे. अनेकदा एका व्यक्तीने काढलेले पक्ष हे खासगी संस्थान होऊन जाते. त्यात इतरांना फारसे स्थान नसते. राष्ट्रवादी काँग्रेसचे तसे नाही. तेथे इतरांच्या मतालाही तितकीच किंमत आहे. आर. आर. पाटील हे त्याचे उदाहरण. त्यांनीच त्यांच्यातील गुणवत्ता हेरून त्यांना पुढे आणले. उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी दिली. योग्य मंडळी योग्य जागी हे त्यांचे धोरण म्हणूनच त्यांनी सुरू केलेल्या संस्थावरची मंडळी चांगल्या पार्श्वभूमीची असतात. यशवंतराव चव्हाण सेंटरची जबाबदारी सध्या काँग्रेसमध्ये असलेल्या विनायकदादा पाटील यांच्यावर सोपविली आहे.

पवारांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू आहेत. त्यांचा वेधही घेणे अवघड आहे; पण एक बाब मात्र खरी आहे की पवारांशिवाय महाराष्ट्राचा इतिहास पूर्णच होऊ शकणार नाही. ''काटेवाडी ते मंत्रालय'' ''शरद पवार आणि मी'', ''आम्ही पाहिलेले शरद पवार...'' आदी पुस्तकांतून शरदरावांचे व्यक्तिमत्व व कारकीर्द उलगडत जाते. शरदराव पवार यांच्या आतापर्यंतच्या यशस्वी कारकिर्दीमुळे त्यांना ''जाणता राजा'' असे म्हटले जाते.



# स्टीफन हॉकिंग : एक प्रेरक जीवनप्रवास

तेजस्विनी शेळके

शालेय स्तरावर कुठेही न चमकणाऱ्या स्टीफनने महाविद्यालयीन जीवनात मात्र चमकण्याशिवाय काहीही केले नाही. अफाट बुद्धिमत्तेने सर्वांना अचंबित करणे जणू त्यांचा उद्योगच बनला होता. वयाच्या २१ व्या वर्षी या बुद्धिवंताला ए.एल.एस. या असाध्य आणि दुर्मिळ रोगाने गाठले. जीवनाविषयीचे प्रचंड प्रेम, कार्यमग्नता, होकारात्मक जीवनपद्धती या गुणांच्या आधारे त्यांनी आपल्या दुर्धर शत्रुवर मात केली आणि कृष्णविवरासंदर्भातल्या संशोधनाने जगाला आश्चर्यचकित करून सोडले.

स्टीफन यांना आपल्या या संशोधनाचा प्रचंड अभिमान होता. ते म्हणत, ब्रम्हांडाला समजून घेण्यात मी माझी भूमिका पार पाडली, याचा मला सर्वाधिक आनंद होतो. ब्रम्हांडाची रहस्ये लोकांना खुली करण्यासाठी जे संशोधन होत होते त्यामध्ये मी माझे योगदान देऊ शकलो. जेव्हा माझे कार्य समजून घेण्यासाठी लोक माझ्याभोवती गर्दी करतात, तेव्हा मला त्याचा अत्यंत अभिमान वाटतो.

स्टीफन यांचा जन्म ८ जानेवारी, १९४२ रोजी झाला. फ्रँक आणि इसाबेल हॉकिंग या दाम्पत्याने ऑक्सफर्ड, इंग्लंड येथे या बालकाला जन्म दिला. हॉकिंग यांना संगीत, वाचन, गणित आणि भौतिकशास्त्र या विषयांची आवड विद्यार्थी दशेपासूनच होती. वयाच्या १७ व्या वर्षी कॉस्मॉलॉजी हा विषय निवडून त्यांनी युनिव्हर्सिटी कॉलेज, ऑक्सफर्ड येथे प्रवेश घेतला. तेथे त्यांना स्कॉलरशिपसुद्धा मिळाली. ऑक्सफर्ड येथून पदवी संपादन करून त्यांनी केंब्रिज विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. महाविद्यालयात असताना त्यांना मित्र आईस्टाईन म्हणून चिडवत.

स्टीफन यांचे लग्न जेन वाईल्ड यांच्याशी झाले होते. त्यांच्यापासून त्यांना रॉबर्ट, लुसी व तिमोशी ही अपत्ये झाली. पुढे त्यांचा दुसरा विवाह इलेनी मेसन यांच्याशी झाला. लुसी या आपल्या मुलीसोबत त्यांनी मुलांसाठी अनेक पुस्तकेही लिहिली आहेत.

स्टीफन यांना १२ मानद पदव्या मिळालेल्या आहेत. अनेक गौरव त्यांना प्राप्त झाले आहेत. अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कारांचा त्यांच्यावर वर्षाव झालेला आहे. ब्रिटनच्या महाराणीकडून 'ऑर्डर ऑफ द ब्रिटिश एम्पायर' या पुस्तकाने ते सन्मानीत आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्या हस्ते त्यांना अमेरिकेचा सर्वोच्च नागरी पुरस्कार 'राष्ट्राध्यक्ष पदक' देऊन गौरविण्यात आले आहे. अवघ्या ३२ व्या वर्षी ते रॉयल सोसायटीचे सदस्य बनले होते.

'अ ब्रीफ हिस्ट्री ऑफ टाईम' या त्यांच्या पुस्तकाने अनेक विक्रम मोडले. नवे विक्रम प्रस्थापित केले. या पुस्तकावर आधारित पुस्तके, मालिका, चित्रपट असे जणू एक चक्रच सुरू राहिले. 'द थेअरी ऑफ एव्हरीथिंग' हा त्यांच्या जीवनावरील चित्रपट अत्यंत गाजला. 'झीरो ग्रॅव्हिटी' यानातून अवकाशात यात्रा करण्याचे त्यांचे स्वप्नही पूर्ण झाले.

स्टीफन विश्वाला नियंत्रित करणाऱ्या मुख्य नियमांवर काम करण्यात स्वतःला धन्य मानत. रॉजर पेनरोज यांच्या सहकार्याने त्यांनी आईनस्टाईन यांच्या सापेक्षतेचा साधारण सिद्धांत (जनरल थेअरी ऑफ रिलेटिव्हिटी) वर आधारित अवकाश व काळाला बिग बँगमध्ये सुरुवात असेल तर कृष्णविवरात शेवट असेल हा सिद्धांत मांडला. त्याच्या परिणामांनी हे सिद्ध केले की, साधारण सापेक्षता (जनरल रिलेटिव्हिटी) आणि पुंज यामिक (क्वांटम थेअरी) ला एकत्र करणे आवश्यक आहे. २० व्या शतकातील हा पहिला सर्वोत्कृष्ट आविष्कार होता.

पुढे त्यांचा शोध होता की, कृष्णविवरे पूर्णतः काळी नसतात. कृष्णविवरे उत्सर्जन (रेडिएशन) करतात. ती पुढे अदृश्य होतात. ब्रम्हांडाला कोणतीही सीमा नाही, काळाच्या कल्पनेत ही मांडणीही त्यांनी केली. विज्ञानाच्या नियमांनीच हे विश्व चालविले जाते अशी मांडणी करणे सोपे झाले.

विज्ञान विषयात काम करीत असतानाच हॉकिंग यांनी अपंग लोकांसाठी, त्यांच्या सोयीसाठी आणि त्यांच्यावरील अन्यायाने पेटून उठून लढा दिला. त्यासाठी हॉकिंग यांना 'रॉयल असोसिएशन डिस ॲबिलिटी ॲण्ड रिहॅबिलिटेशन'

या संस्थेकडून 'मॅन ऑफ द इअर' हा किताब १९७९ मध्ये देण्यात आला होता. सुरुवातीच्या काळात अशक्तपणा जाणवणे, अडखळत बोलणे, अन्न गिळताना त्रास होणे, हळूहळू चालणे, फिरणे, आणि बोलणे बंद होत जाणे ही लक्षणे आहेत. स्टीफन यांना झालेल्या रोगाला इंग्लंडमध्ये याला मोटर न्यूरॉन डिसीज, तर अमेरिकेत अमायो ट्रॉपिक लॅटरल स्क्लोटोसिस असे म्हणतात. २१ व्या वर्षी ते केवळ दोन वर्षे जगतील, असे सांगण्यात आले होते; परंतु व्हिलचेअर आणि संगणकाच्या साहाय्याने हा विलक्षण माणूस अगदी कालपर्यंत आपल्यात होता. संपूर्ण शरीर मांसाचा गोळा झालेले, फक्त गालांचे स्नायू हलत त्याद्वारे ते डोळ्यांना संदेश पोहचवत आणि संगणकाच्या मदतीने बोलत. ऑगस्ट २०१५ मध्ये ते म्हणाले होते, 'कृष्णविवरात अडकला असाल, तर घाबरून जाऊ नका. बाहेर पडायला मार्ग मिळेल. कदाचित दुसऱ्या विश्वात तुम्ही प्रवेश कराल.' सगळेच गोंधळून गेले होते. ते पुन्हा म्हणाले, 'कृष्णविवरात हरवलेली माहिती एका विशिष्ट पद्धतीने पुन्हा परत मिळवता येऊ शकते.' हा खेळकरपणा त्यांनी आयुष्यभर जपला.

हा म्हणावा तर चमत्कारच; पण चमत्कार आणि देव स्टीफन यांनी कधीही मानले नाहीत. नोबेलपासून दूर कसे राहिले? हेही एक गूढच. जिज्ञासू, आशावादी, तरीही वास्तवदर्शी स्टीफन यांना अजूनही अवकाश सफरीमध्ये रस होता. स्टीफन हॉकिंग भारत दौऱ्यावर आले असता तत्कालीन राष्ट्रपती के. आर. नारायणन त्यांना भेटले होते. त्यांच्या भेटीचे वर्णन त्यांनी 'अविस्मरणीय भेट' असे केले होते. ते म्हणाले होते, 'स्टीफन हॉकिंग' हे मानवासाठी आशेचा किरण आहेत आणि अशा सर्वांसाठी जे एका अर्थी अपंग आहेत त्यांच्यासाठी ते प्रेरणास्थान आहेत. एका असामान्य व्यक्तिमत्वास आपण मुकलो आहोत. त्या महान व्यक्तीचे तोंडचे पुढचे उद्‌गार सर्वच पिढीसाठी मार्गदर्शक ठरावेत.

'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या किंवा आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या क्षेत्रात सध्या झालेली प्रगती पुरेशी आहे. डिजिटल टेक्नॉलॉजीकडे आपल्या जीवनाचे सुत्र सोपवताना आपली उत्स्फूर्त बुद्धिमत्ता गलितगात्र होईल. एकूणच औद्योगिक निर्मितीने दिलेले स्वातंत्र्य यांत्रिकी असहाय्यतेच्या पारतंत्र्याकडे वळेल. याचे कारण सोपे आहे. मानवी उत्क्रांतीचा वेग हा सांख्यिक उन्मेषाच्या वेगापेक्षा अनेक पटीने कमी आहे.



# टर्निंग पॉईंटस्

– उज्वला गाडेकर

अबुल पाकिर जैनुलाब्दीन कलाम हे २००२ ते २००७ ह्या कालावधीत भारताचे ११ वे राष्ट्रपती होते. त्यांना 'पद्मभूषण' आणि 'पद्‌विभूषण' हे पुरस्कार मिळाले आणि नंतर राष्ट्राचा सर्वोच्च नागरी पुरस्कार 'भारतरत्न' देऊन त्यांना गौरवण्यात आले.

'विंग्ज ऑफ फायर' ह्या पुस्तकात १९९२ पर्यंतच्या त्यांच्या आयुष्याबद्दल लिहिले आहे. हजारो लोकांवर त्या पुस्तकाचा चांगला प्रभाव पडलेला दिसतो, ज्यामुळे त्यांच्या आयुष्यात चांगला बदल घडवून आणण्यास त्यांना मदत झाली.

'टर्निंग पॉईंटस्' लिहित असताना अब्दुल कलाम यांनी असा विचार केला की, माझ्या आयुष्याबद्दलच्या लेखनातून अनेक भारतीयांच्या चिंता, अडचणी आणि आकांक्षा ह्याचा प्रतिध्वनी उमटतो. मीही सामान्य माणसासारखेच शिडीच्या अगदी खालच्या पायरीपासून आयुष्य सुरू केले. माझी पहिली नोकरी वरिष्ठ सहाय्यक शास्त्रज्ञ म्हणून होती. हळूहळू मला जास्त मोठ्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या आणि शेवटी मी भारताचा राष्ट्रपती झालो. हे सर्व अतिशय चित्तथरारक अनुभव त्यांनी या पुस्तकातून सांगितले आहेत. ए.पी.जे. अब्दुल कलामांना २००५ साली राष्ट्रपतीपदाची संधी चालून आली. या पाच वर्षाच्या काळात त्यांनी देशातल्या कितीतरी तरुणांशी संवाद साधला. या काळातले अनुभव, भाषणे यांचा समावेश टर्निंग पॉईंटस् या पुस्तकामध्ये करण्यात आला आहे.

ह्या कथेत अब्दुल कलामांच्या कारकिर्दीतल्या आणि राष्ट्रपतीपदाच्या कालावधीतल्या कोणाला फारशा ठाऊक नसलेल्या काही विवादास्पद घटनांबद्दलच्या अनेक बारीक सारीक गोष्टी प्रथमच समोर येतात. यातून एका असामान्य व्यक्तिमत्वाचे अंतरंग तर समजतेच; पण प्रयत्न केले; चिकाटी ठेवली आणि आत्मविश्वास असला तर अनेक सिद्धी मिळवून, कौशल्ये आणि सामर्थ्य मिळवून महान वारसा असलेला हा देश पुन्हा महान कसा होऊ शकेल, त्याची संकल्पना मिळते. सर्वात विशेष म्हणजे ही गाथा आहे एका व्यक्तीने स्वतः आणि इतरांना बरोबर घेऊन केलेल्या प्रवासाची. जो प्रवास भारताला २०२० पर्यंत आणि नंतरही एक 'विकसित राष्ट्र' म्हणून उभे करेल.

भारतीय राजकारणातून कलामांची स्वतःची जीवनशैली अपेक्षित होती. त्यासाठी हे पुस्तक निराशाजनक आहे. कलामांची विकासाची कल्पना फारच नाविण्यपूर्ण आहे आणि आपल्या देशातील इतर कोणीही त्यांच्यासारख्या पद्धती सुचविल्या नाहीत. हे पुस्तक खूप प्रेरणादायक आहे. भारतासाठी त्यांच्या दृष्टीकोनातून वाचले आणि त्यांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी काही उपाय योजण्यांसाठी कोणते उपाय केले ते वाचले. भारतातील न्याय व्यवस्था संसद आणि कार्यकारी यांना त्यांच्या कार्यकाळात अधिक कार्यक्षम बनविण्यासाठी सर्व क्षेत्रे, विद्यार्थी, मुले, शास्त्रज्ञ इत्यादीमधील लोकांशी केलेल्या त्यांच्या संवादांमुळे त्यांनी भारताचा विकास करण्यासाठी मिळालेल्या विविध कल्पनांवर चर्चा केली आहे. विकासाचे दहा स्तंभ आहेत. कोर्टाने न्याय मिळवून देण्यात विलंब केल्याचे 'पाच' कारणे आणि त्यांना 'g' असे सुचविण्यात आले. गावाच्या विकासाच्या अर्थावरील चार मुद्दे आणि आमच्या संसदेला कार्यात्मक बनवण्यासाठी काही सतरा मुद्दे. त्यांनी पुढेही म्हटले आहे की, पुढे जाण्यासाठी भारताने तंत्रज्ञानाचा अवलंब केला पाहिजे. ई–गव्हर्नन्सच्या वापरामुळे भारतातील आधुनिक काळातील समस्या कशा सोडवता येतील याबद्दल त्यांनी स्पष्ट केले आहे. इंदिरा गांधी यांना महान राजकारणी असे संबोधून, सुधारित प्रतिमा असलेल्या आर्थिक सुधारवाचे आर्किटेक्ट डॉ.सिंग यांनी आपल्या आयुष्यातील भेटलेल्या प्रत्येक राजकीय नेत्याला चांगले वाटले. संपूर्ण पुस्तकात त्यांची नम्रता दिसून येते आणि त्यांनी कोणत्याही प्रकटीकरणातून उद्‌भवलेल्या कोणत्याही विवादाला टाळण्यासाठी सर्व प्रयत्न केले आहेत. २०१२ मधील राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीच्यावेळी हे पुस्तक कालबाह्य झाले होते. त्यासाठी त्यांचे नावही ड्रॅग केले गेले होते. भारतीय राजकारणावरील किंवा कलामांच्या स्वतःच्या जीवनावरील मनोरंजक आक्षेपांची अपेक्षा करणाऱ्यांना पुस्तक निराशाजनक आहे.

काही प्रसंगी ते आपल्या वडिलाबद्दल आणि भावांबद्दल कथा सांगतात; परंतु शेवटी पंचवटीत जसे त्या घटनांमधून

शिकलेले नैतिक धडे त्यांनी सांगितले आहेत.

कलामांची अशा आहे की, त्यांचे पुस्तक त्यांच्या वाचकांसाठी प्रेरणादायी असेल. वेगवान निर्णयामध्ये ते तंत्रज्ञानाच्या वापराबद्दल आपला मुद्दा योग्य बनविण्याचा प्रयत्न करतात. हे दर्शविण्यासाठी ते २००५ मध्ये बिहार विधानसभा विसर्जनाविषयी बोलतात. जे त्यांनी पंतप्रधान सिंग यांच्या आगमनाद्वारे मॉस्कोकडून केले होते.– मेल! निर्णय हा विवादास्पद होता आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर त्याला राजीनामा देण्याचा निर्णय घेताना डॉ. सिंह यांनी सरकारला वाचवण्यासाठी भावनात्मक आवाहन केले. कलाम हे शब्द सांगून प्रकरण संपवतात.

''देशात खूप कमी लोक ई–गव्हर्नन्सचा वापर करीत आहेत. जे मी अमर्याद जगासाठी साधन मानतो. ही सुविधा मी भारत आणि परदेशात उदारपणे वापरतो.''

इंदिरा गांधी महान राजकारणी म्हणतात, सुधारित प्रतिमा असलेल्या 'आर्थिक सुधारणांचे आर्किटेक्ट' डॉ. सिंह आणि अशाप्रकारे त्यांनी त्यांच्या जीवनात भेटलेल्या प्रत्येक राजकीय नेत्याला छान करण्याचा प्रयत्न केला. संपूर्ण पुस्तकात नम्रता दिसून येते.

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम म्हणतात, माझा ठाम विश्वास आहे की, भ्याड लोक इतिहास घडवत नाहीत, धैर्यवान आणि शहाणे लोक इतिहास घडवतात. धैर्य हे उपजत असते व शहाणपण अनुभवाने येते. राष्ट्रपती ह्या नात्याने समाजातल्या सर्व स्तरांमधील लोकांना भेटण्याची संधी मला मिळाली. ह्या भेटींचा, त्यांच्याशी साधलेल्या संवादाचा उपयोग मी लोकांना समजून घेण्यास तसेच त्यांच्या आकांक्षा, त्यांच्यापुढील आव्हाने समजून घेण्यास केला. तितकेच महत्वाचे म्हणजे, एका समान राष्ट्रीय ध्येयासाठी मी लोकांना एकत्र आणू शकलो. संस्कृती व जीवनमूल्ये ह्यांच्या एका धाग्याने शंभर कोटी लोकांना जोडण्याचे माझे स्वप्न आहे. आपले महान प्राचीन ग्रंथ आपल्या वैभवशाली भूतकाळाची आठवण आपल्याला करून देतात आणि त्यांच्यामध्येच एका सुंदर भविष्यकाळाची आशाही आहे.

चांगल्या लोकांना भेटण्याचा अनुभव, हेच एक प्रकारे शिक्षण असते. मी भाग्यवान आहे की, मला आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर साधारणपणे वेगवेगळी माणसे भेटतात, त्यातून खूपच जास्त चांगली माणसे भेटली.

'National economic development is powered by competition. Competition is powered by knowledge, knowledge is powered by technology & innovation.

'स्पर्धा असेल तरच देशाचा आर्थिक विकास होतो. ज्ञान असेल, तर स्पर्धा करणे शक्य असते. तंत्रज्ञान आणि नव्या कल्पना, नवी पद्धत ह्यांनी ज्ञान वाढते.'

देशातील बहुसंख्य जनता खेड्यामध्ये राहते आणि तेथे राहणाऱ्या पंचाहत्तर कोटी लोकांचे जीवन जास्त चांगले व्हावे, ह्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करणे, हेच वैज्ञानिकांसमोरचे खरे आव्हान आहे. तसेच तुम्ही केलेले एखादे महत्वाचे योगदान असू शकेल किंवा लावलेला शोध, तुमची एखादी नवी कल्पना, समाजात तुम्ही घडवून आणलेला एखादा बदल जो देशाला तुमची आठवण करून देईल.

'एअरबोर्न सर्व्हेलन्स प्लेटफॉर्म दुर्घटना,' ही कलामांच्या आयुष्यातील अत्यंत दुःखद घटनांपैकी एक होती; परंतु अशी अपयशे आपल्याला जास्त कणखर बनवतात हे त्यांनी सांगितले.

'विंग्ज ऑफ फायर' नंतरचा स्फूर्तीदायक भाग ए.पी.जे. अब्दुल कलामांचे 'टर्निंग पॉईंटस्' आव्हाने पेलत केलेली वाटचाल यातून एका असमान्य व्यक्तिमत्वाचे अंतरंग तर समजतेच, पण प्रयत्न केले, चिकाटी ठेवली आणि आत्मविश्वास असला, तर अनेक सिद्धी मिळवून महान वारसा असलेला हा देश पुन्हा महान कसा होईल याची दिशा मिळते.



# एक प्रेरणादायी जीवनप्रवास : हेलर केलर

**– दीपाली साळुंके**

'द स्टोरी ऑफ माय लाईफ' ही हेलन केलरची आत्मकथा आहे. जेव्हा तिची २० व्या राडक्लिप महाविद्यालयात दाखल झाली होती. केलरच्या कथेच्या काही भागांमुळे बरेच वाचक ओळखीचे असतील १८८० च्या जून महिन्यात जन्माला आल्यापासून ते १९ महिने वयापर्यंत आंधळे आणि बहिरे होते. पुस्तक केलरच्या ठिकाणे आणि ध्वनीच्या सर्वात जुन्या आठवणींसह पुस्तक सुरू होते. हा भाग अस्पष्ट, जवळजवळ भागांमध्ये स्वप्नासारखा आहे. जो कोणत्याही वाचकांना समजेल, जो भूतकाळातील भूतकाळातल्या आठवणींमधून आलेल्या आठवणी किंवा इंप्रेशनवर विश्वास ठेवतो.

आजारपणाच्या सुरुवातीच्या अवस्थेच्या मागे जाताना, स्टोरी ऑफ माई लाईफवरील मुख्य जोर ॲन सुलिव्हानच्या केलरच्या प्रशिक्षणावर खर्च केला जातो. हेलनच्या मदतीसाठी प्रयत्न करताना, तिचे आई–वडील अलेक्झांडर ग्राहम बेलला भेटायला गेले होते जे बहिरे मुलांच्यावतीने काम करत होते.

बेलच्या माध्यमातून ॲन सुलिव्हान केलरच्या घरी पोहोचू लागतात. सुलिव्हानही आंधळे होते, तरीही केलर म्हणून तिला भाषा अधिग्रहण करण्यास अडथळा आला नाही. कारण ती अजूनही ऐकू शकत होती. सुलिव्हान तेव्हा केवळ वीस वर्षाचा असताना त्याने हेलन बरोबर काम करण्यास सुरुवात केली.

केलरच्या जाणवलेल्या तीव्र अलगावचे पुस्तक हे प्रारंभीक भाग आहेत. संवेदनक्षम इनपुटच्या अभावामुळे तिला नाकारण्यात आला होता. म्हणून तिला तिची परिस्थिती समजून घेण्याचा कोणताही मार्ग नव्हता. कारण सुलिव्हानच्या आधी कोणीही तिला गोष्टी समजावून सांगू शकत नव्हते. सुलिव्हान त्वरेने हेलनला साइनिंगद्वारे संवाद साधण्यास शिकवण्याचा प्रयत्न करीत असे. ती हेलनच्या हस्तलेखातून अक्षरे लिहिते, तिला वेगवेगळ्या वस्तूंसह आकार जोडण्यासाठी पत्रे लिहिण्याचा प्रयत्न केला. ब्रेकथ्रू क्षणापर्यंत हेलेन या प्रयत्नांनी मोठ्या प्रमाणात निराश झाला. सुलिव्हान तिच्या हातात एक काठी ठेवते आणि तिच्या हस्तरेखातील 'मग'' बोलण्याचा प्रयत्न करते, तेव्हा केलर त्या गोंधळात पडलेल्या समजुतीच्या अभावामुळे इतकी संभ्रमात होती.

केलरच्या कथेतील सर्वात प्रसिद्ध उदाहरण आणि मिरॅकल वर्कर्ससह अनेक रुपांतरणे हे सर्व क्लिक झाल्यावर क्षण आहे. केलरच्या हथेवर पाणी चालवताना आणि ''पाणी'' साठी आकार तयार करताना ते अचानक स्पष्ट होते. लवकरच, केलर निराशाच्या पॅरगॉनमधून प्रेक्षकांकडे वळते. तिच्या पहिल्या वर्षांनी तिला अधिग्रहण करण्यास मनाई केली. या ज्ञानाबद्दल ती अत्यावश्यक आहे. त्यांच्या महत्त्वाकांक्षी अभ्यासामध्ये द स्टोरी ऑफ माई लाईफ त्याच्या मुख्य थीमपैकी एक दर्शविते. भाषा शक्तिशाली आहे आणि ज्ञान लोकांना लोकांचे जीवन चांगले बनवते.

एखाद्याची परिस्थिती समजावून सांगण्यामध्ये गोष्टीची नाव देण्याची शक्ती असते. भाषेच्या साधने नाकारल्या, केलर तिच्या आई वडिलांसोबत बंधने ठेवण्याबद्दल किंवा भविष्याबद्दल धोरण ठरविण्याबद्दल काहीही सांगण्यासाठी तिच्या स्वतःच्या परिस्थितीबद्दल स्पष्टपणे विचार करण्यास असमर्थ ठरली. रॅडक्लिप कॉलेजमधून बाहेर पडल्यावर पुस्तकांपैकी एक भाग संपतो, वाढण्याची आणि शिकण्याची इच्छा वाढते.

भाग २ मध्ये केलरच्या कुटुंबास आणि मित्रांना लिहिलेली पत्रांची मालिका समाविष्ट आहे. एखाद्या भाषेत स्वतः भाषेसह, संघर्ष, कोणीतरी पाहण्यासारखे आहे. तिने स्पष्टपणे कबूल केले की, मौखिक भाषण तिच्याकडून अजूनही अवस्थ आहे आणि ती सुधारित करण्याची क्षमता असल्याची तिला खात्री नाही आणि म्हणून ती लिहिते. अशाप्रकारे केलर पुस्तकाच्या प्रकाशनाच्या वेळी आधीच अनेक लेख प्रकाशित केले असले तरी द स्टोरी ऑफ माई लाईफ हे स्पष्ट केलेल्या थीमचे कार्य प्रदर्शन आहे. केलर प्रत्येक परिच्छेदासह पृष्ठावर सुधारते. पुस्तकाचे प्रत्येक हप्ता त्यांच्यासाठी एक विजय होते.

'द स्टोरी ऑफ माई लाईफ'ला मोठ्या प्रमाणावर प्रशंसा मिळाली. जे लोक टीका करतात ते बऱ्याचदा केलरच्या जीवनशैलीच्या राजकारणात अडचणी घेतात. ती एक उत्साही समाजवादी आणि कार्यकर्ते होती. आणि तिच्या फायर ब्रॅण्डची स्थिती तिच्या आत्मकथा पाहण्याच्या उद्देशाने विरोध करणाऱ्या लोकांसाठी अशक्य बनली आहे आणि तरीही, जो कोणी खुल्या मनाने पुस्तकात पोहचू शकेल त्यासाठी येथे बरेच काही शिकले पाहिजे, असे आहे.

# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

– प्राजक्ता लंके

'विठ्ठल रामजी शिंदे' यांना या देशातील मानवमुक्तीचे पहिले प्रणेते म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. थोर माणसाच्या ठिकाणी असणारे काळाचे भान आणि त्या वर्तमानकाळाच्या पलिकडे बघण्याची दृष्टी असते, ती त्यांच्यात होती. म्हणूनच या देशात गेल्या शतकात सामाजिक सुधारणेचे जे प्रयत्न झाले त्या प्रयत्नवादी चळवळीचे ते अग्रणी होते. त्यांनी सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि आर्थिक विषमतेविरुद्ध आयुष्यभर संघर्ष केला.

आयुष्यभर ते समाजासाठी दीन–दुबळे, शुद्रतिशुद्र म्हणवणाऱ्यांसाठी, स्त्रियांसाठी, मुलींसाठी झिजले. त्यांचे सगळे आयुष्य म्हणजे समाजप्रबोधनाचे, त्यांच्या जागरणाचे एक धगधगते अग्निकुंड होते. अंधश्रद्धा निर्मूलन व्हावे यासाठी त्यांनी काँग्रेस अधिवेशनात अस्पृश्यता निवारणाचा ठराव मांडला.

ते मानवतावादी होते. माणसाला जन्माने धर्म न मिळता तो त्याला स्वतःच्या बुद्धिने स्वीकारता आला पाहिजे. त्याचप्रमाणे मुलांप्रमाणे मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तिचे व्हावे यासाठीही प्रयत्न केले. असहकारिता चळवळीत सहभाग घेऊन सहा महिने कारावास भोगला.

विठ्ठल रामजींचे जीवन म्हणजे महाराष्ट्रातील वेगवेगळ्या चळवळींचा इतिहास वेगवेगळ्या निमित्तांनी त्यांनी समाजाला सतत मार्गदर्शन केले. भाषणे दिली, लेख लिहिले. त्यांच्या कार्याचे वेगवेगळे पैलू आहेत. त्यामुळे त्यांच्या वैचारिक लेखनातही विविधता आहे.

ब्राम्हो समाजाचे व प्रार्थना समाजाचे प्रचारक म्हणून ते धार्मिक विचार मांडतात. अस्पृश्यता निवारण परिषदांना मार्गदर्शन करताना अस्पृश्यांना प्रश्नांना हात घालतात. स्त्रियांच्या संगत सभांमधून महिलांचे प्रश्न मांडतात. शेतकरी परिषदांना मार्गदर्शन करताना कृषीविषयक समस्या लक्षात घेतात, तर समाजसुधारणांचा पुरस्कार करताना जातीभेद, ब्राम्हण–ब्राम्हणेत्तर वाद अशा समस्यांवर प्रकाश टाकतात. हे सर्व आपल्यासाठी उपयोगी आहे.

विठ्ठलरावांवर लहानपणी वारकरी संप्रदायाचे संस्कार झाले होते. महाविद्यालयात असताना मिल, स्पेन्सर हे पाश्चात्य लेखक आणि आगरकर यांच्या नास्तिकवादी विचारांचा प्रभाव काही काळ होता. पुण्यात न्या. रानडे, डॉ. भांडारकर यांच्या विचारांच्या प्रभावामुळे आणि सहवासामुळे ते प्रार्थना समाजाकडे आकर्षित झाले.

इंग्लंडमधून ते 'सुबोधपत्रिका'साठी लेख पाठवत असत. भारतात परतल्यानंतर ते प्रार्थना समाजाचे प्रचारक झाले. त्यांनी वेळोवेळी धार्मिक विषयांवर व्याख्याने दिली. उपासना चालविल्या. उतारवयातही 'कौटुंबिक उपासना' मंडळे काढली. त्यामुळे त्यांचे धर्मविचार प्रगल्भ होते. ईश्वराचे स्वरुप केवळ बौद्धिक पातळीवर समजून न घेता त्यांनी ते भावनात्मकतेने अनुभवले आहे.

अस्पृश्यता निवारणाचा प्रथम विचार केला तो विठ्ठलरावांनी. त्याचप्रमाणे अस्पृश्यतेच्या प्रश्नाबाबत प्रथम संशोधन केले तेही त्यांनीच. ब्राम्हो समाज किंवा प्रार्थना समाज असे मानतो की सर्व माणसे ही परमेश्वराची लेकरे आहेत आणि सर्वांनी परस्परांशी बंधुभावाने वागावे. शिंदे हे केवळ तत्त्वज्ञान सांगून थांबले नाहीत, तर ते त्यांनी आचरणात आणून दाखविले. शोषितांच्या प्रगतीसाठी त्यांनी आयुष्य समर्पित केले.

अस्पृश्यांसंबंधीचे त्यांचे कार्य दुहेरी स्वरुपाचे होते.

१. त्यांना अस्पृश्यांच्या मनात स्वाभीमान निर्माण करून त्यांना सुशिक्षित व उद्योगी बनवायचे होते आणि

२. त्यांना समाजातील अस्पृश्यता नष्ट करायची होती. स्वतःला वरिष्ठ मानणारे लोक अस्पृश्यता निर्माण करतात, तेव्हा अस्पृश्यता नष्ट करायची असेल तर वरिष्ठ वर्णीयांमधील भ्रामक जाणीव नष्ट करणे, हा त्यांच्या कार्याचा दुसरा भाग होता.

शेतकऱ्यांवर होणारे अन्याय आणि दुःस्थिती ह्यामुळे विठ्ठलरावांना या वर्गाबद्दलही कळवळा वाटत होता. १९२८ च्या पुणे येथे भरलेल्या 'मुंबई इलाखा शेतकरी परिषदे'तील अध्यक्षीय भाषणात 'आपण ही परिषद हे धर्मकार्य समजून उपस्थित राहिलो आहोत.' असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

१९२६ ते ३२ या काळात त्यांनी बऱ्याच शेतकरी परिषदांना मार्गदर्शन केले आणि भावी काळातील कार्याची दिशा दाखवली.

जमखंडीसारख्या आडगावी राहूनही लहानपणी विठ्ठलरावांच्या घरात स्त्री–पुरुष समानता होती. त्यामुळे त्यांच्या बहिणीलाही शिक्षणाची संधी मिळू शकली. त्यांची आई कर्तबगार गृहिणी व सुमाता होती. तिच्या व्यक्तिमत्वाचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यामुळे त्यांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन उदार होता. शिक्षण घेत असताना आपल्या घरातील स्त्रियांनाही संधी मिळावी म्हणून त्यांनी पुण्यात बिऱ्हाड केले आणि भगिनी व पत्नी यांचे नाव शाळेत घातले.

१९२५ साली ते प्रांतिक सामाजिक परिषदेचे अध्यक्ष होते. प्रत्यक्ष कार्य न करता नुसत्या परिषदा भरविण्याच्या ते विरुद्ध होते. आपल्या देशात समाज सुधारणेचे कार्य अल्प प्रमाणात व सावकाश का चालते याची मीमांसा करताना ते म्हणतात, जुन्या परंपरेतील आगरकरांसारखे सुधारक या कार्याची उभारणी बुद्धिवाद, भूतदया अशा कोणत्याही तत्वावर करायला तयार असतात; पण धार्मिक मनोवृत्तीच्या पायावर उभारण्यास मात्र तयार नाहीत. अशा तऱ्हेची ही धर्मविन्मुख प्रवृत्ती समाजसुधारकांमध्ये असावी, ही गोष्ट त्यांना दुर्दैवाची वाटते.

आजच्या समाजाला सत्यता जाणून घ्यावयाची असेल तर मला वाटते प्रत्येक विद्यार्थ्यांनी व आजच्या युवा नागरिकांनी हे पुस्तक आवर्जून वाचावे

## इतनी शक्ती हमें देना दाता

**इतनी शक्ती हमें देना दाता,**
**मनका विश्वास कमजोर होना,**
**हम चले नेक रस्तेपे हमसे,**
**भूलकर भी कोई भूल होना** ।धृ।

दूर अज्ञान के हो अंधेरे
तू हमें ज्ञान की रोशनी दे
हर बुराई से बचते रहे हम
जितनी भी दे भली जिंदगी दे
बैर होना किसीका किसीसे
भावना मन में बदलेकी होना ।१।

हम ना सोचे हमें क्या मिला है
हम ये सोचे किया क्या है अर्पण
फूल खुशियोंके बाँटे सभीको
सब का जीवन ही बन जाये मधुबन
अपनी करुना का जल तू बहाके
कर दे पावन हर एक मन का कोना ।२।

# आनंदयात्री बाबा आमटे

– कविता लांडे

मुरलीधर देवीदास उर्फ बाबा आमटेंचा जन्म महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यातल्या हिंगणघाट येथील जमीनदार कुटुंबात डिसेंबर २६ इ. स. १९१४ रोजी झाला. वरोड्यापासून पाच एक मैलांवरील गोरजे नावाची जमीनदारी आमटे घराण्याकडे होती. घरच्या सुबत्तेमुळे त्यांचे बालपण सुखात गेले. त्यांना रेसर कार चालविण्याची व वृत्तपत्रांतून चित्रपट परिक्षणे लिहिण्याची आवड होती. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण नागपूरमध्ये झाले. त्यांनी नागपूर विद्यापीठातून इ.स. १९३४ साली बी. ए. व इ. स. १९३६ साली एल. एल. बी. ह्या पदव्या संपादन केल्या. आपण स्वतः डॉक्टर बनावे असे बाबांचे विचार होते; परंतु वडिलांच्या आग्रहाखातर ते वकील झाले. यानंतर त्यांनी काही काळ वकिलीही केली. इ.स. १९४९–५० या कालावधीत यांनी जवाहरलाल नेहरुंच्या शिफारसीमुळे फक्त डॉक्टरांना करता येणारा कुष्ठरोग निदानावरील आणि चिकित्सेवरील अभ्यासक्रम पूर्ण केला.

गांधीजींच्या सेवाग्राम आश्रमात राहत असताना गांधीजींच्या विचारांनी प्रभावीत होऊन बाबांनी स्वातंत्र प्राप्तीच्या चळवळीत स्वतःला झोकून दिले. इ.स. १९४३ मध्ये वंदेमातरमची घोषणा दिल्याबद्दल त्यांना २१ दिवसांची तुरुंगवासाची शिक्षा झाली होती.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही कुष्ठरोग निर्मूलनाच्या कार्यासह त्यांनी इतरही राष्ट्रीय महत्वाच्या प्रश्नावर विविध मार्गांनी आंदोलने केली व आपली प्रतिक्रिया नोंदवली. पंजाब दहशतवादाने वेढलेला असताना तेथील नागरिकांना इतर राज्यातील भारतीय त्यांच्याबरोबर असल्याचा आत्मविश्वास देण्यासाठी बाबांनी पंजाबला भेट देण्याचे धाडस केले होते. त्यावेळी त्यांनी अनेक नेत्यांशी व प्रत्यक्ष नागरिकांशी संवाद साधला होता. राष्ट्रीय एकात्मतेचा प्रसार करण्यासाठी बाबांनी इ. स. १९८५ मध्ये 'भारत जोडो' अभियान योजले होते. यानिमित्त त्यांनी भारत भ्रमण करून जनतेपर्यंत एकात्मतेचे तत्व पोहोचवण्याचा प्रयत्न केला. नर्मदा बचाव आंदोलनात तब्बल एक तप (१२ वर्षे) नर्मदाकाठी मुक्काम करून त्यांनी आंदोलनाला पाठबळ दिले होते.

१९४२ च्या सुमारास एकदा बाबा रेल्वेने वरोड्याला चालले होते. त्यावेळी रेल्वेत काही इंग्रज तरुण शिपाई एका नवविवाहितेची छेड काढत होते. तिचा नवरा घाबरून स्वच्छता गृहात लपून बसला होता. त्यावेळी बाबा पुढे झाले आणि त्यांनी इंग्रज शिपायांना थांबविण्याचा प्रयत्न केला. असे करत असताना बाबांनी पहिल्यांदा काही ठोसे लगावले; पण नंतर इंग्रजही बाबांना मारू लागले. गाडी जेव्हा वर्धा स्टेशनात थांबली तेव्हा बाबांनी ती तेथेच अडवून ठेवली. खूप लोक जमा झाले. त्या सैनिकांच्या तुकडीचा कमांडींग ऑफिसर तेथे आला आणि त्याने चौकशी करण्याचे वचन दिले ही गोष्ट जेव्हा गांधीजींना समजली तेव्हा त्यांनी बाबांना अभय साधक अर्थात न्यायासाठी लढणारा निर्भय योद्धा असे नाव दिले.

बाबा आमटेंचे आनंदवन म्हणजे असंख्य मनांना उभारी देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करणारी सेवाभावी संस्था आहे. तत्कालीन समाजात कुष्ठरोग हे मागील जन्मीच्या पापांचे फळ समजले जाई. तसेच आजही काही लोक ते अंधश्रद्धेमुळे तसे मानतात. यामुळे कुष्ठरोग्यांस वाळीत टाकले जाई. बाबांनी एकदा पावसात कुडकुडत भिजणारा एक कुष्ठरोगी (तुळशीराम) पाहिला. ते त्याला घरी घेऊन आले. गांधींनी ज्याला गौरविले होते, अशा अभयसाधकाला त्या कुष्ठरोग्याला पाहून भीती वाटली. त्यामुळे त्यांच्या मनात विचारांचे द्वंद्व निर्माण झाले. तेव्हापासून त्यांनी कुष्ठरोग अभ्यासायला सुरुवात केली. इ.स. १९५२ साली वरोड्याजवळ त्यांनी आनंदवनाची स्थापना केली.

इ. स. २००८ सालापर्यंत १७६ हेक्टर क्षेत्रात पसरलेले आनंदवन ३५०० कुष्ठरोग्यांचे घर बनले आहे. असाध्य गोष्टींना स्वतःहून सामोरे जाण्याच्या आव्हानात्मक वृत्तीमुळे कुष्ठरोगासारख्या महाभयंकर रोगाने ग्रस्त झालेल्यांची सेवा करण्याचे अतिकठीण व्रत त्यांनी स्वीकारले.

कुष्ठरोग्याचे आयुष्य हे मरणापेक्षा भयाण आणि कबरीपेक्षा भयंकर असे कुष्ठरोग्याची शुश्रृषाच करायची नव्हे, तर त्याला आत्मनिर्भर करण्याची अखंड तपस्या बाबांनी त्या कार्याचा विस्तार केला. कोणत्याही व्यक्तीकडे

समानतेने पाहण्याच्या त्यांच्या दृष्टीकोनामुळे आश्रमात आज सर्व धर्मांचे, सर्व थरांतील लोक आहेत. केवळ कुष्ठरोग्यांसाठीच नव्हे तर अंधांसाठी, मूकबधीरांसाठी विशेष शाळादेखील तेथे आहेत. कुष्ठरोग्यांसाठी उपचार, प्रशिक्षण व पुनर्वसन याकरिता त्यांनी रुग्णालयाची व अन्य प्रकल्पांची स्थापना केली. त्यांच्या शैक्षणिक उत्कर्षासाठी महाविद्यालयाचीही स्थापना केली. प्रौढ व अपंगांसाठी हातमाग, सुतारकाम, लोहारकाम असे व्यवसाय प्रशिक्षण सुरू करून त्यांना आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग दाखवला. शेती व त्या अनुषंगाने येणारे दुग्धशाला, गोशाळा, कुक्कुटपालन, शेळी–मेंढीपालन आदी कुटिरोद्योगही सुरू करून दिले. अशोकवन (नागपूर), सोमनाथ (मूल) या ठिकाणीही उपचार व पुनर्वसन केंद्रे स्थापन केली. देखणे ते हात ज्यांना निर्मितीचे डोहाळे या बा. भ. बोरकरांच्या ओळीचा 'देखणा प्रत्यय' या प्रकल्पांच्या ठिकाणी येतो. घनदाट जंगल, दळणवळण, संपर्काची साधने नाहीत, प्रचंड पाऊस, पावसात मार्गच अडवून टाकणारे नद्या–नाले, जंगली श्वापदांचा सुळसुळाट, अन्न, वस्त्र,निवाऱ्याची कमतरता, काही वेळा शासनाचा असहकार, आदिवासींचे अज्ञान, अंधश्रद्धा अशी प्रतिकूल परिस्थिती असूनही प्रचंड जिद्दीने बाबांनी आपली कामे पूर्णत्वास नेली.

भामरागड तालुक्यातील आदिवासींच्या विकासासाठी हेमलकसा येथे बाबांनी लोकबिरादरी प्रकल्प सुरू केला. गेल्या ३५ वर्षांपासून या प्रकल्पाची जबाबदारी बाबांचे सुपुत्र डॉ. प्रकाश आमटे व स्नुषा डॉ. मंदाकिनी आमटे समर्थपणे सांभाळत आहेत.या प्रकल्पांतर्गत आदिवासींना माहीत नसलेल्या शेतीच्या नवीन पद्धती शिकविल्या जातात. तसेच विद्यार्थ्यांसाठी शाळा, ज्येष्ठ नागरिकांसाठी उत्तरायण ही निवासी संस्था, वन्यप्राण्यांच्या रक्षणासाठी अनाथालय असे विविध उपक्रमही हेमलकसा येथे यशस्वीपणे चालू आहेत. डॉ. प्रकाश आमटे व डॉ. सौ. मंदा आदिवासींना अथकपणे आरोग्य सुविधा पुरवित आहेतच. हे कार्य बाबांच्या प्रेरणेतूनच सुरू आहे.

एकदा रवींद्रनाथ टागोर यांच्या शांतीनिकेतन आश्रमास बाबा आमट्यांनी भेट दिली. शांतीनिकेतनच्या या भेटीचा त्यांच्यावर प्रभाव पडला. पुढे महात्मा गांधी यांच्या संपर्कात आल्यावर गांधीजींच्या सत्य, नीती व निर्भयतेवर आधारलेल्या विचारसरणीने प्रभावीत होऊन दीनदलितांच्या सेवेसाठी काम करण्याचे त्यांनी ठरविले. गांधीजींनी त्यांना अभयसाधक अशी पदवी दिली होती.

संवेदनशीलता, प्रखर बुद्धिमत्ता, धाडस, प्रचंड कष्ट करण्याची शारीरिक व मानसिक तयारी, कामाचा झपाटा ठरवले ते साध्य करण्याची निश्चयी वृत्ती, संघटन कौशल्य, व्यवस्थापन कौशल्य आणि प्रेरणासात्य या सर्व गुणांच्या आधारे बाबांनी आपले सर्व प्रकल्प यशस्वी केले. बाबा आमटे यांच्या नेतृत्वाखाली आमटे परिवार कार्यरत होताच; पण त्यांच्या कार्यामुळे अनेक क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे प्रेरणा मिळाली, ऊर्जा मिळाली. बाबा आनंदवनात मित्रमेळ्याचे आयोजन करत असत. या मेळ्यांना अनेक कलाकारांसह सामाजिक कार्यकर्ते उपस्थित राहत असत. यातूनच असंख्य कार्यकर्ते घडले, कामांना दिशा मिळाली.



# वाचाल, तर वाचाल !

- तेजस्विनी शेळके

सकाळी घरात वर्तमानपत्रे आले की, ते पहिल्यांदा वाचण्यासाठी आम्हा भावंडांची धडपड असते. प्रत्येकाला आपणच ते प्रथम वाचावे असे वाटते. जगाच्या कानाकोपऱ्यात काय चालले आहे, हे जाणून घेण्याची केवढी ही उत्सुकता! आपल्याला वाचता आले नसते, तर केवढ्या ज्ञानाला आपण पारखे झालो असतो! 'वाचाल, तर वाचाल' हे डॉ. आंबेडकरांचे सुवचन किती सार्थ आहे! वाचन ही जगाकडे पाहण्याची खूप मोठी खिडकी आहे.

वाचन समृद्ध असले म्हणजे लेखनाचीही प्रवृत्ती प्रबळ होते. कल्पनाशक्तीला वाव मिळतो, रसिकता वाढीस लागते, सृजनशीलतेला वाट सापडते, दुसऱ्यांचा दुःखाची जाणीव होते, त्यासाठी आवश्यक असणारे संवेदनशील मन यास खतपाणी मिळते. 'वाचाल, तर वाचाल' ही म्हण आजच्या स्थितीला खूपच समर्पक आहे. आजच्या मनुष्याच्या ठिकाणी असणारे ज्ञान ही त्याची फार मोठीओळख तर होतेच परंतु त्यांच्या कार्याला शक्ती येते. या शक्तीच्या साह्याने तो सुबध्द् होतो. मागच्या पिढीपेक्षा आताच्या पिढीचे वाचन अगदी अल्प झाले आहे, अशी सर्वच स्तरातून तक्रार वाढली आहे आणि ही गोष्ट सत्यही आहे. कारण वाचनाव्यतिरिक्त रेडिओ, टेलिव्हिजन, कॉम्प्युटर, चित्रपट, नाटके, इतर मनोरंजनाची साधने इतकी जास्त वाढली आहेत की या सर्व गोष्टींमुळे मनुष्याला वाचण्यासाठी निवांतपणाच मिळेनासा झाला आहे.

आजच्या धकाधकीच्या जीवनात, इंटरनेट वायफाय असे अत्याधुनिक साधने आली खरी; पण पुस्तक वाचन संस्कृतीचा ऱ्हास झाला. मुद्रणकलेच्या शोधापूर्वी माणूस लिहित, वाचत होता, पण ही संधी फारच थोड्या लोकांना उपलब्ध होती. मुद्रणाच्या शोधानंतर मात्र पूर्वीच्या तुलनेत खूपच लोकांना वाचनाची संधी उपलब्ध झली. त्यामुळे माणसा–माणसाला जोडण्याची प्रक्रिया वेगाने होऊ लागली. जग अधिक जवळ येऊ लागले. ज्ञानाची वेगाने देवाणघेवाण होऊ लागली. ज्ञानाचा प्रसार वाढला व त्यात तितक्याच वेगाने भर पडू लागली. अज्ञानाचे पर्वत कोसळू लागले. माणसाने एका नव्या युगात प्रवेश केला. हे नवे युग निर्माण झाले होते ते वाचनामुळेच!

आपण शतकांपूर्वीचा ग्रंथ वाचतो, तेव्हा तत्कालीन जीवनाचे दर्शन घेत असतो. लेखक स्वतःचे अनुभव लिहित असतो. त्यामुळे त्याच्या काळातील जीवनाची, त्यांच्या आयुष्याचे प्रतिबिंब त्यांच्या पुस्तकात घडलेले असते. आपण वाचनामुळे भूतकाळात डोकावतो, भूतकाळाची वर्तमानाशी सांगड घालतो. जगभराच्या माणसांचे अनुभव वाचल्यावर आपल्या लक्षात येते की, जगभर माणूस अंतर्यामी सारखाच आहे. जात, धर्म, पंथ, देश, प्रांत, भाषा ही सर्व वरवरची टरफले आहेत.

आपण कथा, कादंबऱ्या, नाटके, काव्य वाचतो. त्यामुळे आपले खूप मनोरंजन होते; पण वाचनामुळे तेवढाच फायदा होतो, असे नाही. वाचनामुळे आपल्याला हजारो माणसांच्या जीवनाचे दर्शन घडते. माणसाच्या जगण्याच्या हजारो मार्गाचे दर्शन घडते. मनाला प्रगल्भता येते, व्यक्तिमत्त्व संपन्न होते. त्यामुळे वाचणाऱ्याला उन्नत जीवन जगण्याचे मार्गदर्शन घडते. आयुष्यात अनेक संकटांवर मात करण्याचे सामर्थ्य मिळते.

आजच्या व्यस्त आधुनिक जीवनात इंटरनेटच्या माध्यमातून असंख्य वेगवेगळ्या क्षेत्राशी निगडीत पुस्तक एका क्लिकवर वाचता येऊ लागली. याचा परिणाम असा झाला की, छापील पुस्तक साहित्य विकत घेऊन वाचणाऱ्यांची संख्या कमी कमी होत गेली. त्यात प्रत्येकाच्या जीवनातला वाढता कामाचा व्याप, व्यस्त जीवन पद्धतीमुळे मनाचा ताणतणाव वाढतच गेला. मग पुस्तक मित्रांशी प्रत्येकांच मित्रत्वाच नातं दूरदूर होत गेलं.

पुस्तक म्हणजे आयुष्य मार्गदर्शक, विचार प्रगल्भतेत वाढ करणारे ज्ञानाचे भांडार, याचा जणू सर्वांनाच विसरच पडत गेलाय. शालेय पाठ्यपुस्तकांचा, दफ्तरांचा वाढता बोजा, यामुळे मुलांना अवांतर वाचनाकरिता वेळ मिळेनासा झाला. आजची तरुणाई सोशल नेटवर्किंगच्या इतकी आहारी पडली की, पुस्तक वाचन पूर्ण विसरून गेली; पण आता वेळ आली आहे, हे सारं बदलून पुस्तक मित्रांचे महत्त्व पटवून देण्याची. पुस्तकाशी घट्ट मैत्री जोडण्याची. तरच या वाचन संस्कृतीचा होणारा ऱ्हास थांबवता येईल.

पुस्तकांच्या जगात एकदा डोकावून तर पहा, आपल्या ज्ञानार्जनाबरोबरच मनोरंजनही होईल. पुस्तकातील वेगवेगळ्या पात्रांचे, घटनांतील भाव, प्रेरणात्मक आशय, मनातील नकारात्मक विचार दूर करून नवा उत्साह वाढवायला मदत करेल.

वाचनाने व्यक्ती समृद्ध बनते. विचारांची श्रीमंती वाढते. नवनवीन विचार स्फुरतात. कल्पनाशक्ती तरल बनते. विचार प्रवाही बनतात. लिहिण्याचा तसेच बोलण्याचा वेग वाढतो. स्मरण प्रक्रियेत प्रवाहीपणा येतो. आठवण्यासाठी प्रयत्न करावे लागत नाहीत. वारंवारच्या उजळणीमुळे त्यात एक ताजेपणा येतो. लहानपणी आपण ऐकतो की पुस्तके आपले खरे मित्र असतात.

वाचनामुळे माणसाची विचारशक्ती, कल्पनाशक्ती, संवेदनशक्ती अशा मानसिक शक्तींचा विकास होतो. माणूस बनून अत्यंत आनंददायी व उच्च दर्जाचे जीवन जगण्याचे सामर्थ्य आपल्यात वाचनामुळे येते आणि वाचण्यामुळेच त्याचे सामर्थ्य आपल्याला लाभते. लहानपणी आपण ऐकतो की पुस्तके आपले खरे मित्र असतात. केव्हाही वाचा सर्वांना सारखेच ज्ञान त्यातूनच मिळते वगैरे पण फार कमी लोक हे सारे लक्षात ठेवून या मित्रांची संगत धरतात. अवांतर वाचनाने, व्यक्तिमत्वाला, आपल्या मतांना अभिव्यक्तीला झळाळी येते तर विषयाशी संबंधित पुस्तक वाचल्याने दृष्टीकोन सर्व समावेशक होतो. वाचनामुळे माणूस व्यक्त व्हायला शिकतो. माणसाने व्यक्त व्हावं ही आजच्या काळाची गरज आहे. वाचनामुळे ज्ञान प्राप्त होते. आयुष्यात खूप बदल होतात. वाचनातून माणूस घडतो. त्याचा विकास होतो. वाचन आणि वाचनातून मिळालेले ज्ञान खूप मोलाचे असते. म्हणून हाच विचार मनात घेऊन वाचनाची सवय लावून घेऊ.

वाचनाचे फायदे आयुष्याच्या जडणघडणीत, विचार सामर्थ्यात विशेष भर घालणारे, उज्वल भवितव्य घडवणारे असते. 'वाचाल, तर वाचाल' या विचारांप्रमाणे प्रत्येकांनी वाचनाचे महत्व जाणायला हवे. पुस्तकांशी प्रत्येकाने असलेले मैत्रीचे नाते अधिक घट्ट आणि अबाधित राखायला हवे तरच वाचन संस्कृतीचा होणारा ऱ्हास रोखला जाऊन, उद्याचे सोनेरी वैचारात्मक, प्रगल्भात्मक भविष्य साकारले जाईल.

**शिक्षकांनी वाचावीत अशी काही पुस्तके...**

शाळा भेट ------------नामदेव माळी

कवाडे उघडताच---------प्रतिभा भराडे

माझे विद्यार्थी----------रघुराज मेटकरी

न पेटलेले दिवे----------राजा शिरगुप्पे

परीक्षेला पर्याय काय?-----हेरंब कुलकर्णी

जे कृष्णमूर्ती स्कूल्स ------हेरंब कुलकर्णी

शिक्षण: आनंदक्षण -------रमेश पानसे

आजचे शिक्षण,उद्याचे जीवन---रमेश पानसे

माझी काटेमुंढरीची शाळा----गो.ना.मुनघाटे

लाटालहरी-----------विनोद शिरसाठ

थर्ड अँगल-----------विनोद शिरसाठ

तिमिरातून तेजाकडे ------नरेंद्र दाभोळकर

समग्र माते नर्मदे --- -दत्तप्रसाद दाभोळकर

विवेकी पालकत्व------डॉ.अंजली जोशी

मी अल्बर्ट एलिस------डॉ.अंजली जोशी

इंधन---------------हमीद दलवाई

समीधा--------------साधना आमटे

मेळघाटचा मोहर------डॉ.रविंद्र कोल्हे

प्रकाश वाटा--------डॉ.प्रकाश आमटे

आनंदवन : प्रयागेवन---डॉ.विकास आमटे

लमाण -----------डॉ.श्रीराम लागू

ययाती -------------वि.स.खांडेकर

दोन ध्रुव -------------वि.स.खांडेकर

# ग्रंथ माझे गुरू..

– भरत पवार

वाचनाने माणसाच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावतात, वाचनाने ज्ञानात वृद्धी होते. वाचनातून नवी दृष्टी प्राप्त होते. नव्याचा बोध होतो आणि विचारांना परिपक्वता प्राप्त होते. नेमके काय वाचावे याबद्दल अनेकांच्या मनात संभ्रम असतो. वाचन संस्कृतीमुळे मानवाचा विकास होतो. राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रामधील यश हे अध्ययन, अध्यापन व वाचन या गोष्टींवर आधारित असते.

शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अभ्यासाक्रमाबरोबर अवांतर वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस १५ ऑक्टोबर हा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे २३ एप्रिल हा आंतरराष्ट्रीय वाचन दिन म्हणून साजरा केला जातो. १२ ऑगस्ट हा ग्रंथपाल दिन साजरा केला जातो. हे सर्व उपक्रम साजरे करण्यापाठीमागची भूमिका म्हणजे वाचन संस्कृतीला चालना मिळावी हा आहे.

माणूस जन्मतः अज्ञानी असतो. जन्मल्यानंतर विविध प्रकारचे ज्ञान त्याला माता–पिता, गुरूजन, विविध प्रकारचे पुस्तक वाचनातून मिळते. विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तके न अभ्यासता इतरही अवांतर साहित्याचे वाचन करून समाजाचा अभ्यास केला पाहिजे. वाचनामुळे ज्ञान वाढते. ज्ञान वाढल्यामुळे आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास होऊन जीवनात यश मिळते. आजच्या स्पर्धात्मक युगात याची खूप गरज आहे. समाजाचे प्रतिबिंब खऱ्या अर्थाने पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिकातून लिहिले जाते. ग्रंथातून वाचक ज्या व्यक्तीचे अनुभव वाचत असतो, त्यास कदाचित वाचकाने पाहिलेले नसते; परंतु छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. आंबेडकर, माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम हे सर्व त्यांच्या सामाजिक कार्यामुळे, विचारामुळे, त्यांच्यावर लिहिलेल्या विविध लेखकांच्या साहित्यामुळे अजरामर झाले. त्यांचे विचार ग्रंथाद्वारेच जगभर पोहचले म्हणूनच ग्रंथाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. मानवी प्रगती, ज्ञानाची वाढ, ज्ञानी व्यक्तीची उपलब्धता, ग्रंथांची वाढती संख्या असणारी ग्रंथालये ही मानवी प्रगतीच्या सुसंस्काराची साखळी मानली पाहिजे.

वाचत असताना लिहिलेले डोळ्यांनी पाहून ओळखणे एवढेच अभिप्रेत नसते. मजकुरांचा अर्थ कळणे महत्त्वाचे असते. अक्षरज्ञान, लिहिण्यापाठीमागील हेतू इत्यादी गोष्टीचा समावेश वाचकामध्ये होतो. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांनी साहित्य अकादमीच्या 'फेस्टिव्हल ऑफ लेटर्स' या वार्षिक कार्यक्रमात १६ फेब्रुवारी २०११ रोजी दिलेल्या व्याख्यानाचा संपादित अंश थोडक्यात, 'पुस्तकांच्या सहवासात मला नेहमीच ज्ञानाबरोबर आनंदही मिळाला. माझ्या घरात सुमारे ५० हजार पुस्तकांचं संग्रहालय आहे. अध्यात्म, विज्ञान, प्रशासन, इतिहास, भूगोल, व्यवस्थापन आणि वाङ्मय अशा विविध विषयांचा त्यात समावेश आहे. माझं ग्रंथ संग्रहालय ही माझी सर्वात मौल्यवान ठेव आहे आणि येथे व्यतीत केलेला प्रत्येक क्षण सर्वात मौजेचा व समाधानाचा आहे.' आपल्या विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी या हेतूने ते मुलांना याप्रमाणे शपथ देत.

ज्येष्ठ पत्रकार श्री. उत्तम कांबळे यांनी 'लोकराज्य' जून जुलै २०११ अंकातील 'ग्रंथांनीच घडवलंय मला' या लेखात अवांतर वाचनाचे महत्त्व विशद केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ग्रंथ प्रेमी म्हणून प्रसिद्ध होते. इंग्लंडमध्ये असताना त्यांनी स्वतःला ग्रंथालयात अक्षरशः कोंडून घेतले होते. एवढंच नव्हे तर प्रसंगी उपाशी राहून पुस्तके खरेदीचा ध्यास घेतला होता.

योग्य पुस्तकांच्या वाचनाने मानवी जीवनामध्ये अमुलाग्र असे बदल होतात. याचे उत्तम उदाहरण अहमदनगर जिल्ह्यातील ज्येष्ठ समाजसेवक राळेगणसिद्धीचे अण्णा हजारे होत. त्यांनी स्वामी विवेकानंदांचे जीवन चरित्र वाचलं. एक पुस्तक वाचण्यामुळे ते आदर्श गावचे महर्षी ठरले. सर्वसामान्य व्यक्तीला माहितीचा हक्क मिळवून देऊ शकले.

साप्ताहिक 'सप्तरंग' मधील वाचन ठरायला हवं अपरिहार्य, या लेखात महावीर जोंधळे म्हणतात, 'सरकारनं सक्ती करून वाचन वाढणार नाही, पोटासाठी अन्नही जशी अपरिहार्य गरज आहे, तसे स्वतःच्या बौद्धिक विकासासाठी वाचलंच पाहिजे, असं वाटलं पाहिजे.' आजपर्यंत

आपल्याकडे पुस्तक विकत घेऊन वाचण्याची सवय लागायची आहे.

**आपण वाचन का करतो ?**

१. शिक्षण पूर्ण करण्यासाठी २. स्पर्धात्मक परीक्षा देण्यासाठी ३. एखाद्याविषयी विश्वसनीय माहिती मिळविण्यासाठी ४.स्वतःचा विकास व्हावा म्हणून ५. एक जिज्ञासा म्हणून ६. वर्तमान घडामोडीचे ज्ञान व आकलन व्हावे यासाठी ७. दैनंदिन जीवनाची व्यवहारिक गरज म्हणून व्यावसायिक हितासाठी ८. वैयक्तिक व सामाजिक गरजेपोटी.

वाचनाच्या चुकीच्या सवयी, तंत्र, वेग व उपाययोजना :

१. आपल्याला ओळीवरून हात फिरविण्याची सवय असेल तर ती आपल्या वाचनवेगात अडथळा बनते. म्हणून ही सवय जाणीवपूर्वक सोडली पाहिजे. कारण हाताची गती ही नजरेच्या गतीपेक्षा केव्हाही कमी असते

२. मोठ्याने न वाचता केवळ नजरेने वाचायला शिका. कारण मनातल्या मनात शब्दोच्चार करून दर मिनिटास जास्तीत जास्त २५० ते ३०० शब्द वाचता येतात; पण मनातल्या मनात शब्दोच्चार न करता वाचल्यास ८०० शब्द देखील वाचले जाऊ शकतात.

३. ओठांच्या स्वरयंत्राचा बाह्य हालचाल न करता मनातल्या मनात वाचण्याचा सराव करावा.

४. साधारणपणे एका दृष्टीक्षेपात २.५ से. मीटर ते ३.५ सें. मीटर इतक्या रूंदीत मावणारा मजकुर आपण सरावाने वाचू शकतो. दृष्टीचा आवाका वाढवण्याचा सराव करावा.

५. वाचताना मान फिरवण्याची सवय असते. अशी सवय टाळावी.

६. एकाग्रतेने वाचन केल्यास वाचन अर्थपूर्ण होते.

७. पुस्तकाची पाने चाळून वाचन करण्याची सवय केल्यास वाचनाचा वेग वाढू शकतो.

**वाचन संस्कृतीला चालना देणारे घटक :**

साधारणतः कुटुंबात वाचनाची प्रवृत्ती ज्या प्रकारची असेल, जी पुस्तक सहज उपलब्ध असतील व वाचनाकडे पाहण्याची कुटुंबाची जी सर्वसाधारण प्रवृत्ती असेल तीच वाचनाच्या सवयीचा पाया बनते.

दूरदर्शनचे आकर्षण, रेडिओची गतिमानता, चित्रपटांचे सामाजिक स्वरुप हे सर्व वाचनावर परिणाम घडवू शकतात; परंतु छपाई संबंधित नसलेल्या माध्यमांना शत्रू मानणे हे अदूरदृष्टीचे व चुकीचे आहे. सदर साधनाचा योग्य वापर योग्य प्रमाणात केल्यास वाचनसंस्कृतीला चालना मिळेल.

लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी १२५ वर्षापूर्वी काढलेले ज्ञानसमृद्धी बाबतचे विचार आजच्या परिस्थितीमध्ये तंतोतंत जुळतात ते याप्रमाणे, 'मरतेवेळी देऊळ बांधावयास सांगू नका, नवे छापखाने, नवे पुस्तके, ग्रंथालये उभारा. देऊळे पुष्कळ आहे, तितकी पुरते समजा, पण ग्रंथालये अधिक बांधा.' यातून पुस्तके व वाचनाचे महत्त्व स्पष्ट होते. इंद्रजीत भालेराव यांचा ग्रंथावरचा अभंग या प्रमाणे आहे.

ग्रंथ माझे गुरू । ग्रंथ मायबाप ।
निववितीं ताप । हृदयाचे
ग्रंथ माझे सखे । जीवन सांगाती ।
आयुष्या ये गती । ग्रंथामुळे
ज्ञानेश तुकोबा । फुले बाबासाहेब ।
ग्रंथातून आज । भेट देती
ग्रंथांनी ठेविली । संस्कृती जिवंत ।
म्हणूनीच ग्रंथ । नित्य घ्यावे.
ग्रंथ खरिदावे । ग्रंथ उरि घ्यावे ।
ग्रंथ भेट द्यावी । वेळोवेळी
घरात असावे । ग्रंथाचे कपाट ।
देवा जसा पाट । देव्हाऱ्यात
ग्रंथ ज्याचा जीव । ग्रंथ ज्याचा शवास ।
त्याच्या आसपास । देव राहे.

ज्याप्रमाणे देव्हाऱ्यात देव असतो. त्याचप्रमाणे घरोघरी पुस्तके असावी. त्याचे अखंड वाचन व्हावे, वाचता वाचता काय वाचावं, काय वाचू नये, हे कळतं, दृष्टी बदलते. माणसाला सच्चा माणूस बनायला पुस्तके शिकवतात. म्हणून मला आज वाटते की माणूस बनणे अधिक महत्त्वाचे आहे.

# गुलामगिरीचे रहस्य ...

**- सूर्यप्रभा बोधक**

महात्मा जोतीराव फुले यांना या देशातील मानवमुक्तीचे पहिले प्रणेते म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. थोर माणसाच्या ठिकाणी असणारे काळाचे भान आणि त्या वर्तमानकाळाच्या पलीकडे बघण्याची दृष्टी असते, ती त्यांच्यात होती. म्हणूनच या देशात गेल्या शतकात सामाजिक सुधारणेचे जे प्रयत्न झाले त्या प्रयत्नवादी चळवळीचे ते अग्रणी होते. त्यांनी सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि आर्थिक विषमतेविरुद्ध आयुष्यभर संघर्ष केला.

आयुष्यभर ते समाजासाठी, दीन-दुबळे, शुद्रातिशुद्र म्हणवणाऱ्यांसाठी, स्त्रियांसाठी अक्षरशः झिजले. त्यांचे सगळे आयुष्य म्हणजे समाजप्रबोधनाचे, त्यांच्या जागरणाचे एक धगधगते अग्निकुंड होते. गुलामगिरीच्या बंधनातून माणसाची सुटका व्हावी यासाठी त्यांनी जराजीर्ण धर्मकल्पनांशी, कालबाह्य रूढींची, अंधश्रद्धांची या अग्निकुंडात आहुती दिली.

ते मानवतावादी होते. ''माणसाला जन्माने धर्म न मिळता तो त्याला स्वतःच्या बुद्धीने स्वीकारता आला पाहिजे. एकाच कुटुंबात कोणी हिंदू होईल, कोणी मुसलमान, कोणी शीख, कोणी ख्रिश्चन होईल, असे त्यांचे मत होते. 'गुलामगिरी' हा म. फुल्यांनी निर्माण केलेल्या वाङ्मयनिर्मितीपैकी एक छोटेखानी; परंतु तेवढाच स्फोटक ग्रंथ. १८७३ मध्ये तो प्रसिद्ध झाला.

या ग्रंथाचा मुख्य उद्देश असा आहे की, आज शेकडो वर्षे शुद्रादी अतिशुद्र ब्राम्हण लोकांचे राज्य आल्यापासून सतत दुःखे सोशीत आहेत व नाना प्रकारच्या यातनेत आणि संकटात दिवस काढीत आहेत. हा ग्रंथ छोट्या छोट्या सोळा भागात लिहिलेला असून त्यांचे स्वरुप प्रश्नोत्तराचे आहे. धोंडोबा हा प्रश्न विचारतो व जोतीराव त्याचे उत्तर देतात असे याचे स्वरुप आहे. हा धोंडीबा म्हणजे समस्त अज्ञानी ब्राम्हणांच्या गुलामगिरीमध्ये पिळल्या जाणाऱ्या समाजाचा प्रतिनिधी आहे.

महात्मा फुल्यांनी सुरुवातीलाच मनुसंहितेमध्ये मानवाच्या उत्पत्तीसंबंधी आणि त्यातून वर्णत्वाच्या श्रेष्ठ-कनिष्ठतेसंबंधीची कल्पना सृष्टीक्रमास सोडून अनैसर्गिक अतार्किक व म्हणूनच खोटी व कपोलकल्पित कशी आहे हे तर्कसंगतपणे मांडणी करून सांगितले आहे. तसेच आर्यांनी येथील मूळच्या दस्यूंना जिंकून त्यांच्या मनावर ती कशी बिंबवली आहे हे प्रतिपादन केले आहे. 'ब्राम्हण लोक हे समुद्राचे पलीकडेस जो इराण देश आहे त्या देशातील मूळचे राहणारे होत. पूर्वी त्यास इराणी किंवा आर्य लोक म्हणत असे. त्यांनी या देशात मोठ्या मोठ्या टोळ्या करून स्वाऱ्या केल्या. पुढे वामनाचे मागून आर्य लोकांचा ब्रम्हा नावाचा मुख्य अधिकारी झाला. तो मेल्यानंतर आर्य लोकांच्या मूळच्या नावाचा आपोआप लोप होवून त्यांचे नाव ब्राम्हण पडले.

यानंतरच्या भागातून मत्स्य, कच्छ, वराह, नरसिंह यांच्या अवतार कल्पनाचा त्यांनी तर्कसंगतपणे शोध घेतला आहे व वास्तव काय असू शकेल हेही त्यांनी सांगण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे.

अशा या आर्य असलेल्या ब्राम्हणांनी बुद्धिभेद करून येथील मूळच्या लोकांमध्ये म्हणजे स्पृश्य-अस्पृश्यतेच्या माध्यमातून फूट पाडली. हे केवळ म. फुल्यांनी तर्कानं लिहिले असे नाही तर याला पाश्चात्य विद्वानांनी या संदर्भात जे संशोधन केले त्याचाही आधार आहे.

ब्राम्हणेतरांचे सण, उत्सव, व्रते त्यांच्या देव-देवता खंडोबा, जोतीबा, बहिरोबा, मल्हारी मार्तंड इ. विषयीही त्यांनी विस्ताराने लिहिले आहे. त्यांच्या मते बळीराजा आणि त्यांच्या पूर्वीच्या राजसत्ता यांनी आपल्या राज्यात समता प्रस्थापित केलेली होती.

ब्राम्हणेतर बहुजन समाजाच्या छळास प्रारंभ झाला. यामुळेच बलीप्रतिपदा आणि भाऊबीज या दिवशी शेतकऱ्यांच्या स्त्रीया 'इडापिडा टळो आणि बळीचे राज्य येवो' अशी आशा व्यक्त करतात.

वेद, मंत्र, जप, अनुष्ठाने इ. म्हणजे अज्ञानी माळ्या, कुणब्यांना लुबाडण्याचेच साधन होय. असे फुल्यांनी या पुस्तकातून सांगितले. त्यानंतर मनूसंहिता लिहिली असावी असे अनुमान व्यक्त होते.

विविध क्षेत्रातील ब्राम्हणांचे प्राबल्य आणि त्यांनी बहुजन समाजाची केलेली कोंडी यांचा त्यांनी विविध उदाहरणांसह

येथे वेध घेतला आहे. त्यांचे दूरदृष्टीपण सिद्ध करणारी कितीतरी विधानेही या ग्रंथात आहेत. अशा अनेक दृष्टीने हा ग्रंथ मोलाचा आहे.

भटराज्यात त्या वेळेस सर्व वस्तूची छाया लांब पडते आणि अशाप्रसंगी जर कदाचित कोणी शुद्र रस्त्याने जात असता समोरचे रस्त्याने भटसाहेबांची स्वारी येत आहे हे पाहून त्यांच्या अंगावर आपली छाया न पडावी या भीतीने घडी दोन घडी आपला खोळंबा करून रस्त्याच्या एका बाजूला बसावे लागत.

जेव्हापासून शुद्रादी अतिशुद्रामध्ये भट लोकांनी जातीभेद उत्पन्न केला तेव्हापासून त्या सर्वांची मते भिन्न झाली. याविषयी एक जगप्रसिद्ध म्हण आहे ती अशी की, ''दोघांचे भांडण आणि तिसऱ्याला लाभ'' म्हणजे भट लोकांनी बहुजन समाजाला किती दुःखे भोगावी लागली याचे हे चित्रण आहे. देवाची रूपे ही सर्व अर्थानी बनवलेले आहे. हे सर्व कल्पनाचे आहे.

आजच्या समाजाला सत्यता जाणून घ्यावयाची असेल तर मला वाटते प्रत्येक विद्यार्थ्यांनी व आजच्या युवा नागरिकांनी हे पुस्तक आवर्जून वाचावे.



## पर्वणी

**व्यर्थ गेला तुका । व्यर्थ ज्ञानेश्वर**
**संतांचे पुकार । वांझ झाले।।**
**रस्तोरस्ती साठे । बैराग्यांचा ढीग**
**दंभ शिगोशीग । तुडुंबला ।।**
**बँड वाजविती । सैंयापिया धून**
**गजाचे आसन । महंतासी ।।**
**भाले खड्ग हाती । नाचती गोसावी**
**वाट यां पुसावी । अध्यात्माची ।।**
**कोणी एक उभा । एका पायावरी**
**कोणास पथारी । कंटकांची ।।**
**असे जपीतपी । प्रेक्षकांची आस**
**रूपयांची रास । पडे पुढे ।।**
**जटा कौपिनांची । क्रीडा आहे जळ**
**त्यात हो तुंबळ । भाविकांची ।।**
**क्रमांकात होता । गफलत काही**
**जुंपते लढाई । गोसाव्यांची ।।**
**साधू नाहतात । साधू जेवतात**
**साधू विष्ठतात । रस्त्यावरी ।।**
**येथे येती ट्रक । तुपसाखरेचे**
**टँकर दुधाचे । रिक्त तेथे ।।**
**यांच्या लंगोटीला । झालर मोत्यांची**
**चिलीम सोन्याची । त्यांच्यापाशी ।।**
**येथे शंभराला । लाभतो प्रवेश**
**तेथे लक्षाधीश । फक्त जातो ।।**
**अशी झाली सारी । कौतुकाची मात**
**गांजाची आयात । टनावारी ।।**
**तुका म्हणे ऐसे । मावेचे मइंद**
**त्यांपाशी गोविंद । नाही नाही ।।**

(कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रवासी पक्षी मधून साभार)

# विचारांची जादू

– मेघना गांडुळे

विचार नियम हे पुस्तक तेजगुरू सरश्रींद्वारे लिखित आहे. तेजगुरू सरश्रींचा आध्यात्मिक शोध त्यांच्या बालपणापासूनच सुरू झाला होता. हा शोध चालू असताना त्यांनी अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. त्याचबरोबर आपल्या आध्यात्मिक शोधात मग्न राहून अनेक ध्यानपद्धतींचा अभ्यास केला, तरीही त्यांना सत्य गवसलं नाही.

सत्यप्राप्तीच्या शोधासाठी, जीवनाचं रहस्य ज्ञात व्हावं यासाठी त्यांनी बराच काळ मनन करून आपलं शोधकार्य सतत चालू ठेवलं या शोधाअखेर त्यांना 'आत्मबोध' प्राप्त झाला.

सरश्री म्हणतात, ''सत्यप्राप्तीच्या सर्व मार्गांचा आरंभ जरी वेगवेगळ्या प्रकारे होत असला तरी शेवट मात्र 'समज' प्राप्त केल्याने होतो. ही 'समज'च सर्व काही असून ती स्वतःमध्येच परिपूर्ण आहे.''

विचारांद्वारे विचारांवर विचार करून विचारांपलिकडे जाण्याचा कलेला 'विचारायाम' असं म्हटलं जातं. विचारायाम म्हणजे विचार नियम. जो दिवसभर अथकपणे कार्यरत असतो म्हणूनच आपला एक सशक्त, प्रभावी विचारदेखील आपलं संपूर्ण जीवन साकारू शकतो. हाच पहिल्या खंडाचा विषय आहे.

पुस्तकाच्या दुसऱ्या खंडाचा विषय आहे. मौनायाम, याचाच अर्थ विचारांपलिकडे जाणं. अनुभवाद्वारे, अनुभवावर जाऊन, अनुभवापलिकडे जाण्याचा केलेला 'मौनायाम' असं म्हटलं जातं.

जीवनाचे सात सिद्धांत, सात किल्ल्या, सात नियम, सात भाव, सात आकार आणि चेतनेचे स्तरही सात आहेत. या सात आकड्यांचं मर्मस्पर्शी रहस्य जाणण्यासाठी पहिल्या खंडात विचारनियमाची सात सूत्रं आणि दुसऱ्या खंडात 'मौनायाम'चे सात मंत्र दिलेले आहे. त्यापैकी मला आवडलेले विचार नियम क्रांतीचं मुख्य सुत्रं

'आपल्याला हव्या असणाऱ्या गोष्टींवरच लक्ष केंद्रीत करा, नको असणाऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करा.'

या सुत्रानुसार आपण केवळ त्याच गोष्टींकडे आपलं लक्ष केंद्रित करायला हवं, ज्या आपल्याला हव्या आहेत. म्हणजेच फक्त त्याच गोष्टीचा विचार करा, ज्या आपल्याला अपेक्षित आहेत.

आपल्या मनात खूप विचार निर्माण होत असतात. हे विचार म्हणजे आपण स्वतःला दिलेले आदेशच असतात. याच आदेशांनुसार आपल्या जीवनात वस्तू आकर्षित होतात किंवा वेगवेगळ्या घटना घडत असतात. त्याचे एक उदाहरण म्हणजे काही वेळासाठी आपले डोळे बंद करा आणि मनाला आदेश द्या की माकडांविषयी अजिबात विचार करायचा नाही; परंतु डोळे बंद केल्यावर काय होतयं आपल्यासमोर माकडाचंच चित्र येतय ना! आपल्याला तर माकडांविषयी अजिबात विचार करायचा नव्हता; पण जो विचार करायचा नव्हता तोच विचार आपल्या मनाने केला. आपण ज्या विचाराची पुनरावृत्ती करतो तोच प्रत्यक्षात येत असतो, मग तो सकारात्मक असो किंवा नकारात्मक.

निसर्ग आपल्या विचारांमध्ये येणाऱ्या प्रत्येक शब्दावर कार्य करतो. निसर्ग आपल्या विचाराला प्रतिक्रिया देतो म्हणूनच आपल्या विचारांमध्ये, मनामध्ये, कर्मामध्ये चुकीचा शब्द येत नाहीना याकडे लक्ष द्यायला हवं.

नकारात्मक गोष्टींकडे लक्ष देण्याऐवजी सकारात्मक गोष्टींवरच फोकस करायला पाहिजे. आपल्याच आदेशांबद्दल आपण थोडे जरी साशंक असलो तरी सर्व प्रयत्न निष्फळ ठरतात.

एकदा दोन मैत्रिणींची मुलं झाडावर चढली होती. मुलं झाडावर चढल्यानंतर खूप जोराचं वादळ आलं आणि ते झाड वाऱ्यानं हलू लागले.

पहिल्या मुलाची आई तिच्या मुलाला मोठ्याने ओरडून म्हणाली, 'पडशील'.

तर दुसऱ्या मुलाची आई म्हणाली, 'सांभाळून, घट्ट पकडून ठेव.' दोन्ही मैत्रिणींना आपल्या मुलांना पडण्यापासून वाचवायचं होतं; परंतु त्यांच्या संदेशामध्ये विरोधाभास होता; पण पहिल्या स्त्रीचा मुलगा फांदीवरून घसरून खाली पडला; मात्र दुसऱ्या स्त्रीच्या मुलानं फांदी घट्ट धरून ठेवली आणि हळूच उतरून खाली आला.

पहिल्या स्त्रीच्या शब्दांमध्ये नकारात्मकता होती. जी तिच्या मुलानं ग्रहण केली आणि तो पडला. याउलट दुसऱ्या

स्त्रीच्या शब्दांमध्ये सकारात्मकता असल्याने तिच्या मुलाने ती ग्रहण केली आणि तो फांदीवर आपले पाय घट्‌ट पकडून बसला.

आपण प्रत्यक्षपणे वाईट विचार करत नसलो तरी अप्रत्यक्षपणे आपल्या मनात जे विचार येतात तशाच घटना जीवनात घडत असतात.

'आपल्याला जे नकोय, त्यावर लक्ष न देता; जे हवंय त्यावरच लक्ष केंद्रित करा.' उदा. 'मला आजारी पडायचं नाही', असं म्हणण्याऐवजी 'मला नेहमी निरोगी आणि टवटवीत रहायला आवडेल' असे म्हणा.

नेहमी सकारात्मक विचार करायला हवा. कारण ज्या गोष्टीचा आपण वारंवार मनात विचार करत असतो त्या कोणत्या ना कोणत्या रूपात कधी ना कधीतरी आपल्या जीवनात साकार होतात म्हणून वेळ मिळेल तेव्हा चांगली पुस्तकं, मोठ्या लोकांची आत्मचरित्र वाचली पाहिजेत. चांगल्या गोष्टींचं वाचन, श्रवण केल्याने आपला वेळ तर वाचेलच शिवाय मनात सकारात्मक ऊर्जेचा संचयही होईल.

विचार नियम निसर्गाच्या अनेक नियमांपैकी एक नियम आहे की ज्यावर मनुष्याचा विश्वास असो किंवा नसो... ते त्याच्या जीवनात कार्यरत असतातच.

मनामध्ये जेव्हा नकारात्मकतेला बळ देणारे विचार येतील, तेव्हा जागरूक होऊन सकारात्मक विचारांची पुनरावृत्ती करायला हवी.

**विचार नियम** या पुस्तकाबद्दल खूप काही लिहावेसे वाटते. हे पुस्तक केवळ वाचन अनुभव नाही तर जीवनात प्रेम, सद्‌भाव, शांती आणि समृद्धी मिळण्याचे साधन आहे.

'विचार नियम' हे पुस्तक दहापेक्षा अधिक भाषांमध्ये रूपांतरीत केले आहे.

तेजगुरू सरश्रीं लिखित विचार नियम या पुस्तकातील विचारसुत्रांचा योग्यप्रकारे उपयोग करून आपले जीवन आनंदी, सकारात्मक बनविता येईल याबद्दल शंकाच नाही!

या पुस्तकाच्या वाचनाने आपल्या मनातील नकारात्मक विचार निश्चित कमी करता येऊ शकतील.

'विचार नियम' या पुस्तकाची भाषा अतिशय सोपी आहे. त्यामुळे प्रत्येकाने हे पुस्तक वाचायलाचं हवं आणि आपलं जीवन आनंदी जगायला हवं.

केवळ एक विचारही आपल्या जीवनाला आकार देऊ शकतो.

## चारोळ्या

वादळ जेव्हा येतात तेव्हा आपल्याला
मातीत घट्ट रुजुन राहायचं असतं,
ती जितक्या वेगाने येतात,
तितक्याच वेगाने निघुनही जातात.
वादळ महत्त्वाचं नसतं,
प्रश्न आपण त्याच्याशी
कशी झुंज देतो आणि
त्यातून कितपत बऱ्या अवस्थेत
बाहेर येतो याचा असतो.

✼

पाण्यात राहायचे तर माझ्याशी
नुसती मैत्री करुन भागत नाही
तर स्वत:ला मासा बनावं लागते.

✼

आपल्या आयुष्यात कोण येणार
हे काल ठरवतं,
आपल्या आयुेयात कोण हवं
हे आपल मन ठरवतं,
आणि आपल्या आयुष्यात
कोण टिकून राहणार
हे आपली वागणूक ठरवतं

✼

थोर महात्मे होऊन गेले
चरित्र त्यांचे पहा जरा,
एक तरी गुण अंग घ्यावा
हाची सापडे बोध खरा !

✼

हसण्याची इच्छा नसली तरी
हसावे लागते
कसे आहे विचारले तर
मजेत म्हणावे लागते
जीवन एक रंगमंच आहे इथे
प्रत्येकाला नाटक
करावे लागते.

# ऐसे कैसे झाले भोंदू?

– उर्मिला वाबळे

गेली अनेक वर्ष अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धांच्या समूळ उच्चाटनाचे प्रयत्न करणारे नरेंद्र दाभोळकर यांचे हे रोखठोक पुस्तक. हे पुस्तक म्हणजे बुवाबाजीचा समग्र पंचनामा आहे, असे ते म्हणतात. धर्म, अध्यात्माच्या नावाखाली जनतेच्या भावनेशी खेळणाऱ्या लुबाडणाऱ्या बुवांचा बुरखा दाभोळकर यांनी फाडला आहे; मात्र बुवाबाजी हा केवळ धर्माशी संबंधित विषय नाही तर त्यास आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अशा अनेक बाजू लाभल्या आहेत. या सर्व बाजूंचा उलगडा पुस्तकातून विस्तृतपणे होतो. अंधश्रद्धेला अथवा बुवाबाजीला माणसे सहजासहजी बळी का पडतात, याचे एक कारण म्हणजे मानसिक कमकुवतपणा. माणसे अशी सहजासहजी सैरभैर का होतात, अशा कळीच्या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्नही या पुस्तकातून होतो. अतिशय उत्कृष्ट पुस्तक. अनेक भोंदूची सप्रमाण बिंगफोड केली आहे. अशा भोंदूची भांडफोड झालीच पाहिजे. दाभोळकरांनी अशा लोकांचं खरं स्वरुप समाजासमोर ह्या पुस्तकातून उघडकीस आणलं आहे.

अंधश्रद्धा निर्मूलनासाठी कार्यकर्ते जीव तोडून कार्य करतात आणि एक प्रश्न परत विचारला जात असतो, लेखक म्हणतात, ''खरंच राहिल्यात का हो आता एवढ्या अंधश्रद्धा, माणसं शिकली, सवरली, शहाणी झाली; देवदेवस्की, बाबा, महाराज यांच्यातला फोलपणा त्यांना कळला असणारच की!'' खरे तर असे झाले असते तर सगळ्यात जास्त आनंद त्यांच्याच समितीला होणार होता. वस्तुस्थिती अशी आहे की, अशिक्षितांपेक्षा सुशिक्षितांत आणि ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात अंधश्रद्धा कमी झाल्या आहेत, असे छातीठोकपणे सांगावे, अशी परिस्थिती नाही. यातून स्पष्ट करण्यासाठी लेखकांनी माणिक अवघडे यांचे बुवाबाजीचे चित्रण नमूद केलेले आहे. विश्वकोषाने चमत्काराची व्याख्या अशी केली आहे : चमत्कार म्हणजे अद्‌भूत घटना. निसर्गाचे नियम किंवा कार्यकारणभाव ज्या घटनांना लागू पडत नाहीत, अशा घटनांना अद्‌भूत म्हणजे आश्चर्यकारक म्हणतात. म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन, बुद्धिवाद वा विवेकवाद यांच्याद्वारे ज्या घटनांची उपपत्ती लागत नाही, अशा घटनांना चमत्कार म्हणतात. चमत्काराचा पसारा खूप मोठा आहे. चमत्कारांना फार प्राचीन परंपरा आहे. जवळजवळ जगातील सर्वच धर्मग्रंथात किंवा धर्माच्या इतिहासात चमत्कारांची असंख्य उदाहरणे खच्चून भरलेली आहेत. वेद, त्रिपिटक, बायबल, अवेस्ता कुराण, जैन पुराने, ग्रीक, रोमन–चिनी पुराणकथांसारखे साहित्य यामध्ये चमत्कारांचे उल्लेख सापडतात. बुद्धाच्या एका शिष्याने चमत्कार करून भिक्षा–पात्र तयार केले ते बुद्धाने फोडून टाकले आणि आपल्या शिष्याना निक्षून सांगितले की, त्यांनी कधीही चमत्कार करता कामा नयेत. असे असले तरी बुद्धाने महापूर हटवला; किंवा तो पाण्यावरून जात असे. पाण्यात शिरावे तसा तो जमिनीत शिरत असे. त्याला भिंतीचा अडथळा होत नसे, अशा गोष्टी बुद्धाच्या नावावर पसरवल्या गेल्या आहेतच. महंमदालाही चमत्कार मान्य नव्हते.

वडाचे झाड जोपर्यंत उभे आहे तोपर्यंत पांथस्थाला सावली देणार व जीर्णशीर्ण झाले की त्याच पांथस्थाच्या डोक्यावर कोसळून त्याचा जीव घेणार अशा वृक्षाला दोरे गुंडाळून पतीचे आयुष्य वाढेल, असे मानणे ही असत्याची पूजा आहे; हे ठणकावणारे सावरकर, चमत्कारापोटी बुद्धी गहाण पडलेल्यांना कोठून पचायला? चमत्कारांना आधार ठरणाऱ्या वरील सर्व बाबी आणि त्या स्वरुपाच्या अन्य बाबी या निखालसपणे खोट्या आहेत. वरवर चमत्कारसदृश वाटणाऱ्या या सर्व गोष्टी वैज्ञानिक दृष्टिकोनाने तपासल्या, तर सत्य काय हे निश्चितपणे बाहेर येऊ शकते. कोणालाही खोटे पाडणे यापेक्षा समाजाला डोळस बनविणे यात समितीला रस आहे.

चमत्काराचे आव्हान कधी, कोठे आणि कसे भेटेल हे सांगता येणे अवघड. आम्ही 'शोध भूताचा, बोध मनाचा' ही यात्रा संपूर्ण कोकण विभागात जोरदारपणे काढली. कालावधी १ ते १२ डिसेंबर याच दरम्यान बाबरी मशीद कोसळली. वातावरण प्रचंड प्रक्षुब्ध होते; परंतु तरीदेखील आमचा १७३ पैकी फक्त एक कार्यक्रम रद्द झाला. एवढी लोकांची ऐकायची उत्सुकता होती. बाबा अथवा देवस्थान या ठिकाणी होणाऱ्या चमत्कारांना नेहमीच भरमसाठ प्रसिद्धी मिळते. चमत्कारावर विश्वास ठेवण्यासाठी मन आसुसलेले असले तर 'झुकानेवाले' तयार असतातचं चमत्कार हा एकदा श्रद्धा विषय केला की प्रश्न विचारण्याचा प्रश्न येतोच कुठे?

सुप्रसिद्ध अभिनेते बाळ धुरी व जयश्री गडकर या दाम्पत्याला आलेला अनुभव त्यादृष्टीने पाहण्यासारखा आहे. धर्माचा तर चमत्काराशी थेट संबंधच असतो, मग तो ख्रिश्चन असो वा हिंदू! मदर तेरेसाला संत म्हणून जाहीर करण्यासाठी ज्यावेळेला पोपने प्रक्रिया चालू केली. त्याच दरम्यान लुर्डस्च्या व्हर्जिन मेरीचा चमत्कार गाजत होता. ख्रिश्चन धर्मगुरू चमत्काराकडे कसे पाहतात हे स्पष्ट होण्यासाठी याबाबतचा थोडा तपशील पहावयास मिळतो. चमत्काराच्या गुढ घटनांचा दावा करणाऱ्या व्यक्ती, स्थिती, त्यामुळे मिळालेली आव्हाने हा समितीच्या चळवळीतील एक रोमहर्षक भाग आहे. चमत्काराची असत्यता सिद्ध करण्यासाठी या संघर्षाचा फार चांगला उपयोग झाला आहे. चमत्काराच्या असत्यतेबाबत तपास करावयाचा तर पूटपर्तीचे चमत्कार–अवतार श्रीसत्य साईबाबा स्वतःला चमत्काराचे अवतार समजतात; पण त्यांना प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष दिलेली सर्व आव्हाने त्यांनी नाकारलेली आहेत.

चमत्काराचा दावा करणारे बहुसंख्य जण प्रत्यक्ष तपासणीची वेळ आली की, माघार घेतात; पण यालाही अपवाद निघतात. ते चमत्कार सिद्ध करण्याचे आव्हान स्वीकारतात. मग विलक्षण औत्सुक्याची लाट सर्वत्र पसरते. याची काही उदाहरणे रंजक तेवढीच उद्बोधक ठरावीत. संपूर्ण कोकण, गोवा आणि पश्चिम महाराष्ट्र यामध्ये नरेंद्र महाराज वेगाने फोफावत होता. ता. २१ सप्टेंबर, सकाळी ९.३० ची वेळ माझ्या दिल्लीच्या भावाचा फोन साताऱ्याला खणखणला. त्याच्या मते मला दिल्लीत काम निर्माण झाले होते. कारण दिल्लीला लोकांच्या झुंडी देवाला दूध पाजायला घराबाहेर पडत होत्या आणि भगवान शंकर आपल्या कुटुंबियासह एवढेच नव्हे तर गळ्यातील नाग आणि समोरचा नंदी यांसह दुग्ध प्राशन करू लागले होते. असा लेखकांनी त्यांचा अनुभव नमूद केलेला आहे.

महाराष्ट्रात सत्यशोधनाच्या परंपरेस मोठा इतिहास आहे; परंतु त्यातील धग आता कमी झाली आहे, याची दुःखद जाणीव या निमित्ताने झाली. खरे तर महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीतल्या धुरिणांनी आपल्या अनुयायांना रस्त्यावर आणून अशा अफवांचा बिमोड ताबडतोब व परिणामकारक रितीने करावयास हवा होता. यामुळे ज्यांना हे करण्यास रस होता, त्यांना अधिक प्रभावी चपराक बसली असती; परंतु हे घडले नाही.

माणसे अशी सहजासहजी सैरभैर का होतात? याचे एक व्यापक स्पष्टीकरण नेहमी दिले जाते.समाज जीवनातील आगतिकता, चंगळवाद यामुळे मोडकळीस आलेले मन अशा मुर्खपणावर सहज विश्वास ठेवते. त्यामुळे असे प्रकार बंद होण्यासाठी सर्वंकष समाज परिवर्तन व्हावयास हवे. तोपर्यंत हे असेच चालणार. या स्पष्टीकरणातील तथ्यांश मान्य करूनही लेखकाला ते पूर्णपणे पटत नाही. संपूर्ण समाज परिवर्तन कधी होईल, यासाठी आजची लढाई थांबवण्याची गरज नाही. त्यामुळे अन्यायाचा, फसवणुकीचा ताबडतोब प्रतिकार हे सूत्र सोयीस्करपणे दूर ठेवले जाते. दूरवरच्या उद्दिष्टांचे भान हवंच; परंतु शोषणाशी सत्वर संघर्षही हवा. पंचेद्रियांना नवल वाटणाऱ्या काही गोष्टी घडत असतात; पण त्याही निसर्गनियमानुसार होत असतात. ते सर्व हातचलाखीचे प्रकार असतात. आभास असतात. मंत्रमुग्ध झालेल्या मनाचे ते खेळ असतात. शहाणी माणसे असे प्रकार करीत नाहीत.

ज्ञान हा सत्याचा अखंड शोध असतो व तो अंतिम सत्यावर नव्हे, तर सत्याच्या सातत्यावर उभा असतो. भारतीय समाजाची जडणघडण मुळातच दैववादावर आधारलेली असल्याने जीवनातील कोणत्याही लहानमोठ्या संकटांनी, क्षुल्लक कारणांनीदेखील समाज सहज भीतीग्रस्त बनतो. समस्या आणि येणारी संकटे हे आपल्या नशीबाचेच भोग आहेत असे लोकांना वाटत असते. दैवी शक्ती लाभल्यामुळे चमत्कार करणारा एखादा बुवा यातून आपली सुटका करू शकेल, असा लोकांचा विश्वास असतो. माणसे धार्मिक प्रवृत्तीची असल्यामुळे चमत्कारप्रधान बुवाबाजीच्या मागे लागतात. अशी वस्तूस्थिती नसून खरी धार्मिक प्रवृत्ती नसल्यामुळे व धर्म आपल्या भ्रष्टतेला सहकार्य देईल, अशी आशा वाटत असल्यामुळे चमत्कार व बुवाबाजी यांच्यामागे लोक लागतात. चमत्कार माणसाची बुद्धी दुबळी, पांगळी, आंधळी करतात. मग माणसाचा पुरुषार्थच नाहिसा होतो. आणि चमत्कार करणाऱ्या त्या तथाकथित अलौकिक शक्तीच्या हाती स्वतःला सोपवून तो मोकळा होतो. माणसाचे बुद्धीवैभव, निर्णयशक्ती, विवेकी विचारांची शक्ती क्षमता ही सर्वाधिक महत्वाची बाबच चमत्काराच्या पुढे, त्याच्या प्रभावाने गहाण पडते. व्यक्ती परतंत्र बनते.

न्यायालय, निर्बंध, चळवळी इ. मार्गाने इतर क्षेत्रातील

दोष नष्ट करता येतात; परंतु प्रच्छन्न फसवणुकीच्या बाबी सोडल्या तर परमार्थ व ब्रम्हज्ञान हे असे क्षेत्र आहे की, तेथे कायदा पोहचत नाही आणि बहुसंख्यांना या विषयाबाबत काहीही माहिती नसते. कळत नसते. कळून घेण्याची इच्छा नसते. माणसे प्रवाहपतित असतात व त्यातच धन्यता मानतात, त्यामुळे जनचळवळ अशक्य बनते. लोकप्रतिनिधींच्या कामाची कठोर तपासणी करणाऱ्या आपल्या समाजाला अध्यात्मिक प्रतिनिधींची साधी चिकित्सक चौकशीही चालत नाही. त्याच्या विधायक कामाने जणू त्याला बाकीचे सर्व माफ होते.

शिष्य स्वतःला कमी लेखून गुरूला सर्वशक्तीमान मानतात. गुरुला शरण जावे ही त्यांच्या लेखी बुद्धीची शरणागती नव्हे तर आनंदाची अनुभूती असते. स्वतःच्या बुद्धीने स्वतंत्र विचार करणे, स्वतःचे प्रश्न सोडविण्यासाठी संघर्ष स्वतः लढविणे या बाबी भक्तगणांना क्षुल्लक वाटतात. आपण गुरूस्थानी मानलेल्या व्यक्तींचे उदात्तीकरण करणे, ती सर्वगुणसंपन्न आहे, असे मानणे, तिच्याशी एकरूपता पावणे या मनाच्या सुप्त प्रक्रिया गुरूला शरण जाताना घडतात. गुरूसमवेत हे सहजीवन जगणे, त्याच्याशी तादात्म्य पावण्याची धडपड करणे यामधून आपल्या समस्यांचे आकलन झाले व मार्ग दिसला असे मानणे हा आपल्या संस्कृतीच्या संस्काराचा भाग आहे.

बुवाबाजीपासून स्वतः आणि समाज दूर राहण्यासाठी आणि ठेवण्यासाठी असा संकल्प करावयास हवा की मी स्वतःवरचा विश्वास गमावणार नाही. स्वतःच्या मर्यादेत माणुसकीच्या आधारे प्रामाणिकपणे जगणे यात माणसाची प्रतिष्ठा आहे.

अशाप्रकारे 'ऐसे कैसे झाले भोंदू' या पुस्तकात नरेंद्र दाभोळकरांनी अंधश्रद्धा व बुवाबाजी यावर परखड शब्दांत टीका केलेली आहे.

## हम होगें कामयाब

होगें कामयाब, होगें कामयाब
हम होगें कामयाब एक दिन
मन में है विश्वास, पूरा है विश्वास
हम होगें कामयाब एक दिन ।

हम चलेंगे साथ-साथ
डाल हाथों में हाथ
हम चलेंगे साथ-साथ, एक दिन
मन में है विश्वास, पूरा है विश्वास
हम चलेंगे साथ-साथ एक दिन ।

होगी शान्ति चारों ओर, एक दिन
मन में है विश्वास, पूरा है विश्वास
होगी शान्ति चारो ओर एक दिन ।

नहीं डर किसी का आज एक दिन
मन में है विश्वास, पूरा है विश्वास
नहीं डर किसी का आज एक दिन ।

# आमचा बाप आन् आम्ही

**– करिष्मा पठाण**

'आमचा बाप आन् आम्ही' या पुस्तकाचे लेखक डॉ. नरेंद्र जाधव यांनी आपल्या लेखात त्यांचे आयुष्य हेच उमेदीची, धडपड आणि उत्कर्ष यांची कथा आहे, असे प्रतिपादन केले आहे. आंधळ्या राहीआजीच्या दूरदृष्टीस, अशिक्षित दादांच्या बौद्धिक प्रगल्भतेस आणि आई सोनाबाईच्या वाट्याला आलेल्या गरिबीच्या चटक्यांची ही एक सत्यकथा आहे.

डॉ. नरेंद्र जाधव उर्फ छोटूमिया यांचे लहानपण वड्याळ्याच्या बॉम्बे पोर्ट ट्रस्ट कॉलनीत गेले त यांचे शिक्षण छबिलदास हायस्कूल मराठी माध्यम शाळा (दादर) मुंबई येथे झाले. या पुस्तकांमधून त्याची बुध्दीमत्ता व प्रगल्भता अधिक महत्वाचे म्हणजे त्यांचा प्रतिकूल आणि त्याहुन ही परिस्थितीवर मात करून जीवनात प्रगती साधण्याचा निर्धार व्यक्त होतो. डॉ. नरेंद्र म्हणजे धैर्य आणि साहस या गुणांचे मूर्तिमंत उदाहरण होय.

या पुस्तकामधून आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनातील दुषणांचे प्रखर दर्शन होते हे खरे आहे, तथापि त्यामधूनच समाजातील हा अन्याय दूर कसा करता येऊ शकेल याचे उत्तम धडे मिळतात हे अधिक महत्त्वाचे आहे. डॉ. नरेंद्रचे स्वतःचे आयुष्य म्हणजे एक जीवन संघर्ष आहे. पण त्याचबरोबर त्यामध्ये प्रगतीच्या पाऊलखुणाही दृगोचर होतात. प्रगती ही संघर्षामधूनच साधत असते ना! देशात आज लाखो लोक सुखी जीवना पासून वंचित आहेत, त्यांना आयुष्यात सतत विषमतेला, पक्षपाताला तोंड द्यावे लागते; परंतु त्यांच्या इच्छा आकांक्षा त्यांना स्वस्थ बसू देत नाहीत. त्यामधून देशातील प्रगतीची पदचिन्हे दिसतात. या अर्थाने, नरेंद्राची कहाणी ही प्रातिनिधिक आहे, कारण तिच्यामधून विकासाच्या, संभाव्य वैभवाच्या खुणा दिसतात. त्यासाठी नरेंद्र व त्यांचे कुटुंबीय खंबीर पायांवर उभे राहिले; त्यांनी अन्याय व्यवस्थेविरुद्ध लढा दिला.

अर्थात एकूण प्रगती ही प्रतिभावान धडपडीचे फळ असते. जर नरेंद्रसुद्धा भारतातील दलित व दाबल्या गेलेल्या हजारो स्त्री–पुरुषांप्रमाणे स्वतःला व्यक्त करण्यासाठी उठला नसता, स्वतःच्या संपन्न आयुष्यासाठी झगडला नसता तर मग त्याने आयुष्यात जी काही प्रगती केली तीही साधली नसली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर किंवा भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. के. आर. नारायणन यांच्याप्रमाणे डॉ. नरेंद्र जाधव यांचे आयुष्यसुद्धा बदलाची, असीम शौर्याची, उत्कर्षाची आणि आशेची कहाणी आहे. तीमधून आपल्या देशातील लाखो करोडो लोकांना नवे, सुखासमाधानाचे जीवन जगण्यासाठी लढा देण्याचे स्फुरण मिळेल याची मला खात्री आहे. आजपर्यंत त्यांना या देशात कोणताही अधिकार नव्हता, तो मिळवण्याचा त्यांचा हक्क आहे याची जाणीव त्यांना या पुस्तकामधून होईल.

देशातील बहुसंख्य लोकांचा भूतकाळ भीषण दारिद्र्य आणि अन्याय–अत्याचार यांनी भरलेला आहे. आजही जाधव सरांची परिस्थिती फार वेगळी नाही. मला स्वतःला त्यांची पुस्तके महत्त्वाची व प्रेरणादायी वाटतात, कारण त्यांनी स्वतःच्या आणि स्वतःच्या वडिलांच्या जीवनामधून प्रगतीचे धडे गिरवले व त्यातूनच स्वतःचे भविष्य घडवले.

ज्यांनी भूतकाळात केवळ उपासमार आणि अन्याय–अत्याचाराच्या हालअपेष्टा सहन केल्या आणि आजसुद्धा ज्यांच्या नशिबी तसेच वर्तमान आहे त्यांचे जगणे सुसह्य आणि आयुष्य मौलिक बनवण्यासाठी अशा लेखनातूनच आशेचा किरण दिसतो.

आपण आपल्या भूतकाळात रमत बसलो तर आपल्या भविष्याबद्दल केव्हा लिहिणार आणि बोलणार? आपण दोन्ही गोष्टी एकाचवेळी साधल्या पाहिजेत. डॉ. नरेंद्र जाधव यांनी लिहिलेले आत्मकथन 'आमचा बाप आन् आम्ही' हे पुस्तक राजकीय नेत्यांनी आणि समाज क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी मुद्दाम वाचावीत, अशी आहेत. त्यांच्या आत्मकथनामधून आपल्याला सामाजिक आणि राजकीय दृष्टी प्राप्त होईल; आपले शिक्षणविषयक धोरण साकार करतानाही या पुस्तकाचा उपयोग होईल.

शेवटी, मला हे नमूद करावेसे वाटते की, डॉ. नरेंद्र जाधवांची जगाकडे पाहण्याची जी दृष्टी आहे, तीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची होती. किंबहुना त्यांनी बाबासाहेबांकडूनच प्रेरणा घेतली आहे.

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे अस्मिता जागृत झालेल्या एका कुटुंबाची ही कहाणी आहे. डॉ. नरेंद्र जाधवांच्या मते, ''आमच्या आई–वडिलांनी आम्हाला जन्म दिला असला तरी माणूस म्हणून. त्यांना व आम्हाला जगण्याचा हक्क मिळवून दिला तो सर्वस्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हणूनच तर व्यापक अर्थाने आम्हा सर्वांचे 'बाप' असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर परमपूज्य आहेत.''

# ॲन्टोनी आणि क्लोपात्रा...

– रेणुका खंडागळे

या पुस्तकात रोमन साम्राज्याचे वर्णन करण्यात आलेले आहे. तसेच ॲन्टोनी आणि त्याची प्रेमिका क्लोपात्रा यांच्या न्यायाची सुलभता दिसून येते.

''ॲन्टोनी आणि क्लोपात्रा'' हे एक शेक्सपियरचे नाटक आहे. हे नाट शेक्सपिअरच्या ''ज्युलीअस सिझर'' या नाटकाशी साम्य दाखवणारे आहे. या नाटकातील परिस्थिती, प्रसंग यांच्यात साम्य नाही. शेक्सपिअरच्या तिन्ही युनिटी टाईम, ठिकाण यांचा अभाव आहे.

''ॲन्टोनी आणि क्लोपात्रा'' ही एक शोकांतिका आहे. 'रोमिओ ज्युलिटच्या कथेशी साम्य आहे. यांच्यात मुख्य गोष्टीवर भर देण्यात आलेला आहे. ती म्हणजे ''प्रेम''. कथेतील नायिका आणि नायक यांनी त्यांच्यावर भर दिलेला आहे. यांच्यामध्ये प्रामुख्याने तरुणांचे उमलणाऱ्या प्रेमाच्या भावना ज्या पहिल्यांदा उमलतात. त्यांच्यावर भर देण्यात आलेला आहे.

''ॲन्टोनी आणि क्लोपात्रा'' हे एक प्रेमीयुगुल आहे. त्यांचं प्रेम अमर आहे. मरताना सुद्धा त्यांच विभाजन केलेलं नाही. त्यांचं नातं एक प्रमुख गोष्ट या नाटकात सांगितलेली आहे. या नाटकात उमललेलं प्रेम; परंतु ही संपूर्ण शोकांतिका ही म्हणता येणार नाही.

या नाटकात असा संदेश देण्यात आलेला आहे की, प्रेम चिरंतनकालीन असते. प्रेमाला वय नसते. खरं प्रेम हे वयानुसार सारखेच राहते. प्रेम हे मताच्या सौंदर्यावर अवलंबून असते. व्यक्ती किती सुंदर दिसते याच्यावर नाही. हे पुस्तक वाचल्याने शेक्सपियरच्या हॅम्लेट, रोमिओ, ज्युलेट, ''न्युली सीझर'' या नाटकाची आठवण येते. शेक्सपिअरच्या नाटकाची खासियत यात जोपासण्यात आलेली आहे.

एंटनी आणि क्लोवेंदा (फर्स्ट फोलियो टाटल : द ट्रॅजेडी मेन) यांनी १६०७ मध्ये ब्लॅकफिअर्स थिएटर किंवा ग्लोब थिएटरमध्ये केला होता. तिचे पहिले स्वरुप १६२३ च्या फोलियोमध्ये होते.

एंटोनीचे दोन मित्र फिलो आणि डेमेट्रियस यांनी त्यांच्या परस्पर मित्रांच्या प्रेमसंबंधाशी चर्चा केली आहे. इजिप्तच्या राणी क्लोपात्राबरोबर आणि रोमच्या परिस्थितीवर प्रतिकुल परिणाम झाला होता. सध्या ते रोममधील पत्र खोडून दुर्लक्ष करून दुर्लक्ष क्लियोपेट्रावर कोणत्याही कारणास्तव एंटोनीला राज्यसभेत उपस्थित राहण्याची विनंती केली. त्यांच्या पत्नी फुल्वियाशी फारच कमी ऍन्टोनीशी काहीही संबंध नाही. क्लियोपेट्रासह आपला बहुतेक वेळ घालवणे ही त्याची एकमात्र चिंता होती. फिलो आणि रोममधील लोकप्रिय अफवा पसरवतील की ॲन्टनी अस्वस्थपणे लज्जास्पद बनली आहे.

क्लोरोपॅट्टा आणि एंटोनीचे मित्र आणि अनुयायी, चार्मियन इरास अलेक्सस आणि एनोबर्बस त्यांच्या वेळेस अन्न व पेयपदार्थ खात घालतात आणि त्यांचे भविष्य वाचवितात. क्लियोपेट्टा जेव्हा एंटोनीच्या ठिकठिकाणी विचारत होती, तेव्हा त्यांच्या अधाशीपणात अडथळा निर्माण झाला. उघडपणे रोमच्या राजकीय बाबींनी ॲन्टनीच्या हितचिंतकांना अचानक शोधून घेतले. त्यांच्या क्लिओपेट्टोला त्यांच्या उपस्थितीच्या अस्तित्वापासून वंचित ठेवले आहे. ॲनॉन एंटनी जवळ येत आहे आणि क्लेओपेट्टाला स्वतःला दुखावण्यास उद्युक्त करीत आहे. जेणेकरून एंटनीच्या प्रेमाचा अचानक अपमान होण्यासारखे दिसत नाही. विविध संदेश वाहकांची चौकशी केल्यास ॲन्टनीला रोमच्या तीव्र स्थितीबद्दल माहिती मिळाली. त्याची पत्नी फुलविया एका गोष्टीसाठी मरण पावली आहे. आणि दुसऱ्या विदेशी सैन्यासाठी लेबेनियस याने आकार दिला आहे. एनोबर्बसने क्लिगोपात्राच्या फायद्यासाठी इजिप्तमध्ये राहावे म्हणून एंटोनीला विनंती केली; पण पोम्पीच्या मुलाच्या वाढत्या सामर्थ्याची तपासणी करून अटोनीने आपल्या अधिकाऱ्यांना तात्काळ तैनात करण्यासाठी स्वतःची तयारी करण्यास सांगितले.

एंटोनीने तिला शोधत नसल्यामुळे निराश झाला. क्लोओपात्राने ॲलेक्सस यांना एंटनी शोधण्याचा आणि ॲलेक्सस यांना दुःखद स्थितीत सापडल्यास आणि

क्लिओपेट्टा यांनी आनंदी असल्याचे सांगण्यास सांगितले. जेव्हा चार्मियन असहमत असतो आणि तर्क देते की क्लियोपेट्टाला एंटनीशी क्रॉस करू नये आणि प्रत्येक वळणावर त्याला थोपवू नये. क्लोओपात्रा आणि चार्मियनच असावा करतो की अटोनी गमावयाचा हा निश्चित मार्ग आहे. सध्या अटन त्यांच्या निकटच्या प्रवासाच्या क्लिओपेट्टाला सांगण्यासाठी स्वतःच्या उदयाला आले. क्लोपेट्टा एंटोनीला खोटा आणि विश्वासघात करणारा म्हणतो आणि त्याला सांगते की,, त्याला गोंधळ न देता सोडले पाहिजे. एंटनीने अशी मागणी केली की राज्य प्रांताद्वारे त्याचे प्रस्थान प्रक्षेपित केले गेले आहे.

रोममधील दोन तुकड्यांमधील ऑक्टविमस आणि लेविडस (अँटनी तिसरा) असल्याने रोमच्या सध्याच्या परिस्थितीवर चर्चा करतात. अहवालात म्हटले आहे की, पोम्पई सह लीममध्ये असलेल्या समुही डाकू इटलीच्या किनाऱ्यावरील वाहतूक करत आहेत. या प्रकाशनात, ओक्टोविसने अशी आशा व्यक्त केली की, एंटनी आपली अधार्मिकता आणि लापरवाही काढून टाकेल आणि त्यांच्या पूर्वीच्या कठोरपणा आणि शिस्तबद्ध स्थितीकडे परत जाईल.

एंटनीच्या अनुपस्थितीच्या प्रकाशनात, क्लिओपेट्टा विविध पद्धतीद्वारे वेळेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतो. नारद्यासारखे झोपणे आणि मार्डियन एक नपुंसक निष्क्रिय, अॅलेक्सस अंटोनीच्या शुभेच्छा घेऊन येतो. अॅटोनीयो क्लिओपेट्टाच्या वतीने संपूर्ण पूर्ववर विजय मिळविण्याचे वचन दिले आहे. आतापर्यंत पूर्वेकडील मोती पुरेसे असणे आवश्यक आहे. मोती स्वीकारल्यास क्लोपेट्टा चार्मियनला विचारले की, अॅन्टोनी म्हणून गौरवशाली माणूस असेल तर चार्मियनने असे सुचविले की, ज्युलियस सीझर क्लोपात्राचा राग काढणाऱ्या पुरुषापैकी सर्वात महान पुरुष असू शकतो. चार्मियनने असे मानले की मार्की अँटनी खरोखरच खास आहे.

अशाप्रकारे ''अॅन्टोनी आणि क्लोपात्रा'' या नाटकात असा संदेश देण्यात आलेला आहे की, प्रेम हे चिरंतनकालीन असते. खरं प्रेम हे वयानुसार सारखेच राहते. प्रेम हे मनाच्या सौंदर्यावर अवलंबून असते. शेक्सपिअरच्या नाटकाची खासियत यात जोपासण्यात आलेली आहे.

## चारोळ्या

छोट्याशा या आयुष्यामध्ये
खुप काही हवं असतं,
असंख्य चांदण्या भरुन सुद्धा
आपलं आभाळं रिकाम असतं.

✻

नभा नभात सुर नवे,
प्रत्येक चांदनित तेज नवे,
आयुष्य हे पर्व नवे,
प्रत्येक दिवसात चैतन्य नवे.

✻

बंध तुझे माझे
असेच जुळूनी राहु देत
तुझे डोळे माझ्या नयनी
मैत्री सतत पाहु देत.

✻ थकलेले जीव सारे
सावलीला निजले होते
बाभळीचे झाड घराशी
फुलांनी सजले होते....
पाखरांनी आपले घरटे
छपराला टांगले होते...
भातुकलीचे डाव दारी
खेळ सारे मांडले होते...
माझ्या प्रिय मित्राने बांधले होते....

# पाडा : शेतकरी संघर्षाचा जाहीरनामा

– भरत पवार

शेती हा भारताचा जिव्हाळ्याचा विषय. त्यातल्या त्यात महाराष्ट्रातला शेतकरी आपल्या वेगळेपणामुळे सर्व परिचित आहे. शेतीवरच ग्रामीण भागातले अर्थकारण आजही अवलंबून असल्याचे आपणास पहावयास मिळते. दिवसेंदिवस शेती व्यवसाय आतबट्ट्याचा ठरत आहे. शेतकऱ्याने पिकविलेला माल त्याला विकण्याचा अधिकार नाही. आपल्या मालाला तो अगदी जीवापाड जपत असतो. जपलेले पीक जेव्हा काढायला येते ते काढून योग्य किंमतीला विकणेसुद्धा त्याच्या हातात नसते. ही सर्वत्र सारखीच परिस्थिती आहे. शेतकऱ्याच्या या व्यथा वेदनांना वाट मोकळी करण्यासाठी खान्देशी लेखक अशोक कोळी यांना या कादंबरीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या व्यथा, वेदनांना वाट मोकळी करून दिली.

या कादंबरीतून लेखकाने चांगदेव तापीकर नामक शेतकऱ्याची प्रतिमा उभी करून त्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मानसिक व आर्थिक अवस्था, संघटितपणाचा अभाव, शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊ पाहणारे संधीसाधू व्यापारी आणि दलाल, विजेचा लपंडाव, पीक काढणीला येण्यापूर्वीच बांधलेले अडाखे आणि केलेले नियोजन, शेतकऱ्यांनी संघटीत होऊन लढा देण्याचा केलेला प्रयत्न गावगुंडीचे राजकारण, भावकीचे राजकारण असे विविध कांगोरे लेखकाने दाखवले आहे.

कादंबरीत वाचताना शेतकऱ्यांची आत्महत्या, साठेबाजी, कृत्रिम टंचाई, शेतीमालाचे पाडलेले भाव या प्रश्नांच्या उत्तराबरोबर भ्रष्ट राजकारण आणि तितकेच निर्ढावलेले अधिकारी याचे वास्तव चित्र उभे केले.

'जगण्यासाठी पैसा' हे समीकरण बदलून 'पैशासाठी जगणे' हे समीकरण आता दृढ होताना दिसत आहे. यातून माणूस नातीगोती विसरून पैशाच्या मागे पळत आहे. कोणतीही घटना घडण्यामागे काहीतरी कार्यकारण भाव असावा लागतो. त्यातूनच कथानक आकार घेत असते. कथानकातील घटना आणि प्रसंग संवादाला पुरक असे असतात.

'पाडा' कादंबरीच्या कथानकात योजलेल्या घटना आणि प्रसंग यांची गुंफण वाचकांची उत्कंठा वाढवते. या कादंबरीत शेती हा दिवसेंदिवस आतबट्ट्याचा धंदा होत चालला आहे. ग्रामीण अर्थकारण शेतीशी निगडीत असल्याने शेतीवरच सर्वस्वी मदार असलेला शेतकरी निसर्ग आणि मानवनिर्मित अशा दुहेरी संकटाशी सामना करत मार्गक्रमण करू पाहतो. शेवटी वर्तमान व्यवस्थेचा तो बळी ठरतो. त्याचे संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त होते. अशा परिस्थितीत चांगदेव तापीकर सारखी माणसे परिस्थितीला शरण न जाता संघर्ष करू पाहतात. शेवटी तेही वर्तमान परिस्थितीचे शिकार होतात. फुले, शाहू, आंबेडकर यांच्या समानतावादी विचारांना तिलांजली दिली जाते. शेतकरी संघर्षाचा जाहीरनामाच 'पाडा' कादंबरीच्या रूपाने मांडला आहे.

लेखकाने चांगदेव तापीकर पात्र उभे करताना कोणाच्याही देवाचा किंवा अंधश्रद्धांना बळी न पडणारे पात्र उभे केले आहे. कोणत्याही दैवी गोष्टीवर विसंबून न राहता तो परिस्थितीशी दोन हात करण्याची त्याची तयारी दाखवली आहे. परिस्थितीला कोणत्याही प्रकारे शरण न जाता तिचा सामना करण्याची ताकद यातून दाखवली आहे. या कथेतून लेखकाने त्या वेळची परिस्थिती आणि व्यवस्था याची सरमिसळ यात केली आहे. लेखकाने त्या गावची घटना त्यात दाखवली आहे. कोणत्याही परिस्थितीत डोळ्यापुढे होणारा अन्याय शेतकऱ्यांना सहज होत नाही. त्यात त्याची आणि सर्व शेतकरी वर्गाचे मोठ्या प्रमाणात होणारी हाल न पाहता आपण काहीतरी केले तरच परिस्थिती सुधारेल, असा त्याचा भाबडा विश्वास असतो; पण परिस्थितीच अशी बनलेली आहे की, कोणताही शेतकरी त्याला लवकर बदलू शकत नाही. ते कोणा एका दोघांचे काम नाही तर सर्व शेतकऱ्यांनी पुढे येणे गरजेचे आहे. केळी उत्पादक शेतकऱ्यांची शोकांतिका यादृष्टीने प्रस्तुत कादंबरीकडे पाहणे हे वरवर खरे वाटत असले तरी एवढेच या कादंबरीचे मूल्य नाही. भ्रष्ट व्यवस्था, निर्ढावलेला अधिकारी वर्ग, गावकीचे व भावकीचे राजकारण, मोडकळीस आलेल्या सहकारी संस्था, शेतकरी आत्महत्या, नात्या–गोत्यातील कृत्रिमता, काळ्या आईशी

असलेली बांधिलकी अशा विविध पैलूंनी 'पाडा' कादंबरी घडलेली आहे.

शेतकऱ्यांच्या अडाणीपणाचा फायदा घेऊन साठेबाजी करणारे व्यापारी, विजेचा लपंडाव, माल निघण्याच्या अगोदर झालेला कर्जाचा डोंगर यामुळे शेतकरी नागवला जातो. इच्छा असूनही तो परिस्थितीला दोन हात करू शकत नाही. हे भीषण वास्तव लेखकाने येथे शेतकऱ्यांच्याच तोंडून वदवलले आहे.

शेतकरी कोणत्याही परिस्थितीचा लवकर बळी पडत असतो. कारण कोणत्याही स्थितीचा खोलवर विचार शेतकऱ्यांकडून केला जात नाही. समोरच्या व्यक्तीवर विश्वास ठेवणे हाच त्याचा मुख्य उद्देश असतो. अनेक सरकारी धोरणाचा अवलंब केला जातो; पण तो ज्या शेतकऱ्यासाठी असतो तो त्याच्यापर्यंत पोहचत नाही, यांची खरी शोकांतिका आहे. सरकारी अधिकारी फक्त मोठ्या वर्गाचे आणि व्यवस्थेचे गुलाम आहे. शेती ही आज फक्त टाईमपास झालेली आहे. त्यातून कोणत्याही प्रकारचे उत्पन्न शेतकऱ्यांना म्हणावे अशा स्वरुपाचे मिळत नाही.

शेती धंदा म्हणजे फक्त एक प्रकारचा उदरनिर्वाहाचे साधन झाले आहे. कोणताही आर्थिक फायदा त्यातून होताना दिसत नाही. कादंबरीचा मुख्य उद्देश म्हणजे असा की शेतकऱ्यांना येणाऱ्या अनेक अडचणी आणि त्यातून त्याची होणारी फसवणूक गावकीचे राजकारण, ग्रामीण भागातील माणसांच्या नसानसात भिणलेली भाऊबंदकी, एकमेकांवरील कुरघोड्या, मानपान, नातेसंबंधातील ताणतणाव, शेतीवर असणारे जीवापाड प्रेम त्यासाठी वाटेल ते कष्ट उपासण्याची तयारी, दलाल, व्यापारी यांच्याकडून होणारी साठेबाजी व अडवणूक अशा नानाविध प्रश्नांनी शेतकऱ्यांची कोंडी केली जाते आणि त्यातच शेतकरी पार मेटाकुटीला येतो.

## खरा तो एकची धर्म

खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे ।
जगी जे हीन अति पतित,
जगी जे दीन पददलित
तया जाऊन उठवावे, जगाला प्रेम अर्पावे ।१।
सदा जे आर्त अती विकल,
जयांना गांजती सकल
तया जाऊन हसवावे, जगाला प्रेम अर्पावे ।२।
कुणा ना व्यर्थ शिणवावे,
कुणा ना व्यर्थ हिणवावे
समस्ता बंधू मानावे, जगाला प्रेम अर्पावे ।३।
प्रभुची लेकरे सारी,
तयांला सर्वही प्यारी
कुणा ना तुच्छ लेखावे, जगाला प्रेम अर्पावे ।४।
असे हे सार धर्माचे,
असे हे सार सत्याचे
परार्थी प्राणही द्यावे, जगाला प्रेम अर्पावे ।५।

साने गुरुजी

# जागरूक मतदार, लोकशाहीचा आधार

– योगिता पाचपिंड

आपल्या देशातील लोकशाही संपूर्ण जगात भक्कम व यशस्वी असल्याचे भारतीय निवडणूक आयोगाने सर्व जगाला दाखवून दिलेले आहे. अशा या भारत निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाल्याने हा दिवस देशात राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. मतदानाविषयी जनजागृती करण्याच्यादृष्टीने सर्व जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

जागरूक नागरिक होऊ या,
अभिमानाने मत देवू या

देशाच्या हितासाठी व विकासासाठी मतदान करणे आवश्यक आहे. मतदार हा राजा आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदारांनी निवडणुकीत मतदानाचा पवित्र हक्क बजावला पाहिजे. म्हणूनच जागृत मतदार हा लोकशाहीचा आधार आहे.

मतदान ही एखाद्या गटास अथवा समुहास, विशिष्ट निवडणुकीसाठी अथवा एखादा महत्वाचा निर्णय घेण्यासाठी लिखित अथवा ठरविलेल्या माध्यमाद्वारे मतप्रदर्शन करण्याची एक पद्धत आहे. याचा वापर, चर्चा, वादविवाद अथवा निवडणूक प्रचारानंतर करण्यात येतो.

लोकशाही राज्य प्रणालीत उच्च पदावरच्या व्यक्तींसाठी निवडणूक घेऊन मतदान करण्यात येते. एखाद्या क्षेत्रातील अशा निवडणुकीसाठी ज्याला मतदान करण्यात येते तो उमेदवार असतो व जो मतपत्रिकेद्वारे अथवा ठरवून दिलेल्या पद्धतीद्वारे मतदान करतो तो मतदार म्हणून ओळखण्यात येतो. म्हणूनच मतदारांनी केलेल्या मतांच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांची निवड केली जाते. म्हणून मतदार खूप महत्वाचे असतात.

वृद्ध असो किंवा जवान
सर्वजण करा अवश्य मतदान

मतुार हा आपल्या कर्तव्याविषयी जागरूक असेल तर लोकशाही शासनव्यवस्था अबाधित राहते. देशात व आपल्या राज्यातही लोकसभा निवडणुकीसाठी प्रक्रिया सुरू आहे. मतदार जनजागृती उपक्रमात मतदानासंबंधी बारीक सारीक बाबींचा विचार करतात. भारतीय निवडणूक आयोगाने राष्ट्रीय साक्षरता मिशन प्राधिकरणाच्या माध्यमातून लोकशाही निवडणूक आणि मतदार ही पुस्तिका राज्य साधन केंद्र पुणे यांच्यामार्फत प्रकाशित केली आहे. या पुस्तिकेत निरक्षर माणसालाही समजेल अशा पद्धतीने मांडणी करण्यात आली आहे. त्यामध्ये लोकशाही म्हणजे काय याचा अर्थ स्पष्ट केला आहे. लोकशाहीमध्ये जनता ही सर्वात मोठी ताकद असते. लोकशाहीमध्ये जनता ही शासन निर्माण करते. लोकतंत्राला आपण प्रजातंत्र, जनतंत्र आणि लोकशाही या नावांनी ओळखतो. आज आपण गर्वाने सांगू शकतो की, आपला भारत संपूर्ण जगातील सगळ्यात मोठे लोकशाही राष्ट्र आहे.

लोकशाहीमध्ये जनतेला आपले प्रतिनिधी निवडण्याचा हक्क असतो. ते आपल्यातील अशा व्यक्तीला निवडतात की जी शासनामध्ये लोकांची बाजू मांडू शकेल. जनता अशा लोकांमधून एका व्यक्तीला निवडते की, तो लोकांची बाजू मांडण्याचे आश्वासन देऊन निवडणुकीत उभा राहतो. निवडणूक हीच लोकशाहीचा आधारस्तंभ आहे. जनतेने निवडलेले हेच प्रतिनिधी सरकार स्थापन करतात. अशा रितीने जे सरकार तयार होते ते जनतेचे सरकार असते. मतदारांचे सर्वतोपरी प्रबोधन व्हावे व ते मतदानाला तयार व्हावेत हाच या मागचा उद्देश आहे. मतदारांना पुढील गोष्टी क्रमवार माहीत असाव्यात त्या अशाः मतदार कोण असतो, मतदार यादी म्हणजे काय, निवडणूक आयोगाचे वेळापत्रक, मतदार ओळखपत्र, निवडणुका कोण घेते, आचारसंहिता म्हणजे काय याविषयी माहिती मतदाराला असणे आवश्यक आहे.

Say yes to vote, No to Note.

भारत हा मोठा लोकशाही देश आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर लोकशाहीच्या माध्यमातून जनतेच्या आशा–आकांक्षाची पूर्तता करण्याचे अनेक स्तरावर प्रयत्न करण्यात आले.

‘जनतेचे राज्य’ ही संकल्पना स्वीकारून जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून राज्य चालविले जात आहे. योग्य निर्णय प्रक्रियेद्वारे देशाला प्रगतीच्या वाटेवर पुढे नेता यावे यासाठी जनतेने निवडलेले प्रतिनिधी

सक्षम असणे गरजेचे आहे. आणि त्यासाठी मतदारांनी निर्भयपणे विचारपूर्वक मतदान करणे तेवढेच आवश्यक आहे.

चला मतदान करू, जनहिताचे शासन घडवू

म्हणूनच मतदारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी निवडणूक आयोगाकडून स्विप कार्यक्रम राबविला जातो. तसेच नव मतदारांमध्ये निवडणूक प्रक्रियेविषयी माहिती व्हावी याकरिता राष्ट्रीय मतदार दिवसाच्या निमित्ताने विविध उपक्रम राबविले जातात. निवडणुका हा लोकशाही प्रक्रियेचा कणा आहे. विशेषतः निवडणुकांमध्ये स्थानिक स्तरावरील समस्यांची सोडवणूक करण्यासाठी मतपेटीच्या माध्यमातून योग्य प्रतिनिधी निवडणे आवश्यक आहे. या निवडीवरच विकासाचे नियोजन आणि सामाजिक विकास अवलंबून असतो. म्हणून मुक्त आणि निर्भय वातावरणात मतदारांनी मतदान करायला हवे.

निवडणुकांच्या वेळी कोणत्याही प्रलोभनाला किंवा दबावाला बळी न पडता आपल्या मताधिकाराचा उपयोग करायला हवा. योग्य पद्धतीने केलेले मतदान आपल्या हक्काचे रक्षण करण्याच्या दृष्टीने टाकलेले पहिले पाऊल असते ते नेहमी लक्षात ठेवायला हवे. मतदानाच्या वेळी मतदार यादीत नावे नसल्याने मतदानाचा अधिकार न बजावता आल्याचेही बऱ्याचदा निदर्शनास येते. वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यावर युवक–युवतींना मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी प्रोत्साहीत करायला हवे. निवडणूक आयोगाने मतदानातील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी निवडणूक ओळखपत्र तयार करण्याची विशेष मोहीम राबविली; मात्र अशा मोहिमेत 'शासनाचे काम' म्हणून लक्ष न देता देशाप्रतीचे महत्वाचे कर्तव्य म्हणून या मोहिमेत आपला सहभाग नोंदविणे गरजेचे आहे.

मतदार म्हणून आपल्याला असलेल्या अधिकारांबाबत जागरूक राहिल्यास देशातील लोकशाही व्यवस्था अधिक मजबूत होण्यास मदत होऊ शकेल. अशा स्वरुपाची जागृती घडवून आणण्यासाठीच निवडणुक आयोगातर्फे दरवर्षी २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.

## गे मायभू

*गे मायभू तुझे मी फेडीन पांग सारे;*
*आणीन आरतीला हे सूर्य, चंद्र, तारे.*

*आई, तुझ्यापुढे मी आहे अजून तान्हा;*
*शब्दात सोड माझ्या आता हळूच पान्हा.*

*आई, तुझ्यापुढे ही माझी व्यथा कशाला ?*
*जेव्हा तुझ्यामुळे ह्या जन्मास अर्थ आला !*

*मी पायधुळ घेतो जेव्हा तुझी जराशी,*
*माझी ललाटरेषा बनते प्रयाग काशी !*

*आई, तुझी अशी मी गाईन रोज गाणी*
*माझी तुझ्या दुधाने गेली भिजून वाणी !*

- सुरेश भट

# शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे, परिणाम व उपाय

– सीमा वडितके

दिवाळीतील महत्त्वपूर्ण दिवस म्हणजे बलिप्रतिपदा. शेतकऱ्यांचा राजा बळीराजा या दिवशी बळीराजा पुन्हा आपल्या प्रजेला भेटायला येतो, अशी भावना आहे. या दिवशी ग्रामीण भागात बहिणी भावाला ओवाळताना 'इडा पिडा टळो आणि बळीचं राज्य येवो' असे म्हणतात.

बळीराजा हा शेतकऱ्यांचा राजा असे मानतात. त्यामुळे आजही शेतकऱ्याला बळीराजा म्हटजे जाते. दसऱ्याच्या दिवशी बळीराजाला कपटाने मारण्यात आले. वामनाने व त्याच्या सैन्याने या दिवशी बळीच्या प्रजेला प्रचंड लुटले. सोने, चांदी, धन–धान्य सर्वच लुटले. प्रजा हताश झाली. अशावेळी बळीच्या शूर मुलाने बाणासुराने प्रजेला धीर देताना सांगितले की, 'आपला राजा मेला नाही. तो आपल्याला २१ दिवसांनी भेटायला येणार आहे.' दसऱ्यानंतर २१ वा दिवस म्हणजे प्रतिपदा. या दिवशी बळीराजा आपल्या दुःखी व कष्टी प्रजेला भेटायला येतो. प्रजा आपले सर्व दुःख बाजूला ठेवून आनंदाने आपल्या राजाचे स्वागत करते. नवे कपडे, मिठाई, फटाके, रोषणाई अशा जल्लोषात बळीराजाचे स्वागत होत असते. घराघरात बलिपूजन केले जाते.

ग्रामीण भागात बलिप्रतिपदा माता–बहिणी 'इडा पिडा टळो, बळीचं राज्य येवो' म्हणून घरातील पुरुषांना ओवाळतात. खंडोबा, म्हसोबा, मल्हार, मार्तंड हे बळीराजाच्या मंत्रिमंडळातील कार्यक्षम मंत्री होते, असे मानतात. बळीराजाचे नऊ खंडी होते. प्रत्येक खंडाच्या प्रमुखाला 'खंडोबा' म्हटले जात असे. आज जसे भारतातील प्रत्येक राज्याच्या प्रमुखाला मुख्यमंत्री म्हटले जात असे. आज जसे भारतातील प्रत्येक राज्याच्या प्रमुखाला म्हटले जात त्याचप्रमाणे खंडाचा प्रमुख 'खंडोबा' होय. प्रत्येक खंडात छोटे छोटे सुभे असायचे. अनेक सुभ्यांचा मिळून एक महासुभा असायचा. या महासुभ्याचा प्रमुख महासुभेदार म्हणजे म्हसोबा होय. त्याचप्रमाणे जिल्ह्याचा प्रमुख जोतीबा, मल्हार व मार्तंड हे सुरक्षा अधिकारी होय, अशी भावना आहे. बलिप्रतिपदेला केवळ बळीराजाचीच पूजा होते, असे नाही तर त्याच्या या मंत्री व अधिकाऱ्यांचीही पूजा होते. यावरून बळीच्या राज्यात किती सुखी व संपन्न होती हे लक्षात येईल, अशा सुखी व संपन्न राज्यावर नेहमीच परकीय आक्रमक वाईट नजर ठेवत असत.

बाहेरून आलेल्या परकीयांनी कपटाने बळीराजाला ठार मारले व राज्य बळकाविले. युद्धात जिंकता येत नाही म्हणून आर्यांचा सेनापती असलेल्या वामनाने बळीराजाला कपटाने मारले, असे म्हटले जाते. वामन अवताराने तीन पावले जमीन मागून बळीराजाला पाताळात गाडले. बहुजनांच्या हिताची प्रत्येक गोष्ट गाडून टाकण्यात आली आहे. बहुजनांच्या फायद्याचे आयोग आजही दडपून टाकण्यात येतात. बळीराजा असलेल्या शेतकऱ्याला आज आत्महत्या करावी लागत आहे. देशात पसरलेले जातीभेद, स्त्री–पुरुष विषमता, आर्थिक शोषण या सर्व घाणीचे साम्राज्य नष्ट करण्यासाठी बळीराजाच्या क्रांतीकारी इतिहासापासून प्रेरणा घेण्याची गरज आहे. सांस्कृतिक संघर्ष करावा लागेल म्हणून बलिप्रतिपदेच्या निमित्ताने बळीराजाचे स्मरण करण्याची गरज आहे.

इतिहासातील बळीराजा हा आक्रमकांविरोधात लढता लढता मेला. आजचा बळीराजा लढण्याऐवजी मरणेच पसंत करत आहे. लढाई सुरू होण्याआधीच तो पराभव मान्य करत आहे. त्याची लढण्याची प्रेरणा हरवली आहे. कारण त्याचा क्रांतीकारक लढण्याचा इतिहास हरवला आहे. त्याची लढाऊ 'आयडेंटीच' हरवली आहे. म्हणून आज बहुजन बुद्धिजीवींनी खरा इतिहास लिहिण्याचे काम हाती घेतले पाहिजे.

आत्महत्या आज नव्या नाहीत. दररोजचेच होऊन बसले आहे. बळीराजा संघटीत नसल्याने तो न्याय मागू शकत नाही. त्याचा विचार कोणी विचारी पाहात नाही. संसदेवर हल्ला करणारे अतिरेकी मेल्यावर जीवाचा आकांडतांडव करून मानवी हक्कवाले मानवतेस काळीमा लागल्याची बोंब ठोकलयाचे सर्वश्रूत आहे. मग शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर असा का समाज निष्ठूर झाला आहे?

लहरी निसर्गाने तार आज छेडली<br>
अवकाळी पाऊस, गारपीठाने

उभी पिके आज झोपली
कशी निसर्गाने थट्टा आज मांडली...
सरकारी मदतीसाठी पेटल्या मशाली
नुकसानीपोटी मारल्या पंचनाम्याच्या ओळी
कर्जापोटी हाती आली झोळी
कशी निसर्गाने थट्टा आज मांडली....
आश्वासने मदतीची अडकली दरबारी
सावकारी पाशाने आली कुटुंबे रस्त्यावरी
बळीराजाने दोरी गळ्याभोवती आवळली
कशी निसर्गाने थट्टा आज मांडली...

दिवसभर शेतात राब राबूनही शेती मालास किंमत मिळत नाही. सहकार सम्राट सहकाराच्या नावाने शेतकऱ्यांना लुटतच आहेत, बळीराजाच्या डोक्यावर कर्जाचा बोझा वाढतच आहे. शेतकऱ्याने शेतात ऊस पिकवावा अथवा कापूस नाहीतर कांदा कोणतेही पीक घेतली तरी शेवटी त्याला जावे लागते या धनदांडग्यांच्या हाती. शेतात पिके उभे आहे, तेव्हा व्यापारी मालाचे भाव वाढवितात आणि पीक बाजारात आल्यास धान्याचे भाव झपाट्याने खाली उतरवितात. नाईलाजाने कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यासच आपली जमीन खासगी सावकाराच्या तावडीतून सोडविण्यासाठी येईल त्या दामाने विकावेच लागते. यामुळे ना त्याच्यावरचा कर्जाचा बोझा कमी होतो ना त्याची जमीन वाचते. शेवटी बळीराजाला वैतागून आत्महत्या करावीच लागते.

२१ व्या शतकात देशाचा संपर्क जगाशी आला तरी बळीराजा अद्याप तळागाळातच आहे. या शासनाच्या अर्थव्यवस्थेला काय म्हणावं? आजकाल शासन चालविणे हे गरीबांसाठी, शेतकऱ्यांसाठी नसून धनदांडग्या दलालांचे आहे हे दिसून येते. शेतकऱ्यांची अधोगती रोखण्याची ताकद शासकीय यंत्रणेत आहे; पण खुल्या व्यापारी धोरणात त्याला टिकवून ठेवायचे असेल तर आत्महत्येपासून परावृत्त करायचे असेल, तर शेतकरी कुटुंबातून आलेले त्यांच्या समस्येची जाण असणारे नेते सत्ताधारी होणे गरजेचे आहे. आजपर्यंतचे बहुतांश सत्ताधारी ग्रामीण भागातून आलेले होते. हा युक्तीवाद खरा असला तरी त्यांनी शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करण्याऐवजी आपल्या स्वार्थासाठी शेतकरीविरोधी धोरणे राबविले हेही खरे आहे. निवडणुकीत भ्रष्ट माध्यमाचा उपयोग, पैशाचा दुरुपयोग यात खर्च झालेला पैसा वसूल करण्यासाठी आंतरराष्ट्रीय भांडवलशाहीपुढे नतमस्तक होतात. येथेच भारतीय शेतकऱ्यांची शोकांतिका झाली आहे.

सत्ताधाऱ्यांनी सत्तेवरून दूर गेल्यानंतर शेतकऱ्यांचा उपयोग आंदोलनासाठी केला. त्याचा शेतीविषयी कळवळा हा कायम ढोंगीपणाचा राहिला आहे. जेव्हा त्यांच्या हातून सत्ता जाते तेव्हा शेतकरी आठवतो; मात्र सत्तेवरती बसताच याकडे ते पाठ फिरवतात. आजचा शेतकरी संघटित नसल्याने त्यांच्या समस्या जगापुढे येत नाहीत. त्यामुळे त्याला न्याय मिळत नाही. जर संघटित झालाच तर त्याने उत्पादित केलेल्या शेतीमालाला तो स्वतः भाव मिळवून घेऊ शकतो. त्याने जर सहकाराकडे पाठ फिरविली तर राज्यकर्त्यांच्या चुली बंद पडतात. फक्त बळीराजाने आत्महत्या न करता संघटित व्हावे. संघटित शक्तीच्या जोरावरच इतिहास घडविता येतो हे त्याने जाणावे.

नैसर्गिक पद्धतीने शेतीधंदा यशस्वी होऊ शकतो. संपूर्ण जगाला आज या विचाराने वेढले आहे. याशिवाय पर्याय नाही याची जाणीव झाली आहे. पदव्या घेतल्या म्हणजे शेती शास्त्रज्ञ तयार होत नाहीत, शास्त्रज्ञ जमिनीतूनच उगवावा लागतो. विचार करून मंथन करून अंधश्रद्धा टाळून फक्त कामाची रित घ्या. स्वतःच्या परिस्थितीनुरूप तंत्रज्ञान विकसित करा. अध्यात्मामध्ये, धर्मामध्ये जसा प्रत्येकाचा पाया निश्चित केलेला असतो, तसा जाणीवपूर्वक मूल्यावर, शास्त्रावर, तंत्रावर आधारित स्वपरिक्षण करून परिस्थितीला जोखून घ्यावे.

आपली पुण्याजवळ शेती आहे. आता तंत्रज्ञान खूपच प्रगत झाले आहे. बांधावरून शेती करणाऱ्यांचे दिवस राहिले नाहीत. गड्यावर विसंबून शेतीची कामे वेळेवर होत नाहीत. शेती तसा वाटतो तेवढा सोपा धंदा नाही. पालकाने स्वतः तंत्रज्ञानात पारंगता मिळवली पाहिजे. तुमची शेती पुण्याजवळ असल्यामुळे तुम्ही पंचतारांकित हॉटेल व्यवसायाशी संपर्क साधून वर्षभर पुण्यातील पंचतारांकित व इतर हॉटेल व्यावसायिकांना वेळापत्रक तयार करून चांगला ताजा भाजीपाला पुरवला, त्यांच्याशी करार करून किंमती ठरवून घेतल्या तर तुमची शेती थोड्याच दिवसात नफ्यात आल्याशिवाय राहणार नाही.

महाराष्ट्रातील आधुनिक शेतीची सुरुवात १८२७ च्या सुमारास मुंबईमध्ये प्रथम व्यापाऱ्यांनी ॲग्रीकल्चरल

हॉर्टिकल्चरल सोसायटीची स्थापना करून केली. अठराव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंडमधील शेतीत मोठी क्रांती झाली होती. पीक काढणी, जनावरांची पैदास या बाबतीत बऱ्याच सुधारणा झाल्या. अशा सुधारणा आपल्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी या संस्थेची निर्मिती करण्यात आली होती. त्या काळात मुंबई शहराची रस्ते, पूल, शाळा अशा लोकोपयोगी गोष्टीची निर्मिती सरकारांवर अवलंबून न राहता जमशेटजी टाटा आणि जगन्नाथ शंकरशेठ यांच्यासारखे आघाडीचे उद्योजक व नेते लोकवर्गणीतून फंड उभारून करीत असत. पैसा गोळा करणे आणि त्याचा योग्यप्रकारे विनियोग होईल याची डोळ्यात तेल घालून काळजी घेत होते.

हिंदुस्थानातील पिकांची बियाणे लागवडीची पद्धत सुधारावी, चहा–कॉफी, ऊस इत्यादीचे मळे या देशात व्हावेत, तुतीचे पीक घेऊन त्यापासून शेतकऱ्यांनी रेशीम तयार करावे, असे प्रयत्न सुरू होते. जगातील पिके येथे रूजविण्याचा प्रयत्न सरकारी मदतीशिवाय केला गेला. आता ही प्रवृत्तीच नष्ट झाली आहे. त्यावेळी शैक्षणिक, व्यापार, शेती प्रगतीचा जेव्हा मी अभ्यास केला त्यावेळी मला असे आढळले की, ज्यांचा शेतीशी काही संबंध नव्हता अशा जगन्नाथ शंकरशेठ यांनी परदेशातील शेती सुधारणांचा अभ्यास करून त्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी स्वतःचा पैसा ओतून प्रयत्न केले. आज ही भावनाच व्यापाऱ्यांत किंवा पुढाऱ्यांत दिसत नाही.

मसाल्याची पिके, कॉफी, पानमळा ही सावलीत येणारी पिके पांगारा, सिल्व्हर, ओक, नारळ, सुपारीच्या बागेत घेण्याची रूढ पद्धत आहे. त्यासाठी शेडनेटचा वापर करून देशावर व कोकणात कोणत्याही जमिनीवर ही पिके घेणे सहजशक्य आहे; परंतु यासाठी प्रयोग करावे लागतील. केडगाव बेट (पुणे) येथे शेडनेटचा उपयोग करून चांगल्या पद्धतीने ढोबळी मिरची घेतली आहे. ज्यांना हरितगृहाची अति खर्चिक शेती परवडत नसेल, त्यांनी सध्याच्या शेतीमध्ये शेडनेटच्या साह्याने पिके घेण्यास सुरुवात केल्यास उत्पादनामध्ये चांगली वाढ करता येईल.

स्वामीनाथन समितीचा अहवाल शरद पवार यांनी नोव्हेंबर २००८ ला जाहीर केला. मोदींनी निवडणुकीतील प्रमुख घोषणा स्वामीनाथन आयोग लागू करण्याची केली होती. शेतमालाचा हमीभाव ठरवताना गुंतवणूक अधिक ५०% नफा असेल असे मोदी गरजले होते. अनेक वर्षे अनेक नेत्यांनी शेतकऱ्यांना मृगजळाच्या मागे फरफटत नेले. नंतर तोंडघशी पाडले. म्हणूनच आज नेत्यांच्या पाठी शेतकरी गेले नाहीत. पंचतारांकित संघर्ष यात्रा ही केवळ पर्यटन यात्रा ठरली. उत्पादन वाढल्यावर दलाल भाव पाडून टाकतात.

एकंदरीत आपल्याला दोन स्तरांवर काम करावे लागेल. पहिला म्हणजे संघर्षाचा मार्ग घ्यावाच लागेल. सरकारला शेतकरी संपन्न करावाच लागेल. तुमचे बुलेट ट्रेन सोबतच शेतकरी संपन्न करा. दुसरे म्हणजे शेतीच्या पद्धतीत आमूलाग्र बदल खत व कीटकनाशकावर बहिष्कार टाका व नैसर्गिक शेती करा. शेवटचा आणि सर्वात महत्वाचा विषय म्हणजे शेतकऱ्यांची अभेद्य एकजूट. आपण पाहिलेच आहे की शेतकरी संघटित झाला म्हणजे सरकारचे धाबे दणाणतात. ही एकजूट सर्व क्षेत्रात पाहिजे. एकत्र शेती, एकत्र विक्री या तत्वावर काम करावे लागेल. त्याचबरोबर बाजारपेठेत स्वतःची विक्री केंद्रे उभी केली पाहिजेत. शहरात राहणारी माणसे ही शेतकऱ्यांचीच मुले आहेत म्हणून त्यांनी शहरात आपल्या गावासाठी / तालुक्यासाठी विक्री केंद्रे उभारली पाहिजेत. बळीराजा जागा होत आहे. जगातील सर्वात मोठी शक्ती म्हणजे जनशक्ती असते.

शेतकरी आत्महत्त्या...
का करतो त्याग या अनमोल देहाचा
का कंटाळला या रूपेरी जीवनाला
का पोरके करतो या कोवळ्या–निष्पाप लेकरांना...
का नाही ठाव तुला,
तिमिराकडून वाट जाते प्रकाशाकडे
असतील जरी दुःखाच्या सरीवरी सरी...
तरी पुन्हा येतील रे आनंदाच्या सरी तुझ्या दारी...
का आमच्या विचारांची करतोस दिवाळखोरी
नसली आली विकासाची गंगा दारी
म्हणून तथाकथित सुधारणावाद्यांच्या आव्हानाने
का थांबली नाही विटंबना तुझ्या देहाची जिवंतपणी...
मेल्यावर करतील मग भांडवल तुझ्या देहाचे
हे टवाळखोर.. .
सत्तेचा चाखतील मलीदा आणि
खातील लोणी तुझ्या मढ्यावरचे
नाही राहिला वाली कुणी या धर्तीवर...
जाऊन सांग त्या परमेश्वराला
त्यांच्या कुकर्माची कहाणी
स्वर्गात गेल्यावरी...

## नसतेस घरी तू जेंव्हा

जीव तुटका तुटका होतो,
जगण्याचे विरती धागे
संसार फ़ाटका होतो .

नभ फ़ाटून वीज पडावी
कल्लोळ तसा ओढवतो,
ही धरा दिशाहीन होते
अन चंद्र पोरका होतो .

येतात उन्हे दाराशी
हिरमुसून जाती मागे,
खिडकीशी थबकून वारा
तव गंधावाचून जातो .

तव मिठीत विरघळणार्‍या
मज स्मरती लाघव वेळा,
श्वासाविन हृदय अडावे
मी तसाच अगतिक होतो .

संदिप खरे

## आयुष्याला द्यावे उत्तर...



असे जगावे दुनियेमध्ये, आव्हानाचे लावुन अत्तर,
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर..

नको गुलामी नक्षत्रांची, भीती आंधळी ताऱ्यांची,
आयुष्याला भिडतानाही, चैन करावी स्वप्नांची..

असे दांडगी इच्छा ज्याची, मार्ग तयाला मिळती सत्तर,
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर..

पाय असावे जमिनीवरती, कवेत अंबर घेताना,
हसू असावे ओठांवरती, काळीज काढुन देताना..

संकटासही ठणकावुन सांगावे, आता ये बेहत्तर,
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर..

करुन जावे असेही काही, दुनियेतुनी या जाताना,
गहिवर यावा जगास साऱ्या, निरोप शेवटचा देताना..

स्वर कठोर त्या काळाचाही, क्षणभर व्हावा कातर-कातर,
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर...

कवी : विंदा करंदीकर

# व्यथा शेतकऱ्यांच्या...

– जयश्री साळुंके

आपला भारत देश हा कृषीप्रधान देश आहे असे आपण आदराने सांगतो. आपल्या भारत देशातील ८० टक्के लोकसंख्या ही कृषीप्रधान आहे. हा शेतकरी आपल्या भारत देशातील राजा म्हणून ओळखला जातो; पण तोच राजा आज हालअपेष्टा शोषत आहे. त्याने केलेल्या श्रमाचा, मेहनतीचा मोबदला त्याला मिळत नाही. त्याने पिकविलेल्या शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही. सगळ्या जगाला अन्नधान्याचा पुरवठा करणारा शेतकरी आज स्वतःच्याच पोटाची खळगी त्याला भरता येत नाही. या शेतकऱ्याला फक्त नैसर्गिक आपत्तींनाच नव्हे तर या जगातील व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या पिळवणूक व फसवणुकीला सुद्धा सामोरे जावे लागत आहे.

माझा बाप शेतकरी, उभ्या जगाचा पोशिंदा
त्याच्या भाळी लिहिलेला, रात्रंदिवस कामधंदा

असा माझा मायबाप रात्रंदिवस शेतामध्ये काबाडकष्ट करतो. स्वतःचा घाम गाळून श्रम करतो व जगातील लोकांना अन्नधान्याचा पुरवठा करून असा जगाचा पालनकर्ता आजच्या परिस्थितीला आत्महत्या करण्याचे अगदी टोकाचे पाऊल उचलत आहेत; पण कशांमुळे शेतकरी आत्महत्या करतात,आपली जीवनयात्रा संपवितात, याला जबाबदार कोण? तुम्ही आम्ही सामान्य जनता का सरकार? का नैसर्गिक आपत्ती? याचा कधी कुणी विचार केलाय. नाही केला पण येथून पुढे आपण या गोष्टीचा विचार करायला हवा. शेतकरी आत्महत्या करतात, त्यामागे भरपूर कारणे आहेत.

नैसर्गिक आपत्तींना शेतकऱ्यांना नेहमी सामोरे जावे लागते. ओला दुष्काळ, पूर, कोरडा दुष्काळ, भूकंप, अशा अनेक आपत्तींना सामोरे जाण्याचे धाडस शेतकऱ्यांत असते आणि ते असायलाच पाहिजे. कारण नैसर्गिक आपत्तींना तसेच निसर्गावर आपण मातसुद्धा करू शकत नाही. म्हणजेच आपण अचानकपणे ज्या नैसर्गिक आपत्ती होतात त्यामुळे जीवित हानी व वित्तहानी मोठ्या प्रमाणात होते; पण आपण त्या नैसर्गिक आपत्तींना रोखू शकत नाही त्या निसर्गावर आपण विजय मिळवू शकत नाही हे खरे आहे; पण तितकेच खरे हे पण आहे की व्यापारी लोक शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक व फसवणूक करतात. शेतकऱ्याने कष्ट करून, पिकांवर कर्ज काढून, व्याजाने इतर जणांकडून १०% व्याजाने पैसे घेतात. आपल्या शेतमालांत पीकं उभी करतात; पण त्या शेतमालात ते पीक ऐन काढणीच्यावेळी व्यापारी लोक मालाच्या किंमती घसरतात व शेतकऱ्यांची फसवणूक करतात.

शेतकऱ्यांच्या पिकाला हमीभाव न मिळाल्याने हा एक आदर्श शेतकरी कर्जबाजारी होवून त्याची मानसिक अवस्था बदलून तो आत्महत्येला बळी पडतो. कारण त्याने शेतीत जेवढे भांडवल गुंतविलेले असते त्याच्या एकपटीने सुद्धा त्याला नफा तर होतंच नाही; पण त्याच जागेवर तो ५ ते १०% तोट्यात जातो, असा शेतकरी आत्महत्या नाही करणार तर दुसरे काय करणार पण ऐका या आत्महत्यांचे प्रमाण किती जास्त आहे. ८/९/२००९ रोजी लोकमत या वर्तमानपत्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या ६ वर्षात बीड जिल्ह्यातील ३८२ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या.

मेरे देश की धरती सोना उगले,
उगले हिरे मोती, मेरे देश की धरती

हे गीत दर २६ जानेवारी व १५ ऑगस्टला शाळेत चालू असते. आपल्या या मातृभूमीसाठी, देशासाठी अन्नधान्य पिकविणारा, सुजलाम, सुफलाम धरती बनवणारा हा शेतकरी स्वतःच्या पोटाची खळगी भरण्यासाठी रात्रंदिवस शेतात राबतो; परंतु दोन वेळेचे पोटभर अन्नही नीट त्याच्या वाट्याला येत नाही. शेवटी शेतकरी आत्महत्या करतो. या शेतकऱ्याने आत्महत्या केल्यानंतर त्याचे समाजावर व त्याच्या कुटुंबावर किती दुष्परिणाम होतात याचा कधी विचार केलायं कोणी. राजकारणी लोकांचे आपले ठरलेलं असतं,

बहोत हुए किसान पे अत्याचार,
अगली बार बीजेपी सरकार,
अगली बार काँग्रेस सरकार

राजकारणी लोक काय करतात एखाद्या टीव्हीमध्ये न्यूज वाचली की बीड जिल्ह्यातील एखाद्या शेतकऱ्याने आत्महत्या केली तर काय करतात फक्त वरील

घोषणाबाजी करतात. आताचेच एक चालू उदाहरण आहे जानेवारी २०१५ ते मे २०१५ या कालावधीत १०६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. ५६४ आत्महत्या विदर्भातील, ३६७ आत्महत्या मराठवाड्यातील, १३० नाशिक विभागातील, २६ पुणे विभागातील तर १ कोकण विभागातील शेतकऱ्यांनी केल्या. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांपैकी ज्या शेतकऱ्यांच्या नावावर जमीन नाही किंवा ज्या शेतकऱ्यांनी राष्ट्रीयकृत बँका, परवानाधारक सावकार यांच्याकडून कर्ज घेतलेले नाही. त्यांच्या वारसांना शासनाकडून मदत मिळत नाही. सरकार रस्ते, हवाईमार्ग त्याचप्रमाणे स्मारक उभारण्यासाठी कोटीने पैसा उधळतो; पण येथे नाही का?

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमुळे त्याच्या कुटुंबाला खूप आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते. कारण त्यांच्या कुटुंबातील भक्कम असा पायाच ढासळलेला असतो. त्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागते. त्या शेतकऱ्यांच्या मुला-मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण होतो. त्याचप्रमाणे फक्त कुटुंबावरचं नाही तर समाजात जर अशाचप्रकारे आत्महत्येचे प्रमाण वाढत राहिलं तर एक दिवस असा येईल की या जगात माणसाचे अस्तित्व राहणार नाही. काय खाणार तुम्ही? कसे जगणार तुम्ही? त्यामुळे आजकालच्या भावी पिढीने कुठेतरी ही जागतिक स्तरावरील समस्या सोडविली पाहिजे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी प्रयत्न करायला पाहिजे.

‘शेतकरी सुखी तरच जग सुखी’

आपला भारतातील शेतकरी राजा जर सुख-समाधानाने जगू शकला तरच हे जग सुखी राहील. सुजलाम्, सुफलाम् राहील. त्यामुळे या आत्महत्या रोखण्यासाठी आपण सर्वप्रथम जनजागृती करायला हवी. सरकारने शेतकऱ्याला आर्थिक सहाय्य पुरायला हवे. भांडवलाचा पुरवठा या राष्ट्रीयकृत बँकेमधून मोठ्या प्रमाणात करायला हवा जसे की आपण बघतो की जुलै-ऑगस्ट २०१८ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी व आर्थिक मंत्र्याने शेतकऱ्यांना बी-बियाणांचे वाटप केले. निम्म्या दरात सबसिडी देवून अशा प्रकारचे विविध योजना आपण करू शकतो; पण त्याची अंमलबजावणी करणे, त्याचे व्यवस्थित नियोजन करायला हवे.

जलसिंचनाच्या विविध सोयी उपलब्ध करून देणे जसे की आजच्या चालू परिस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलंय की, महाराष्ट्र राज्य हे पूर्णपणे जलसिंचनयुक्त शिवार बनवायचे. त्याचप्रमाणे पंतप्रधान कृषीसिंचन योजनेअंतर्गत ४८ प्रकल्पांना नाबार्डकडून ६९८५ कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले. जर आपण तुषारसिंचन, ठिबकसिंचन यांचा वापर मोठ्या प्रमाणात केला तर पाण्याची बचत होईल, पाण्याचा योग्य वापर होईल.

आमची माती पिकवू येथे माणिक मोती

शेतकऱ्यांना विविध मार्गदर्शन मिळावे म्हणून आकाशवाणी, टी.व्ही., न्यूज पेपर यांचा आपण मोठ्या प्रमाणात वापर करू शकतो. आकाशवाणी वर एक जुना कार्यक्रम आहे. ‘आमची माती आमची माणसे’ तर या कार्यक्रमाद्वारे राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे विविध कृषीतज्ज्ञ शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन करतात. शेती आधुनिक पद्धतीने कशाप्रकारे करू शकतो यावर न्यूज पेपरमध्ये लेख लिहू शकतो. अशा अनेक माध्यमातून आपण जनजागृती करायला हवी.

‘छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजनेअंतर्गत’ जी कर्जमाफी २०१७ मध्ये शेतकऱ्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी दिली तिचे नियोजन अतिशय उत्तमरित्या केलेले होते. खऱ्या गरीब शेतकऱ्यांना त्या योजनेचा लाभ मिळावा, पीककर्ज माफी मिळाली अशा अनेक योजना आपण राबवू शकतो जसे की, ‘पीक विमा’ योजना कारण नैसर्गिक आपत्तीपासून पिकांचे रक्षण होण्यासाठी पीक विमा योजना अतिशय उत्तम योजना आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांमध्ये एक आत्मविश्वास एक जिद्द व धाडसी वृत्ती पाहिजे. जेणेकरून शेतकरी प्रत्येक समस्यांना, संकटांना चांगल्याप्रकारे सामोरे जाईल. शेतकऱ्यांची मानसिक क्षमता त्याचप्रमाणे त्यांनी कशाप्रकारे शेतीचे नियोजन करावे व आत्महत्या करू नये. यासाठी मी एक कविता लिहिली आहे.

नाही मी आत्महत्या करणार नाही
कधी निसर्गाचा मारं तर कधी बाजारभावाचा मार
नाही मी आत्महत्या करणार नाही,
जन्मलो कर्जात म्हणून कर्जात मरणार नाही

नाही मी आत्महत्या करणार नाही,

आई–बापाला मी माझ्या सोडून जाणार नाही, अर्धांगणीचे कुंकू मी पुसणार नाही  लेकरा–बाळांना मी माझ्या पोरकं करणार नाही,

नाही मी आत्महत्या करणार नाही.

अफवांच्या जाहिरातींना मी फसणार नाही कमी उत्पन्नात

अधिक संशोधन करणार मी

नाही मी आत्महत्या करणार नाही,

पाण्याचा योग्य वापर करणार मी पाणी आडवा, पाणी

जिरवा, कार्यक्रम राबविणार मी सुक्ष्म सिंचनातूनच हे रान भिजविणारं मी

असा हा जगाचा पोशिंदा व अन्नदाता शेतकरी सदैव सुखी राहो, अशी आपण सगळेजण ईश्वरचरणी प्रार्थना करू यात. ‘जय जवान, जय किसान’ या घोषणेप्रमाणे आपण आपल्या भारत देशात या आदर्श शेतकरी राजाला सुखी ठेवण्यासाठी प्रयत्न करूयात!

जय हिंद! जय महाराष्ट्र !जय बळी राजा!



# एक होता कार्व्हर

– सोनाली जाधव

विचारांचा महामेरू असा ज्याचा नामोल्लेख करावा असा डॉ. जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर, वीणा गवाणकर यांनी 'एक होता कार्व्हर' यातून साध्या सरळ भाषेत जे जीवन चरित्र मांडलं ते काळजात घर करून बसण्यासारखं आहे, असं वाटतं.

कार्व्हरने घेतलेले कष्ट आणि त्याचा सकारात्मक दृष्टिकोन सगळे काही काल्पनिक बनवलेल्या फिल्मपेक्षा सुद्धा कितीतरी पटीने खूप काही होते. आम्ही जे काही कष्ट करतो, त्याच्यापेक्षा हजार पटीने कष्ट आणि मानसिक अवहेलना त्याने सोसली आणि म्हणूनच तो आज सर्व जगाच्या हृदयात घर करून राहिला आहे. कार्व्हर तू आम्हा तरुणांना एकच खूप मोलाचा धडा दिला आहेस तो म्हणजे परिश्रमांच्या जोरावर आणि सकारात्मक दृष्टिकोन असेल तर या जगात काहीही मिळवता येते.

या पुस्तकातील कार्व्हरच्या कॉलेज जीवनाचं वर्णन हा माझा सगळ्यात आवडता भाग. कार्व्हरची जिद्द, काटेकोर शिस्त आणि दुर्दम्य इच्छाशक्ती गवाणकरांनी अशी मस्त चितारली आहे. एका महान वैज्ञानिकाचा परिचय मनोवेधकपणे करताना लेखिकेने केलेलं दक्षिण अमेरिकेतल्या नीग्रो लोकांच्या जीवनाचं चित्रण मन विदीर्ण करून जातं, अंतर्मुख होऊन विचार करायला लावतं.,

जॉर्ज वॉशिंग्टन यांनी उच्चशिक्षण घेतले. शेतीविषयक उच्चशिक्षन घेऊन त्यांनी त्या ज्ञानाचा उपयोग आपल्या इतर बांधवांना व्हावा यासाठी त्यांनी सदैव प्रयत्न केले. शेती करून शेतकऱ्याला बऱ्याचदा तोटाच होतो. जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर यांनी यावर उपाय म्हणून मोलवृद्धी हा प्रकार शोधून काढला. पिकाची विक्री करण्याऐवजी त्यावर प्रक्रिया करून विविध अन्नपदार्थ बनवले आणि ते विकले. तर त्यातून जास्त नफा मिळतो. हे या मोलवृद्धीचे तत्व.

अमेरिकेतील अलाबामा येथील आफ्रिकी वंशीयांच्या वस्तीतील शेतकऱ्यांना त्यांनी शेंगदाण्यापासून दूध, दही इ. पदार्थ बनवण्यास शिकवले. **जिथून आलात तिथून पुढे चालत जा** असं ज्यांच्या कर्तृत्वशैलीतून व्यक्त होतं आणि जगातील पहिली फिरती प्रयोगशाळा स्थापन करून स्वतःसाठी संशोधन न करता माझ्या संशोधनाचा उपयोग जनसामान्यांना करता यावा यासाठी आयुष्यभर एकाच कपड्यानिशी सारं सहन करत भुईमूग आणि रताळे यापासून तब्बल ५०० च्या आसपास जीवन उपयोगी वस्तू तयार करून जगाच्या पाठीवर ज्यानं इतिहासात सोनेरी कर्तृत्व केलं अशा कार्व्हरला मानाचा मुजरा.

आयुष्यभराच्या पगाराची रक्कम (दहा हजार सव्वाशे डॉलर) चेकच्या स्वरुपात बँकेच्या खणात पडून असून स्वतः साठी एकाही चेकचा वापर न करणारे गृहस्थ खरंच मनाने आभाळाएवढे आणि कर्तृत्वाने सह्याद्री एवढे असतील हे नक्कीच. तरुणांनी आवर्जून वाचावे असे पुस्तक आहे. वीज, क्रिम, कँडी, रंग, पॉलिश, असे जवळपास ३०० पदार्थ बनविण्याची पद्धत आणि त्यातून पिकांची मोलवृद्धी शिकवली आहे.

## देणाऱ्याने देत जावे



देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे
हिरव्या पिवळ्या माळावरुनी
हिरवी पिवळी शाल घ्यावी
सह्याद्रीच्या कड्यावरुनी
छातीसाठी ढाल घ्यावी ।
वेड्यापिशा ढगांकडून
वेडेपिसे आकार घ्यावे
रक्तामधल्या प्रश्नांसाठी
पृथ्वीकडून होकार घ्यावे ।
उसळलेल्या दर्याकडून
पिसाळलेली आयाळ घ्यावी
भरलेल्या भीमेकडून
तुकोबाची माळ घ्यावी ।
देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे
घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे !!

विंदा करंदीकर

## वाचते व्हा...

– संपदा गायके

बहुतेक शिक्षक व जागरूक पालकांना खूप चांगली पुस्तके वाचावयाची असतात. पण ती पुस्तके कुठे मिळतात? त्या पुस्तकांची नावे कोणती? त्याचे लेखक, प्रकाशक कोण, पुस्तकाचा मुख्य विषय कोणता? असे बहुसंख्य प्रश्न त्यांच्या मनात असतात. या प्रश्नांची शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांना उत्तरे मिळावीत व त्यांनी वाचते व्हावे यासाठी या ठिकाणी जाणीवपूर्वक शिक्षण अभ्यासक हेरंब कुलकर्णी यांनी निवडलेल्या शिक्षणविषयक पुस्तकांची माहिती देत आहोत.

| अ.क्र. | पुस्तकाचे नाव | लेखन मुख्य विषय | लेखक, अनुवादक |
|---|---|---|---|
| १. | तोत्तोचानप्रेम | हीच शिक्षणाची भाषा | तेत्सुको कुरोयानामी<br>अनुवाद : चेतना सरदेसाई शिवानी |
| २. | आमादेर (शांतीनिकेतन) | टागोरांचे शांतीनिकेतन | अनुवाद : आशा साठे |
| ३. | माझी काटे मुंढरीची शाळा | शिक्षकाच्या समर्पणाची कहाणी | गो. ना. मुनघाटे |
| ४. | माझे विश्व मुलांचे | सामाजिकतेचे रोपण<br>क्रांतीकारी मार्ग | वासिली सुखेम्लिन्स्की<br>अनुवाद : लोकवाङ्मय प्रकाशन |
| ५. | नीलची शाळा ''समर हील'' | बालसंगोपनाचा | ए.एस. नील,अनुवाद : हेमलता होनवाड,सुजाता देशमुख |
| ६. | टू सर विथ लव्ह | मुले म्हणजे जणू मोठी माणेसच | ब्रेथवेल<br>अनुवाद : लीना सोहनी |
| ७. | फ्री अॅट लास्ट | अभ्यास न शिकवणारी शाळा | डॅनियल ग्रीनबर्गन<br>अनुवाद : नीलांबरी जोशी |
| ८. | कणवू | भारतातील प्रयोगशील शाळा | रेणू दांडेकर |
| ९. | शिक्षण : आनंदक्षण | महाराष्ट्रातील प्रयोगशील शाळा | रमेश पानसे |
| १०. | टीचर | शाळेतच ठरते – युद्ध की शांती? | सिल्व्हिया वॉनर्र<br>अनुवाद : अरुण ठाकूर |
| ११. | माय कंट्री स्कूल डायरी | एका समर्पित शिक्षिकेची डायरी | ज्युलिया वेबर गार्डन<br>अनुवाद : विद्या भागवत |
| १२. | कोसबाडच्या टेकडीवरून | बालशिक्षणातील अभिनव प्रयोग | अनुताई वाघ |
| १३. | सहज शिक्षणाची प्रयोग शाळा | सहभाग शिक्षण – पालकांचा | विनोदीनी पिटके काळगी |
| १४. | नंदादीप आठवणीतल्या आठवणी | आठवणी एका मुख्याध्यापकाच्या | अरविंद वैद्य |
| १५. | हिंद सेवक | अष्टपैलू शिक्षकाच्या आठवणी | मधुसूदन मुळे |
| १६. | वादळवारा | आत्मसन्मानाच्या संघर्षाची कथा | प्रा. विलास पाटील |
| १७. | कुडाळकरांची शाळा | शैक्षणिक उपक्रम | चंद्रकांत भंडारी |

| अ.क्र. | पुस्तकाचे नाव | लेखन मुख्य विषय | लेखक, अनुवादक |
|---|---|---|---|
| १८. | शिक्षण प्रवाहाच्या उगमापाशी | उपक्रमशीलतेचा वस्तुपाठ | सुचेता पडळकर |
| १९. | प्रिय बाई | प्रस्थापित शिक्षणावर ओढलेले आसूड | अनुवाद : सुधा कुलकर्णी |
| २०. | प्लॅटफॉर्म नंबर झिरा | रेल्वेस्टेशनच्या वेदनिका | अमिता नायडू |
| २१. | न पेटलेले दिवे | शाळेच्या परिघाबाहेरील मुले | राजा शिरगुप्पे |
| २२. | प्रकाशाच्या उंबरठ्यावर | शालाबाह्य मुलांसाठी नवी उमेद | भाऊ गावंडे |
| २३. | नापास मुलांची गोष्ट | शिक्षण व्यवस्थाच नापास | संपादन : अरुण शेवते |
| २४. | या गोष्टीचा विचार करा | संवाद : जे कृष्णमूर्तींशी | जे. कृष्णमूर्ती<br>अनुवाद : दिवाकर घैसास |
| २५. | शिक्षणक्रांती हीच क्रांती | आचार्य रजनीशांची शिक्षणक्रांती | आचार्य रजनीश |
| २६. | विनोबांचा शिक्षणविचार | विनोबांचा शिक्षण विचार | संकलन : राम शेवाळकर |
| २७. | दिवास्वप्न | दिवास्वप्न | गिजुबाई बधेका<br>अनुवाद : शोभा भागवत |
| २८. | शिक्षक असावा तर असा | गिजुभाईंना अपेक्षित शिक्षक | गिजुभाई बधेका<br>अनुवाद : अनंत वाईकर |
| २९. | शासन, शिक्षण आणि समाज | भारतीय शिक्षणव्यवस्थेवर भाष्य | कृष्णकुमार<br>अनुवाद : गणेश विसपुते |
| ३०. | ज्ञानरचनावाद | शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका | रमेश पानसे |
| ३१. | गोष्टी जन्मांतरीच्या | गोष्ट सांगा गोष्ट | रेणू गावस्कर |
| ३२. | एका ग्रंथपालाची प्रयोगशाळा | वाचन संस्कृती रूजवताना | नरेंद्र लांजेवार |
| ३३. | लिहिणं मुलांचं शिकवणं शिक्षकांचं | भाषेचा खेळ खेळताना | लिलाताई पाटील |
| ३४. | शिक्षण देता घेता | शिक्षण देता घेता | लिलाताई पाटील |

| अ.क्र. | पुस्तकाचे नाव | लेखन मुख्य विषय | लेखक, अनुवादक |
|---|---|---|---|
| ३५. | मुलांची भाषा आणि शिक्षण | वाचन -लेखनाची दिशा | कृष्णकुमार<br>अनुवाद : वर्षा सहस्त्रबुद्धे |
| ३६. | कल्पक बनू या | कल्पनाशक्तीचा विकास | डॉ. अशोक निरफराके |
| ३७. | कट्टा शिक्षणाचा | शिक्षणविषयक गप्पांची मैफल | संपादन : बसंती रॉय |
| ३८. | शिक्षण संवाद | कृष्णमूर्तींनी शिक्षक – विद्यार्थ्यांशी मारलेल्या गप्पा | जे. कृष्णमूर्ती |
| ३९. | खेळातून भाषाविकास | भाषेचे रंजक खेळ | रेणू दांडेकर |
| ४०. | असे शिक्षक असे उपक्रम | विविध उपक्रमांचे संकलन | संपादन : श्रीकांत नाईक |
| ४१. | धोका : शाळा | शिक्षणावरील व्यंगात्मक टिप्पणी | क्लॉडिअस |
| ४२. | मोरमित्रांची शाळा | वंचित समूहातील शिक्षण प्रयोग | संपादन : राजन इंदुलकर |
| ४३. | का कराचं शिकून | भटक्यांच्या शिक्षणाची कोंडी | लक्ष्मण माने |
| ४४. | वटवृक्षांच्या सावलीत | निरलस कार्यकर्तीची आत्मकथा | सिंधुताई अंबिके |
| ४५. | मुलांचे शिक्षणःपालक व शासन | समस्याची शास्त्रीय मांडणी | रमेश पानसे |
| ४६. | अर्थपूर्ण आनंदशिक्षणासाठी | अनुभवाधिष्ठित हस्तपुस्तिका | लिलाताई पाटील |
| ४७. | वाचन संस्कार | वाचनाचे तंत्र आणि मंत्र | सतीश पोरे |
| ४८. | शिक्षण | समज वाढवणारी व्याख्याने | अनुवाद : विलास रणसुभे |
| ४९. | परीक्षेला पर्याय काय ? | मूल्यमापन पद्धतीचा पर्याय | संपादन : हेरंब कुलकर्णी |
| ५०. | समकालीन शिक्षण | तिरकस पण अभ्यासपूर्ण लेख | प्रा. यादव गायकवाड |
| ५१. | नयी तालीम : गांधी प्रणित शिक्षणविषयक प्रयोगांचा इतिहास | गांधींचे शिक्षणविषयक चिंतन | रमेश पानसे |

| अ.क्र. | पुस्तकाचे नाव | लेखन मुख्य विषय | लेखक, अनुवादक |
|---|---|---|---|
| ५२. | आमचा काय गुन्हा? | गुन्हेगारी वर्तनामागची चिकित्सा | रेणू गावस्कर |
| ५३. | एक विसाव्या शतकातील समग्र शिक्षण | आगामी आव्हानांचा आढावा | सुनीलकुमार लवटे |
| ५४. | शाळा भेट | शिक्षकांची अस्मिता अन् आवाज | नामदेव माळी |




## किताबें

सफदर हश्मी

किताबें बातें करना चाहती हैं
गागर में सागर भरना चाहती हैं।
अपने बंद पन्नों में हमसे
शायद कुछ कहना चाहती हैं।।

अलमारी में बंद पड़ी वह किताब
अपनी दास्तान सुनाना चाहती है।
कभी शौक से पढा जाता था उसे
वो आज बताना चाहती है।।

धूल से सनी हुई वह किताब
आज फिर से खुलना चाहती है।
जिंदगी की मिठास में
एक बार फिर घुलना चाहती है।।

तेज हवाओं की आहट से
चाहती है फिर से पन्ने पलट जाएं।
और शायद कोई लेखक,कवि के
हाथों में वह फिर से महक जाएं।।

किताबें बातें करना चाहती है
गागर में सागर भरना चाहती है।
अपने बंद पन्नों में हमसे
शायद वो यह कहना चाहती हैं।।

# शिक्षणावर बोलू काही!

– संपदा गायके

''... शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो ते प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.'', असे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. डॉ. आंबेडकरांचे विचार हे कोणत्याही एका ठराविक काळापुरते, समाजापुरते मर्यादित नव्हते. त्यांचे शिक्षणाविषयीचे विचार कोणा एका समाजापुरते मर्यादित नव्हते. त्यांचे शिक्षणाविषयीचे विचार आजही चपखलल लागू होतात. काय हेतू होता त्यांचा शिक्षणाविषयी, असे विचार मांडण्याचा. तर सर्व दलित बंधू–भगिनींनी शिकावं, आत्मसन्मानाची जाणीव व्हावी, विकास घडावा, देशाची प्रगती व्हावी आणि या सर्वांमध्ये दलितांचाही तेवढाच समावेश असावा जेवढा स्वतःला श्रेष्ठ म्हणवणाऱ्यांचा आहे. आपल्या आयुष्यात शिक्षण किती महत्वाचे आहे, समाजाला बदलण्याची ताकद ही शिक्षणात आहे. त्यातून प्रबोधन घडून झोपलेल्या, निद्रिस्त असलेल्या समाजाला आणि बाळबोध मनालाही जाग यावी ही अपेक्षा डॉ. बाबासाहेबांची होती.

आज आपण सर्वच शिक्षित झालो; पण सुशिक्षित नाही, संस्कारशील नाही, सुशिक्षित असणे म्हणजे नेमके काय? हे आजही आपल्याला उमगू नये? का? एवढे आंधळे झालोय आपण! की आपल्याला डोळे उघडे ठेवून बघायचेच नाही की काय सत्य आणि काय असत्य आहे. सुशिक्षित असणं म्हणजे नेमके काय? लिहिता–वाचता येणे म्हणजे सुशिक्षित असणे? high class branded महागड्या वस्तू वापरणे म्हणजे सुशिक्षित असणे? की आपल्या परंपरा, संस्कार जपत, सद्सद्विवेक बुद्धी जागृत ठेवून वर्तन करणे म्हणजे सुशिक्षित असणे होय? काय आहे या प्रश्नाचं उत्तर? आपल्या सर्वांनाच हे माहीत नाही की जाणून घेण्याची इच्छाच नाही. डोळ्यावर झापडं ओढून आपण सर्वचजण शांत बसलोय. घडणाऱ्या गोष्टींसाठी कोणा एकाला जबाबदार धरणे हेही योग्य नाही. स्वतःला सुशिक्षित म्हणवणाऱ्या पांढरपेशी लोकांच्या घरात काय स्थिती आहे हे आपण सर्वचजण जाणून आहोत. गडगंज पगाराची नोकरी असणे, घरात क्लास वन वस्तूंची जमवाजमव करणे हे सर्व सुशिक्षित असण्याचे लक्षण नाही. जर आपण खरंच शिक्षित असतो तर देशात वृद्धाश्रमांची संख्या वाढली नसती, अनाथालयांची संख्या कमी झाली असती; परंतु याउलट स्थिती आज आपण बघतो, ज्या आई–वडिलांनी जन्म दला, सांभाळ केला, आपल्याला घडविले, आपले हट्ट पुरविण्यासाठी रक्ताचे पाणी केले, त्या जन्मदात्यांच्या सांभाळासाठी आपल्याला वेळ नाही, त्यांच्यासाठी आपल्या मनात तर नाहीच; परंतु घरातही जागा नाही, एक एवढे संकुचित आपण शिक्षणाने झालोय.शिक्षणाने माणूस विस्तीर्ण मनाचा, सर्वांना सामावून घेणारा, विनम्र आणि सृजनशील व्यक्ती घडायला हवा. ज्या शिक्षणासाठी थोरांनी लढा दिला त्या शिक्षणाचा अर्थच आज बदललाय. काळानुसा समाजात बदल व्हायला हवा. हे योग्यच आहे. नवीन गोष्टी, नवीन घटना, होणारे बदल जेव्हा एक मन स्वीकारते तेव्हाच सकारात्मक बदल समाजात घडतात; परंतु नवीन गोष्टी स्वीकारताना काय बरोबर काय चुकीचे याचा सारासार विचार एकदा व्हायला हवा आणि जे योग्य आहे त्याचाच स्वीकारही व्हायला हवा.

आज सगळ्याच क्षेत्रात अमुलाग्र बदल होत आहेत. या बदलांना माझा विरोध आहे, असे नाही; परंतु हे बदल सकारात्मक दृष्टीने व्हायला हवेत. तसेच बदल शिक्षण क्षेत्रातही होत आहेत. शिक्षणाची भाषा, पद्धत आज बदलत आहेत. फक्त पारंपारिक पद्धतीने शिक्षण न देता आज तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शिक्षण होत आहे. Computer google, internet मुळे ज्ञानाचा खजिना आपल्यासाठी खुला झाला आहे. कोणत्याही विषयाचे ज्ञान अगदी सहज, क्षणाचाही विलंब न होता आपल्यासाठी उपलब्ध असते, त्यासाठी कोणाच्याही सहाय्याची, मार्गदर्शनाची आवश्यकता नसते, वेळेचे बंधन नसते. हव्या त्या गोष्टी हव्या त्या वेळेला उपलब्ध होऊ शकतात. शिक्षणाच्या जोरावरच आपण विविध शोध लावू शकलो. त्याच्या बळावरच आज आपण प्रगती साधू शकतो. मंगळावर, चंद्रावर स्थायिक होण्याचं स्वप्न माणूस बघतोय ते केवळ ज्ञानाची द्वारे खुले झाल्यामुळेच. शिक्षणाने समाजात आमुलाग्र बदल होत आहे, झाले आहे, त्यामुळे जीवन पद्धती बदललेली आहे. प्रगतीमुळे घडून आलेले बदलच आज पुन्हा एकदा घातक ठरत आहे. सकारात्मक बदलाबरोबरच नकारात्मक बदलही घडतात.

सर्वच घडणाऱ्या बदलांवर बोलणे, त्यावर भाष्य करणे माझे कार्यक्षेत्रही नाही आणि अधिकारही नाही. आज बोलावेसे वाटते ते आजच्या शिक्षण पद्धतीवर, आजच्या

शिक्षण पद्धतीचा विचार करताना मन उदास होते. आजची भ्रष्ट आणि स्वार्थाचा विचार करणाऱ्या लोकांमुळे शिक्षण पद्धती मोडकळीस आली आहे. देशाचा सर्वांगिण विकास आणि प्रगती साधण्यासाठी जशी शिक्षण व्यवस्था कारणीभूत असते तसेच देशाचा विनाश घडवण्यासाठी अण्वस्त्रांची गरज नाही. तर भ्रष्ट आणि कमकुवत शिक्षण पद्धती सहजरित्या देशाचा विनाश घडवू शकतो. कारण शिक्षण योग्य आणि उत्तम दर्जाचे नसेल तर घडणारे विद्यार्थी चुकीचेच असणार, एक शिक्षकच जर चुकीच्या पद्धतीने घडला तर तो पिढ्यान् पिढ्या बरबाद करू शकतो. त्याच्या हातून उत्तम दर्जाचे डॉक्टर, इंजिनियर, वकील घडणे अशक्यच आहेच; परंतु ही शिक्षण व्यवस्था देशाच्या विकासास कारणीभूत ठरू शकते.अन्यथा देशाचा ऱ्हास व्हायला वेळ लागणार नाही. एवढी ताकद एका शिक्षकात आणि व्यवस्थेत असू शकते. पूर्वी गुरुकुल पद्धती होती. वयाच्या ठराविक काळापर्यंत तो गुरुच्या सानिध्यात असे आणि म्हणूनच एका खऱ्या शिष्याचे सर्वच गुण–अवगुण गुरू जाणून असे आणि त्यामध्ये सकारात्मक बदल योग्यवेळी घडवून आणणे ही त्यांची जबाबदारी असे. विद्यार्थी घडला किंवा बिडघला यांची संपूर्ण जबाबदारी त्या शिक्षकावर, गुरुवर असे; परंतु त्यानंतर शाळा व्यवस्था निर्माण झाली. विद्यार्थी शिक्षकाबरोबरच आई–वडिलांच्या सान्निध्यात शिकू लागला; परंतु शिक्षक आणि विद्यार्थी यांचे नाते तेवढेच घट्ट होते, जेवढे ते गुरुकुल पद्धतीत होते. शिक्षक हा आपल्या सर्वच मुलांशी, विद्यार्थ्यांशी जोडला गेलेला होता. विद्यार्थ्यांशी आणि त्यांच्या पालकांशीही त्याचा अनन्यसाधारण संबंध होता. समाजाचा एक भाग होऊन शिक्षक काम करत होता. गावातील सर्वच गावकरी त्या शिक्षकाकडे आदराने बघत असत.

शिक्षक आणि गावकरी, पालक यांच्या नात्याची वीणच आज उसवली आहे. त्यांचे भावविश्व एक राहिले नाही. शिक्षक आपली नोकरी, उपजिविकेचे साधन म्हणून या पेशाकडे बघतो तर पालक, गावकरी मोबदला घेतात तेव्हा विद्यार्थी घडविणे हे त्यांचे कार्यच आहे, असा समज आज समाजात पाय घट्ट रोवून उभा आहे. एका विद्यार्थ्याला घडवताना त्याच्या समाजाच्या, घरच्या वातावरणाचा आर्थिक परिस्थितीचा तारतम्य साधावा लागतो.

तारेवरची कसरत करावी लागते. शिक्षकाला स्वतःला झोकून देवून काम करावे लागते; परंतु आजच्या अपडाऊन संस्कृतीला शिक्षकाचे हे समर्पण समजणे कठीणच. विद्यार्थ्यांच्या रोजच्या अनुभवांना, छोट्या छोट्या गोष्टींचा संबंध त्याच्या शिकण्याशी जोडायला हवा, त्यांच्या भावविश्वात डोकवायला हवे. प्रसंगी त्यांच्या अडचणी स्वतःच्या समजून त्याच आत्मीयतेने सोडवायला हव्यात. फक्त ज्ञानाची फवारणी करून उपदेशांचे डोस पाजून लोक शिक्षण बदलू शकत नाहीत तर त्या भागाचा, त्या समाजाचा अविभाज्य भाग होऊन ठिबक सिंचन या पद्धतीने एक शिक्षक शिक्षणाची वेल बहरू शकतो. हा आत्मविश्वास सर्वात आधी प्रत्येक शिक्षकात रूजवायला हवा. कारण एक शिक्षक घडला तर आणि तरच विद्यार्थी घडू शकतो. आणि शिक्षक घडविण्यासाठी, घडण्यासाठी प्रेम हीच शिक्षणाची भाषा असायला हवी. एक सृजनशील मनच शिक्षक असू शकते आणि तेच मन एक प्रतिभाशाली विचारवंत घडवू शकते. विद्यार्थ्याला लिहिता–वाचता येत नाही म्हणून धाक धपटशहा न करता विविध प्रयोग अवलंबून प्रसंगी शिक्षकाने प्रयोगशील बनून विद्यार्थ्यांच्या मनात त्याचे बीज रूजवायला हवे. प्रेमानेच आपण जग जिंकू शकतो. त्याच प्रेमाची ऊब विद्यार्थ्याला शिक्षणातून सतत मिळायला हवी. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या प्रेममय संबंधाच्या किनाऱ्यावरच शाळा भरू शकतो. मुलांचे भावविश्व समजून त्याच्याशी संवाद साधणे एका शिक्षकाला जमायला हवे. ही जणू शिक्षक म्हणून त्याची पात्रताच असायला हवी. रेल्वेच्या रिकाम्या डब्यात शाळा भरवणारे जपानमधील कोबायशी हे दाखवून देतात की प्रेमच मुलांना बदलू शकते, घडवू शकते याचा वस्तूपाठच ते घालून देतात.

विद्यार्थ्याला शिकविताना, घडविताना केवळ निसर्गाचा वापर करणे गरजेचे नाही तर श्रम, कष्ट, सर्जन, नवनिर्मिती यांचेही विश्व मुलांभोवती उभे करायला हवे. श्रमातून त्याला आपल्या पालकांच्या कष्टाची जाणीव व्हायला हवी. आपले पालक कोणत्याही कष्टाशिवाय आपल्याला शिक्षणाची दारे खुले करतात. त्यातूनच शिक्षणाविषयी अनादराची भावना निर्माण होते. त्याला जाणीव करून दिल्यावरच त्याला शिक्षणाचे खरे गमक उमगेल. कम्युनिस्ट देशांचे उदाहरण घेतल्यास मुलांच्या मनात श्रमाविषयी आदर निर्माण व्हायला

हवा. यासाठी मुलांना कष्ट करायला प्रोत्साहित केले जाते. याच्याउलट परिस्थिती ही आपल्या देशात आपणास बघावयास मिळते. कष्टाविषयी आदर, कष्टाशिवाय कोणतीही गोष्ट साध्य होऊ शकत नाही. हा विचार रूजवणेच आपले पालक आणि पर्यायाने शिक्षकही विसरून गेलेत. आपल्या पाल्याला कोणताही त्रास न होता सर्व गोष्टी सहजरित्या उपलब्ध व्हाव्यात अशी भावना प्रत्येक पालकाच्या मनात असते. त्यामुळे आपण बघतो मुलाच्या मागणीच्या आधी त्याला सोयी उपलब्ध असतात. त्यामुळे त्या वस्तुंची किंमत मुलांना नसतेच. म्हणूनच पाश्चात्य देशामध्ये अगदी लहानपणापासूनच कष्ट करण्याची सवय मुलांमध्ये रूजवली जाते.

आज माणूस जितका जास्त शिकेल, तितका तो आत्मकेंद्रित होतो आहे. समाजाशी बांधिलकी असणारा नागरिक घडविण्यासाठी सामाजिक भावना वृद्धींगत करणारे शिक्षण सर्वच देशात आज गरजेचे आहे. कारण शोषितांविषयी आणि अन्याय झालेल्या लोकांविषयी आस्था व चिंता वाटणे, सर्जनशील पद्धतीने विचार करायला शिकवणे, त्याला शोधक वृत्तीचा माणूस बनविणे हे शिक्षणाचे महत्वाचे कार्य आहे. ही सामाजिक भावना, औदासिन्याशी दोन हात करण्याचे साधन आहे. मुलांमध्ये सर्जनशीलता, रसिकता, सामाजिकता, श्रमप्रतिष्ठा ही सर्व मूल्ये रोजच्या कार्यातून व शिक्षणातून एक शिक्षकच रूजवू शकतो. कारण आज माणूस माणसांपासून दुरावत चालला आहे. शिक्षणाने त्याला स्वतःचा आत्मसन्मान, स्वची जाणीव सद्सद्विवेक बुद्धी या सर्व बाबींची जाणीव करून देणे गरजेचे आहे. या सर्व बाबी एक डोळस शिक्षकच करू शकतो; परंतु मुलांवर कोणताही मालकी हक्क न सांगता अधिकार न गाजवता शिक्षकाने हे काम सातत्याने करावे.

आज आपण बघतो आपल्या देशाची स्थिती काय आहे? दिवसेंदिवस बेरोजगारीचे प्रमाण हे अधिकाधिक वाढत आहे. रोजगार उपलब्धतेचे आव्हान आपल्या शासनापुढे उभे आहे. बेरोजगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी शिक्षण व्यवस्थेत मुलगामी बदल करणे गरजेचे आहे.

कौशल्यपूर्ण शिक्षण तसेच व्यावसायिक शिक्षण देणे गरजेचे आहे. या शिक्षणातून विद्यार्थी स्वतःच्या कला कौशल्याचा वापर करून स्वतःच्या उपजिवीकेचा प्रश्न सोडवू शकतात आणि त्यातूनच देशातील तरुणांच्या बेरोजगारीचा प्रश्न सुटेल. आज सर्वांचा ओढा हा इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे आहे आणि मराठी माध्यमांच्या शाळा या ओस पडल्या आहेत. मराठी माध्यमांच्या शाळांच्या विद्यार्थी संख्येत लक्षणीय घट झाली आहे. आज आपण आपल्या जीवनात इंग्लिश या भाषेला एवढे अनन्यसाधारण महत्व दिले आहे. आपण या भाषेकडे भाषा म्हणून बघतच नाही तर हल्ली इंग्रजी म्हणजे शिक्षण असा समज पालक आणि विद्यार्थ्यांमध्येही दिसून येतो. इंग्रजी भाषेवर किंवा विषयावर माझा वैयक्तिक कोणताही रोष नाही; परंतु आज आपण जे अवाजवी महत्त्व इंग्रजी माध्यमांना देतोय ते खरचं योग्य आहे का? हा प्रश्न सर्वांनीच स्वतःला विचारणे गरजेचे आहे. इंग्रजीच्या अवास्तव मागणीमुळे आणि पालकांचा मराठी माध्यमांकडे बघण्याचा दृष्टिकोन यामुळे जन्म झाला सेमी इंग्रजी या माध्यमाचा. इंग्रजी भाषा हा विषयच विद्यार्थ्यांना डोईजड होता अन् त्यात गणित, विज्ञानाची भर पडली. ना धड मराठी ना इंग्रजी, अशी अवस्था मुलांची झाली. आई–वडिलांच्या आग्रहाखातर आणि माझा पाल्य इंग्रजी नाही तर कमीत कमी सेमी माध्यमात तरी शिकावा, अशा अट्टाहासापायी आता विद्यार्थ्याला ना इंग्रजी येते ना व्यवस्थित मराठी. जन्मल्यापासून आपण जी भाषा ऐकतो, तिच्यात वावरतो, जगतो, त्या भाषेत शिक्षण घेणे किती सोपे आणि सोईचे आहे. आपण अनोळखी भाषा प्रमाणापेक्षा जास्त लादून अन्याय करत आहोत का? असा प्रश्न प्रत्येक बालकांच्या पालकाने विचारावा. विद्यार्थ्यांच्या अभ्यासात शिकण्यात जर काही बदल होणारच नसेल तर कशासाठी आग्रह त्या इंग्रजी भाषेचा. एका इंग्रजी विषय उत्तमरित्या शिकवला तर ते अधिक योग्य. जगाच्या स्पर्धेत टिकण्यासाठी, नवीन तंत्रज्ञानाच्या वापरासाठी इंग्रजी आवश्यक आहे आणि म्हणून एक भाषा म्हणून आपण सर्वच जण ती कडे बघू आणि भाषेची जी अवीट गोडी आहे ती चाखू, असे मला वाटते. तिच्याबरोबर आपली मातृभाषा, राष्ट्रभाषा याकडे दुर्लक्ष होणारे

नाही, असा प्रयत्न ही सर्वांनी कटाक्षाने करायला हवा. कारण शिक्षणाची गुणवत्ता ही शिकण्यावर, शिकवणाऱ्यावर आणि शिकणाऱ्याच्या बुद्धी पातळीवर अवलंबून असते. कोणत्याही विशिष्ट भाषेवर नाही.

कोणतीही गोष्ट ही लगेच किंवा ताबडतोब घडत नाही, तर ती साध्य होण्यासाठी काही काळ जावा लागतो. तसाच एका सरकारी धोरणाचा खोलवर परिणाम आपल्या शिक्षण पद्धतीवर झाला आहे. या वर्षीच्या दहावीच्या निकालात झालेली घसरण ही सर्वांनाच विचार करायला भाग पाडणारी ठरली आहे. इ. ८वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना नापास करायचे नाही या धोरणाचे हे अपत्य आहे. कारण ८ वी पर्यंत फक्त नावापुरत्या परीक्षा, प्रसंगी शिक्षकाने पेपर लिहावा आणि विद्यार्थी पास करावा ही अवस्था. या धोरणामुळे शिक्षकांचा शिकवण्याकडे झालेला उदासीन दृष्टिकोन, पालकांचे आपल्या पाल्यांकडे झालेले दुर्लक्ष अशा सर्वच कारणामुळे शिक्षणाचा दर्जा खालावला, गुणवत्ता ढासळली त्यामुळे ८ वी, ९ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांना अगदी मराठीही वाचता येऊ नये, साध्या गणिती प्रक्रिया जमू नये, अशी अवस्था विद्यार्थ्यांची आहे. मग हे विद्यार्थी यांचे पालक आणि शिक्षक ८ वी ९ वीच्या वर्गात जाईपर्यंत करत काय होते? असा प्रश्न उभा राहतो. कारण माध्यमिक विद्यालयामध्ये सर्वच नाही पण बऱ्याच शिक्षकांनी आपले विषय शिकवणेच बंद केले आहे. त्यामुळे झाले काय? याचा परिणाम या वर्षीचा घसरलेला दहावीचा निकाल दरवर्षी लाखोंच्या संख्येने विद्यार्थी पदवीचे शिक्षण घेऊन बाहेर पडत आहेत; पण समाजात त्यांना व्यवहार ज्ञान शून्य अशी स्थिती त्यामुळे असंख्य बेरोजगार निर्माण झाले. पुन्हा एक नवीन प्रश्न. जर एका सदोष निर्णयामुळे एवढे नुकसान होणार असेल तर केवळ राजकीय हेतू साध्य करण्यासाठी देशाच्या शिक्षण व्यवस्थेचा वापर होऊ नये. भविष्यात निर्णयाचे काय परिणाम याचा सारासार विचार व्हायला हवा.

विद्यार्थी नापास झाल्यावर आत्महत्या करतो आणि ती टाळण्यासाठी त्याला नापासच करू नये हे धोरणच, हा विचारच मुळी चुकीचा आहे. आज आपण आपल्या पाल्यांना, विद्यार्थ्यांना असे शिक्षण देवून अगदी अपंग बनवत आहोत. त्यांना संघर्ष करायला  शिकवण्याऐवजी त्यांना कुबड्यांचा आधार दिला जातो आहे, आणि अशा अपंग, कुबड्यांचा आधार घेऊन उभ्या असलेल्या तरुणांच्या खांद्यावर देशाची धुरा दिल्यास आपला देश कधीच महासत्ता होऊ शकणार नाही.

आता येऊ घातलेले नवीन धोरण जोडशब्द विद्यार्थ्यांना वाचताना, लिहिताना अडचण येणे म्हणजे विद्यार्थ्याला कठीण जाणार नाही असे मत या धोरणामागे आहे. विद्यार्थ्यांचा गोंधळ कमी करण्यासाठी एक नवीन पद्धती अवलंबल्याचा प्रयत्न; परंतु याचा चहूबाजुने विचार व्हायला हवा. दोन एक, दोन–दोन, तीन–दोन असे वाचन केल्यास आपण पाढे कसे म्हणणार हा प्रश्न? मांडलेला विचार नवीन, कल्पक आणि स्तूत्यच आहे. कारण एक नवी पद्धती अवलंबण्यात अजमावण्यात येईल; परंतु भविष्यात येणाऱ्या अडचणींचा विचार व्हायला हवा. आणि मगच शिक्षण व्यवस्थेत पद्धतीत बदल घडविणारे निर्णय घ्यायला हवा आणि तोही अगदी डोळसपणे.

देशासाठी एक सुजाण नागरिक घडविण्याचे कार्य एक हाडाचा, जातीवंत, शिक्षकच करू शकतो; परंतु आज विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षकाविषयी आपल्या पालकांविषयी आदर राहिला नाही. कुटुंब पद्धती बदलली, संस्कार करण्याचे राहूनच गेले. त्यामुळे निर्माण झालेला हा प्रश्न. सोडवायचा कसा? पुन्हा एक प्रश्न. हे कार्य देखील आपण शिक्षणातूनच करू शकतो. त्यासाठी बालकाचे भावविश्व समजून घेऊन आजुबाजूच्या वातावरणाचा त्याच्या जडणघडणीवर होत असलेला परिणाम याकडे लक्ष द्यायला हवे. वास्तव जीवनाकडे पाठ फिरवून शांतता व सद्‌भावना ही मूल्ये आपण सहजासहजी रूजवू शकत नाही. त्यासाठी सखोल पाऊले उचलायला हवी. प्रयोगशील व कृतीशील शिक्षण मुलांना द्यायला हवे. विद्यार्थ्यांसाठी अध्ययन अनुभव शाळेने उपलब्ध करायला हवेत. अंध–अपंगांच्या कमतरता, कष्टकऱ्यांच्या श्रमाची जाणीव शिक्षणातून व्हायला हवी. यांच्याविषयी प्रेम जागृत व्हायला हवे. सामाजिक बांधिलकी शिक्षणातून निर्माण व्हायला हवी. ''शिक्षण'' आणि एक ''शिक्षक'' यांच्याकडून खूप मोठ्या अपेक्षा आजही समाजाला आहेत. सरकारी शाळांचा खालावणारा दर्जा आणि दिवसेंदिवस त्यांच्याबाबत निर्माण होणारा नकारात्मक दृष्टिकोन बदलण्यासाठी ''एक प्रयोगशील शिक्षण'' हा उपक्रमच प्रभावी ठरू शकतो.

# लोकनेते शरदचंद्रजी पवार

- दिपाली शिंदे

"सदैव लोकांत राहणे ज्यांना आवडते ते सर्वात नशीबवान लोक.''मा. शरदचंद्रजी पवार हे असे भाग्यवान व्यक्तिमत्व. जन्मानंतर ज्या वयापासून समज यायला लागली तसे ते सदैव माणसांच्या वर्दळीतच राहिले आणि जगले देखील. प्रथम घरची वर्दळ, नंतर शाळेतली, मग शेतातली तसेच बाजारातली. नंतर महाविद्यालयीन आणि राजकीय जीवनातील तसेच देशातली आणि जगामधलीसुद्धा. गरीब मजुरापासून ते राजकारणी, उद्योगपती, शिक्षणतज्ज्ञ, शास्त्रज्ञ, देशातली दिग्गज आणि बिलगेटसारखे जगातले श्रीमंत व्यक्तिमत्व आणि विशेष म्हणजे बाबा आमटे, मदर तेरेसा यांच्यासारखी संतवत व्यक्तिमत्वे या सगळ्यात ते तेवढ्याच सहजपणे वावरत असतात. आता तर महाराष्ट्रभर ते जिथं जातील तेथे भराभरा त्यांच्याभोवती मधमाशा मोहळाभोवती घोंगावतात, तशा तऱ्हेने माणसे घोंगावतात.माणसांची गर्दी जमते, जणू चुंबकानेच त्यांना आकर्षित केले असावे तसे. बऱ्याच जणांना ते सहजगत्या नावानिशी ओळखतात. असा हा जनमाणसात रमणारा खरा लोकनेता. त्यांच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक कार्याची उंची अवर्णनीय! तसाच द्रष्टेपणा देखील. सगळेच आकाशाच्या उंचीचे आणि सागराच्या खोलीचे. कार्यक्षमता तर अफाट, अठरा अठरा तास काम करण्याची त्यांची हातोटी. या कार्यकर्तृत्वापुढे प्रत्येक माणसाने नतमस्तक व्हावे असेच हे कर्तृत्व!

